# बिइंग वुमन

दिवाळी अंक

ऑक्टोबर-नोव्हेंबर 2022

रूपये 140




१८३२
कTHA
कलेक्शन
'पीएनजी ज्वेलर्स' घेऊन आले आहेत, 'कथा कलेक्शन'!
अशी अद्भुत कलाकुसर जी साकार झाली आहे,
१०० वर्षांपूर्वीच्या साच्यातून!
SCAN ME
PNG
JEWELLERS
आनंदाचा जवळचा पत्ता
टोल फ्री नं: १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७) www.pngjewellers.com | info@pngadgil.com
INDIA | USA | UAE

# संपादकीय



**रोहिणी वांजपे**
संपादक, 'बिइंग वुमन'
editorial@thebeingwoman.com

**बिइंग वुमन मासिकाच्या या पहिल्या दिवाळी अंकात सर्वांचे मनापासून स्वागत. सर्वप्रथम बिइंग वुमनतर्फे सर्व वाचकांना दिवाळीच्या मनपूर्वक शुभेच्छा.**

हे वर्ष आमच्यासाठी खूप खास आहे. या वर्षात अनेक नवीन बदल झाले आणि अनेक नवीन घडामोडी घडत बिइंग वुमन मासिकाच्या स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले.

बघता बघता ३ वर्षांचा टप्पा बिईंग वुमन पार करून ४ थ्या वर्षात पदार्पण करत आहे.

आज मागे पाहताना घडलेल्या सर्व घटना डोळ्यासमोर स्वच्छ उभ्या राहतात. करोनाची २ वर्ष काढलेले डिजिटल अंक, त्यानंतर १५ ऑगस्ट पासून पुन्हा प्रिंट सुरु झाले, जाहिराती मिळवण्यासाठी पुन्हा सुरू केलेले प्रयत्न आणि आता बदलेले मासिकाचे स्वरूप. वाचकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे आणि आमच्या जाहिरातदारांनी आणि वर्गणीदारांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे हे सर्व सहज शक्य झाले.

मागच्या वर्षात दोन आगळे-वेगळे इव्हेंट झाले. कारवा नावाचे प्रदर्शन. यामध्ये फक्त महिला उत्पादकांचे स्टॉल होते. याला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. प्रत्येक स्टॉल धारकाच्या प्रॉडक्टचा सेल झाला. प्रत्येक प्रॉडक्ट युनिक होते. कारण बनवणारी एक स्त्री होती त्यामुळे ऐश्वर्याची हॅन्डमेड पॉटरी असो कि कल्याणीचे हॅन्डमेड मसाले आणि छोरी या ब्रॅण्डची कुर्तीज असो सर्वांनाच चांगला बिझनेस मिळाला.

पुणे मेट्रोच्या गरवारे कॉलेज स्टेशन वर केलेले संक्रांतीचे हळदीकुंकू छान पार पडले. २०० महिलांची उपस्थिती, देशपांडे'ज किचन यांनी दिलेले खमंग तिळाचे लाडू, छोट्याशा भेटवस्तूंचे वाण या सर्व गोष्टीचे मेट्रो स्टेशन वर असलेल्या कर्मचाऱ्यांनी कौतुक केले. नटूनथटून आलेल्या सर्व महिलांच्या घोळक्यांमुळं स्टेशनवर एक चैतन्य होते. उभ्या असलेल्या मेट्रोच्या डब्यात जाऊन सर्वांनी सेल्फीचा आनंद लुटला. आणि जाताना सांगितले बरे झाले आम्ही इथे आलो इतके छान स्टेशन मनसोक्तपणे बघायला मिळाले.

या वर्षीचा अजून एक उपक्रम म्हणजे महिला उद्योजिकांसाठी सुरु केलेली ई कॉमर्स वेब साईट. अगदी माफक चार्जेस घेऊन तुमचे प्रॉडक्ट्स आमच्या वेब साईटवर उपलोड करतो ज्यातून बिझनेस वाढायला मदत होते. अनेक उद्योजिका यात सहभागी झाल्या आहेत.

या वर्षीच्या नवरात्रात नऊ महिला उद्योजिकांचे इंटरव्यू पॉडकास्टच्या स्वरूपात प्रसिद्ध केले. आता हाच उपक्रम चालू ठेवणार आहे. दर मंगळवारी एक पॉडकास्ट असणार आहे. बिइंग वुमन महिला उद्योजिकांना सपोर्ट करते असं नुसतं न म्हणता त्यासाठी महिलांना परवडणाऱ्या प्रोमोशनच्या सुविधा उपलब्ध करून देणे हे एक ध्येयच ठेवले आहे.

या वेळेचा दिवाळी अंक **'कथा विशेषांक'** काढायचे ठरले कारण वर्षभर आपण वेगवेगळ्या विषयांवरचे माहितीपूर्ण लेख घेतो म्हणूनच यावेळी कथा विशेषांक काढायचे ठरले आणि सर्व लेखिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. यावेळी फक्त महिलांच्याच नाहीतर पुरुषांच्या पण कथा घेतल्या आहेत. प्रत्येक कथेचा विषय वेगळा आहे विचार करायला लावणारा आहे. पूर्णत्व ही  कथा किंवा माझ्या नवऱ्याची राधा, चांदीचा सिक्का, बळ, अस्त अशा कथा किंवा फणीशवरनाथ रेणू यांची अनुवादित कथा या सगळ्या कथांचे, विषय लिहिण्याची शैली वेगवेगळी आहे त्यामुळे रसिकांना या कथा वाचण्याचा आनंद नक्कीच मिळेल.

३ वर्षांची पूर्ती करून आता नवीन वर्षात पदार्पण करत आहोत याचा आनंद तर आहेच परंतु दुसरीकडे अजून जबाबदारी वाढल्याची जाणीवही आहे. या वर्षी अनेक नवीन गोष्टी महिला उद्योजिकांसाठी घेऊन येणार आहोत नवीन संकल्पना साकारणार आहोत त्यासाठी **बिइंग वुमन**शी नक्कीच कनेक्ट रहा.

**ही दिवाळी सुख समृद्धी आरोग्य ऐश्वर्य घेऊन येतो याच सदिच्छा**

**धन्यवाद.**
**रोहिणी वांजपे**
**संपादक, 'बिइंग वुमन'**

बिइंग वुमन

पुणे । वर्ष ३ । अंक १२
दिवाळी २०२२ । पाने ९६

RNI NO. MAHMAR/2019/78753

मुख्य संपादक
**रोहिणी वांजपे**
९८२२८६२२५५

सह संपादक
**स्मिता गुणे**
९८५०२६३५२५

उप संपादक
**चित्राली कुलकर्णी**
९८५०९५८४३१

कॉर्पोरेट कमर्शियलस्
**शुंभांगी नांदूरकर**
८५५२८५७७७९

डिझाइन
**ऑफबीट कॉन्सेप्टस्**
९८८१०९८०१०

**संपर्क कार्यालय**
**'बिइंग वूमन'**
६०३, फिफ्थ, अव्हेन्यू,
सिटीप्राईड थिएटरजवळ, पुणे ४११०३८
editorial@thebeingwoman.com


'बिइंग वुमन' हे पाक्षिक
मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे
यांनी एकविरा पब्लिसिटी, ए १२, निखिल पार्क
'सी' सोसा., माणिकबाग, सिंहगड रोड,
पुणे ४११०५१ येथे छापून फ्लॅट नं. सी ११,
संगीता सीएचएस, ताडीवाला रोड, पुणे ४११००१
येथून प्रसिध्द केले.
**संपादक-रोहिणी अरुण वांजपे**
(प्रसिद्ध केलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

**किंमत : १४०/-**

# बिइंग वुमन

## अनुक्रमणिका


- संपादकीय
- डॉ. रामचंद्र देखणेंना श्रद्धांजली — श्री. वसंत कुलकर्णी ........................ १२
- माझ्या नवऱ्याची राधा — सौ. नमिता उंब्रेकर कुलकर्णी................ १४
- अस्त — सौ. सुचित्रा पवार........................... १७
- चांदीचा 'खरा शिक्का' — सौ. प्राजक्ता कोळपकर..................... २३
- गजरा — सौ. शुभांगी दळवी .......................... २६
- लाल पानाची राणी — श्री. मधुकर धर्मापुरीकर ..................... ३०
- समांतर — सौ. अंजली कुलकर्णी मुतालिक ............ ३८
- वास्तुपुरुष म्हणे 'तथास्तु' — सौ. जुई कांदळगावकर...................... ४२
- भाऊबीज — सौ. स्नेहल माळकर-फणसळकर .......... ४६
- लो लो — सौ. सतेजा सुभाष दांडेकर ................. ५०
- इट्टी — सौ. कुंदा गुणवंता अशोक.................. ५३
- मेनका — सौ. सरिता देशपांडे.......................... ५६




- निर्णय — सौ. आशा निरंजन भट ...................... ५९
- बळ — सौ. आश्विनी निवर्गी......................... ६२
- पूर्णत्व — सौ. सुनीता मधुकर पाटील ................. ६५
- माहेरवाशीण — श्री. संदीप मणेरीकर......................... ६८
- अस्तित्व — श्री. वि .वा. भागवत........................ ७१
- निनावी सुखाची चौकट — अनघा पंडित................................ ७४
- अभागिनी — सौ. भारती दिलीप सावंत.................... ७६
- Cinderella 2022 — नुपूर जोगळेकर ............................. ७८
- तिचा एक दिवस — सौ. आराधना कुलकर्णी..................... ८०
- एमिली इन पॅरिस — मधुवंती गोडसे .............................. ८४
- कविता — .............................................. ८५
- शब्द कोडे — श्री. विजय तरवडे .......................... ८८


**बिइंग वुमन**
दिवाळी अंकाचे
वाचक, विक्रेते,
जाहिरातदार आणि
हितचिंतक
यांना दिपावलीच्या
हार्दिक
शुभेच्छा!



# संतसाहित्य अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणेंना श्रद्धांजली

**श्री. वसंत कुलकर्णी**

गेल्या शनिवारी (२४/९/२२) डॉ. रामचंद्र देखणे सरांना रात्री फोन केला. फोनवर छान बोलणं झालं! त्यांची अमोघ वाणी कानावर पडत होती. मला डॉक्टरांचे फोटो हवे होते. ते म्हणाले, ''अवश्य या. उद्या सायंकाळी या. फोन करून या. मला पूजेसाठी १-२ ठिकाणी जायचंय.''

मला बरं वाटलं. डॉक्टरांशी बोलता आलं! त्यांचा बोलण्यातला मोकळेपणा आपुलकी ऐकून मी थक्क झालो. त्यांची विद्वत्ता-त्यांचा अधिकार आणि त्यांची ओघवती रसवंती ऐकून मी धन्य झालो.

डॉक्टरांनी कथा, कादंबरी, बालसाहित्य, संतसाहित्य आणि लोकसाहित्य अशा विविध अंगांनी साहित्यात मुक्त संचार केला. ज्ञानाच्या आणि भक्तीच्या सागरात मराठी रसिकांना-भक्तांना यथेच्छ न्हाऊ घातलं आणि ज्ञानोबा-तुकारामांच्या भक्तीच्या गाभाऱ्यात पोहोचतं केलं! लोकशिक्षण आणि संस्कृतीचा इतका सुंदर संगम मराठी साहित्यविश्वात क्वचितच अनुभवायला मिळतो.

चिंतन, मनन, लेखन, संशोधन आणि त्यातून समाजाला शहाणे-समजूतदार बनविण्याचं विलक्षण सामर्थ्य

डॉक्टरांच्या वागण्यात-बोलण्यात आणि साहित्यात आहे, हे मी क्षणोक्षणी अनुभवत होतो.

डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे मी रविवारी दुपारी साडेतीन वाजता फोन केला. बराच वेळ फोन वाजत होता. फोनवर एक स्त्री बोलत होती- ''मी डॉ. देखणेंची पत्नी बोलतेय! डॉक्टर झोपलेत. त्यांच डोकं फार दुखतंय! तुम्ही नंतर फोन करा.''

मी रात्री फोन नाही केला.

सोमवारी सकाळी साडेदहाला डॉक्टरांना पुन्हा फोन लावला. फोन वाजतोय! बऱ्याच वेळाने फोन उचलला. मी डॉक्टरांचा मुलगा भावार्थ बोलतोय! डॉक्टर कालपासून झोपून आहेत. त्यांना ताप आलाय! ते आजारी आहेत. मी माझा परिचय दिला. पण डॉक्टर आजारी आहेत ऐकल्यावर फोन बंद केला.

डॉ. रामचंद्र देखणे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व! मी तर त्यांच्या प्रेमात पडलो होतो. त्यांच 'गौळण एक वाङ्मय आणि स्वरूप' हे पन्नासावं पुस्तक! मी पुस्तक प्रकाशनाला गेलो होतो. त्या वेळी ओझरतं भेटलो. पुस्तकावर सही घेतली.

'शतपैलू आचार्य अत्रे' मालिकेच्या निमित्ताने त्यांच्या घरी गेलो होतो. आम्ही शूटिंग केलं. डॉक्टर छान बोलले! आचार्य अत्रेंवर भरभरून बोलले- वाटलं कधी संपूच नये. अॅड. बाबूराव कानडेंबद्दल आदर-कृतज्ञता व्यक्त केली. तुम्ही फार महत्त्वाचे आणि चांगले काम करता आहात, असा माझा उल्लेख केला. कमलाकर बोकील आणि सहकारी पेंडसेंनाही धन्यवाद आणि शुभेच्छा दिल्या.

फारच छान कार्यक्रम झाला आणि एक एपिसोड आणि तोही डॉ. रामचंद्र देखणेंचा!

कामाचं समाधान तर मिळालं आणि मौल्यवान अशी डॉक्टरांकडून शाबासकी मिळाली!

हे सारं मी आठवत होतो! एकप्रकारे मी हवेत होतो. एखादी कलाकृती करण्याचा परमोच्च आनंद मी अनुभवत होतो. वास्तविक हे माझं षळशश्रव नव्हतं, पण आचार्य अत्रेवर काम करावं, असं मला गेली १०-१२ वर्षे वाटत होतं! आणि अचानक अॅड. बाबूराव कानडे हो म्हणाले ! आमचे मित्र कमलाकर बोकील हेही मीडियात काम करतात- त्यांना सहजच विचारलं आणि तेही हो म्हणाले आणि शतपैलू आचार्य अत्रे मालिका सुरू झाली आणि त्यातूनच ह्या एपिसोडसाठी डॉ. रामचंद्र देखणेंचा संपर्क आला-आचार्य अत्रेंवरील प्रेमामुळे वेगळेच नाते निर्माण झाले. हे सारे विचार मनात गर्दी करत होते.

शनिवार-रविवार दोन दिवस डॉक्टरांची भेट झाली नाही. आज सोमवारी भेट नक्की होणार, या कल्पनेत मी गुंग होतो. डॉक्टरांच्या भेटीची उत्सुकता होती.

सोमवार सकाळ, सोमवार दुपार, सोमवार संध्याकाळ गेली. मी रात्री दहानंतर टीव्ही बंद करून थोडे काहीतरी लिहीत होतो. कशातच लक्ष नव्हते.

बघता बघता रात्री साडेअकरा झाले आणि फोन वाजला. मी पाहिलं-कमलाकर बोकील यांचा फोन होता. इतक्या उशिरा त्यांचा कधी फोन येत नाही! मी उत्सुकतेने फोन घेतला.

बोकील बोलत होते आणि मी ऐकत होतो त्यांचं बोलणं ऐकताना कुणीतरी माझ्या काळजावरून सुरी फिरवतंय असं वाटलं! ती भयानक बातमी....ऐकली आणि बोकील सांगत होते, आज संध्याकाळी सातच्या सुमारास डॉ. रामचंद्र देखणे यांचे देवीची आरती करत असताना अकाली निधन झाले.

मी भानावर आलो.

दोन तीन दिवस

डॉ. देखण्यांच्या भेटीची स्वप्नं रंगवीत होतो.

आता डॉ. आपल्यात

नाहीत!

डॉक्टरांच्या भेटीगाठी सहवास-त्यांची विद्वत्ता-त्यांचं बोलणं नव्हे- रसवंती ह्यांत आम्ही न्हाऊन निघालो आणि हीच आमच्या 'शतपैलू आचार्य अत्रे' मालिकेची कमाई! केवढी मोठी कमाई आम्ही केलीय!

आम्ही धन्य झालो आहोत!

दुसरे दिवशी समाजातील विविध क्षेत्रांतील मंडळी आणि हजारो वारकऱ्यांच्या साक्षीने डॉ. रामचंद्र देखणे ह्यांचा अंत्यविधी मंगळवारी (२७/९/२०२२) दुपारी साडेबारा वाजता ज्ञानोबा-तुकोबाच्या गजरात पार पडला.

**डॉ. रामचंद्र देखणेंना भावपूर्ण श्रद्धांजली!**

# माझ्या नवऱ्याची राधा


सौ.नमिता उंब्रेकर-कुलकर्णी
पुणे

त्याला या जगातून जाऊनही १५ दिवस झाले. आत्ता तर कुठे त्याचे दिवस संपले आणि वकिलाचा फोन आला- उद्या जरा येऊन जा, त्याने केलेले मृत्युपत्र वाचायचे आहे. मला जरा आश्चर्यच वाटले, इतका हळवा, मनस्वी वागणारा तो अन् त्याने असा कसा मृत्युपत्रासारखा व्यावहारिक विचार केला.

खरंतर त्याच्या बरोबर लग्न झाले, त्यानंतर एक चार-पाच वर्षे बरी गेली, धुसफुसत का होईना आम्ही एकमेकांशी जमवून घेत होतो. परस्परविरोधी स्वभावाची दोन व्यक्तिमत्त्व एकत्र संसार करत होते, मी स्पष्ट, परखड, व्यवहारी, स्वतःचा आत्मसन्मान जपणारी, स्वतंत्र विचारी मुलगी आणि तो मनस्वी, हळवा, मनात ठेवणारा, रोमँटिक, अभिरुचीसंपन्न माणूस. लग्नानंतर लागोपाठ दोन मुले झाली आणि तो आणि मी मुलांसाठी तडजोड करत एकत्र राहिलो. तशी आमच्यात भांडणे काहीच नव्हती, पण प्रेमही नव्हते, तो कधी माझ्या प्रगतीच्या आड आला नाही की मी कधी त्याच्या. गेली वीस वर्षे आम्ही नवरा-बायकोपेक्षा मुलांचे आईवडील म्हणूनच राहिलो. छोटा पाच वर्षांचा झाल्यापासून आम्ही आमच्यासाठी आमच्या बेडरूममध्ये विभक्तच होतो.

गेल्या पंधरा वर्षांत त्याचे सतत देशात, परदेशात दौरे आणि मीपण लेखन, स्त्री चळवळ यात स्वतःचे व्याप वाढवून घेतलेले. खरं सांगायचे त्याच्यानंतर मला कधीच कोणत्या सहचर्याची गरज वाटली नाही. प्रेम या संकल्पनेवर माझा कधीच फारसा विश्वास नव्हता आणि त्यातून कोणताही पुरुष प्रेम करेल पण त्यातल्या जबाबदारी किती पार पाडेल यावर मला शंकाच होती आणि त्यातून तो जर लग्न झाल्यावर प्रेमात पडला तर त्या स्त्रीला फक्त शब्दांतून आणि स्पर्शातूनच प्रेम दाखवेल. व्यवहार, पैसा याबाबतीत त्याचा कल बायको, मुलांकडेच असतो. अशी माझी परखड मते आमच्या दोघांच्या चर्चेत मी कायमच त्याला बोलून दाखवली होती. त्यात नेहमीच मला तो गप्प बसून एक अत्यंत करुण, दुःखी नजर देऊन निघून जायचा.

वेळच्या आधीच मी वकिलाकडे गेले तर एक कोणी माझ्यापेक्षा थोडी लहान बाई बसली होती. मला वाटले त्यांचे काम संपायच्या आतच मी वकिलांच्या केबिनमध्ये आले, मी बाहेर बसते, असे म्हणत मी बाहेर जायला लागणार तेवढ्यात मला वकील म्हणाले, ''नाही मॅडम, याही तुमच्या बरोबरच आहेत, तुमच्या दोघींच्या समोर मला तुमच्या मिस्टरांनी लिहून ठेवलेले वाचायची त्यांची सूचना आहे. मी अत्यंत आश्चर्याने बघू लागले आणि वकिलाने



मृत्युपत्र वाचायला सुरुवात केली.

सर्व प्रथम मी तुझी माफी मागतो. कारण गेली अनेक वर्षे मी माझे आणि तुझ्या शेजारी जी स्त्री बसली आहे ती माझी प्रिय मैत्रीण, सखी, प्रेयसी हिच्या आणि माझ्याबद्दल काहीच सांगितले नाही. लपवून ठेवले असे नाही म्हणणार कारण आपल्यात व्यवहाराच्या पलीकडे कोणताच भावनिक संवाद, देवाणघेवाण नव्हती. आपल्या आपल्या वैयक्तिक आयुष्यात आपण कधीच डोकावलो नाही. गेली २० वर्षे आपला संसार असाच आपण स्वतंत्रपणे, पण एका छताखाली राहून केला.

ही माझी सखी मला बारा वर्षांपूर्वी टूरवर असताना एका कॉन्फ रन्समध्ये भेटली. भेटी वाढत गेल्या, विचार, आवडी, मत जुळत गेली. एकमेकांचा सहवास हवाहवासा वाटू लागला. मी माझ्या जबाबदाऱ्या, माझे कुटुंब याबद्दल सर्व कल्पना दिली आणि आपण नको पुढचा विचार करूयात, असे म्हणून एक वर्षभर तिच्यापासून लांब राहिलो. पण माझी सखी माझ्यात खूप गुंतली होती. मीही तिच्यात गुंतलो होतो. तिची हे सगळं स्वीकारायची तयारी होती.

तिला माझ्या मर्यादा मान्य होत्या. माझ्या आधीची तुझ्या बरोबरची, मुलांबरोबरची बांधीलकी सोडून हिच्यापाशी जाऊ शकत नव्हतो. ती मात्र तिच्या मुलीबरोबर एकटीच राहत होती आणि माझ्यात गुंतल्यामुळे तिला कोणाशी व्यावहारिक विचार म्हणून लग्न नव्हते करायचे. ती आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असली तरी तुझ्याइतकी सक्षम नाही. परिस्थितीने तिला अर्थाजन करायला भाग पाडले, पण मुळातच तिला घर, संसार, नवरा याचीच जास्त आवड. आम्हाला एकमेकांची खूप गरज आहे, एकमेकांशिवाय राहणे अवघड आहे आणि एकत्र राहणे माझ्यामुळे जास्त अवघड आहे. याची जाणीव झाल्यावर आम्ही दोघांनीही ठरवून आहे हे असंच राहून आपण एकमेकांना जिवंत असेपर्यंत साथ द्यायची असे मान्य केले. पण तरीही कायम मी तुम्हाला दोघींवरही अन्याय करतोय हा सल मनात ठेवूनच जगत राहिलो.

मुलांबरोबर मला माझ्या वैयक्तिक गरजेसाठी त्यांना भावनिक, सामाजिक संघर्षातून मी जिवंत असेपर्यंत जाऊ द्यायचे नव्हते. तुझ्यामुळे मला सुंदर दोन मुलांचा बाप होता आले आणि साम जिकदृष्ट्या पण कर्तबगार, उत्तम असा कर्ता पुरुष म्हणून जगता आले.

माझ्या सखीने माझ्यातला हळव्या, संवेदनशील माणसाला जिवंत ठेवले, निरपेक्षपणे अमाप प्रेम दिले. तुमच्या दोघींचाही मी खूप ऋणी आहे. आजपर्यंत माझ्या संसारासाठी जे काही घर उभे केले, जी काही सगळी स्थावर, डिपॉझिट्स, इन्शुरन्स, फंड हे सर्व माझ्या मुलांसाठी, बायकोसाठी आहे आणि ते त्यांनाच मिळावे.

त्याच्या पलीकडे जाऊनही मी जे काही कमावले आहे, साठवले आहे, म्हणजे माझी सखी ज्या घरात तिच्या मुलीबरोबर गेली आठ वर्षे राहते आहे, ते घर माझ्या मित्राचे नसून मी ते तुमच्या दोघींसाठीच घेतले आहे, तू जे काही भाडे देत आलीस ते मी तुझ्या मुलीच्या भवितव्यासाठी ठेवले आहे आणि म्हातारपणी कोकणामध्ये जाऊन राहावे आणि निवांतपणे वाडी बघावी हे तुझे माझे स्वप्न होते. मी ते पूर्ण केले. पण ते जगायला मी नाही राहू शकलो.

जिवंत असताना मी समाजाच्या भीतीने व मुलांच्या भीतीने उघडपणे नाही समतोल वागू शकलो. मला माफ करा.

सुन्न होऊन गेले मी, शेजारी बसलेली बाई माझ्या नवऱ्याची सखी होती आणि आयुष्यभर स्त्रियांच्या अशा प्रकारच्या नात्यातून होणाऱ्या अन्यायाबद्दल व्याख्याने देत आले. पण माझ्या नवऱ्याने असे नाते पण जबाबदारीने निभावता येऊ शकते, हे दाखवून दिले, ते बरोबर की चूक हा मुद्दा वादाचा वा वेगळा असू शकतो. नवरा-बायकोचे नाते आमच्यातले संपूनही अनेक वर्षे झाली. पण आमच्यात एकमेकांबद्दलचा आदर मात्र कायम होता. परिस्थिती, गरज अशा अनेक कारणांनी त्याच्यातला विवेक कदाचित जागलाही असेल, पण त्याच्यातला जबाबदार माणसाने ह्या नात्याला ही शक्य तितक्या समतोलपणाने निभावायला लावले. भले आपल्यात प्रेमाचे नाते नव्हते, पण ह्या तुझ्या वागण्याने माझ्या नजरेतून तुझ्याबद्दलचा आदर होता, आहे आणि तो असणार आहे...

# अस्त

**सुचित्रा पवार**
**तासगाव**

दादासाहेब... नारळ वाढवायला या बरं का...तुमी आल्याबिगार ह्यो खेळ सुरू व्हायचा न्हाई...गावातल्या यात्रेतल्या त्या सगळ्या कर्कश गोंगाटातून वसंतरावांना मंजुळाबाईचे आर्जव ऐकू येत होते. पण वसंतरावांना तिकडं जायची इच्छा नव्हती. गेल्या कित्येक वर्षात वसंतरावांनी तिकडं पाठ फिरवली होती. गावच्या कारभारातून आणि एकूणच गावच्या कुठल्याच गोष्टीत पुढाकार घेणं बंद केलं होतं. नव्या पिढीचं सर्व काही आगळीक वागणं वसंतरावांना पटत नव्हतं. समजून चार हिताच्या सांगितलेल्या गोष्टी तरुण रक्ताला पटत नव्हत्या, 'तुमचा काळ गेला आता बास करा,' असाच सगळ्यांचा सूर होता. आत्तापर्यंत जपलेली प्रतिष्ठा, स्वतःचा आत्मसन्मान कुणी ऐऱ्या गैऱ्याने डिवचू नये आणि आपला अपमान होऊ नये म्हणून वसंतरावांनी आपल्या जीवनाची संध्याकाळ जपलेल्या सर्व नैतिक आचरण, मान-सन्मानाबरोबरच आणि आपल्या तत्त्वाबरोबरच घालवायची निश्चय केला होता. तसेही आता त्यांची गात्रं थकली होती. काय काय बघितलं, भोगलं नव्हतं गेल्या चाळीस पन्नास वर्षांत? तरीही त्यांची कुठलीच तक्रार नव्हती. अवघं जीवन गावासाठी आणि त्याच्या नावासाठी खर्च केलं होतं. निरपेक्षपणे गावाचं भलं केलं होतं. मन शांत होतं तरीही गाव आता वेगळ्या, वाकड्या वळणाने निघाल्याची खंत त्यांच्या मनाला बोचत होती. हे सगळं आपल्या पश्चात घडलं असतं तर बरं झालं असतं असं राहून राहून त्यांना वाटत होतं आणि मनाची बोच उगीच टोकदार होऊन मन रक्तबंबाळ होत होतं. तरीही त्यांनी आताशा मनाला सावरलं होतं अलिप्त राहत देव धर्मात बुडवून घेतलं होतं.

ते आले तेव्हा काय होतं गावात? गाव? गाव कसलं दोनशे-तीनशे लोकांची वस्ती होती फक्त. मावशीच्या घरात दत्तक आले न देशमुख झाले. सुरुवातीला तर त्यांना करमायचे नाही कारण आत्तापर्यंतचे त्यांचे आयुष्य निमशहरी भागात गेलेलं. बारावी झाली, पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापूरला जायचं ठरलं पण शेजारच्या गावात सैन्य भरती चालू होती, सहजच गंमत म्हणून त्यांनीही अर्ज केला आणि निवड झाली. सुरुवातीला सोल्जर पुढं पुढच्या परीक्षा देत देत कर्नल झाले आणि मग मावशीकडे कायमचेच आले.



सहा फूट उंच धिप्पाड काळा सावळाच; पण भरदार देह, खणखणीत आवाज आणि सैन्यातली वागण्या-बोलण्यातली अदब, शिस्त असे एकूणच रुबाबदार व्यक्तिमत्त्व कुणीही पाहिले तर त्यावर त्यांची छापच पडायची. सगळा गाव त्यांच्याकडे आदराने बघायचा. निंबवडे गाव डोंगराच्या कुशीत होते. खडकाळ, ओसाड आणि माणसेदेखील अशीच. सुधारणेचे, शिक्षणाचे वारे न लागल्याने अतिशय मागास, आदिवासी असल्यासारखे, अंधश्रद्धाळू. इथं आजारी पडल्यावर लोक दवाखान्यात जात नसत तर गुहेतल्या नाथबाबांचा धुपारा लावत. किरकोळ जखमांना झाडपाल्याचे औषध करत. साप चावला तर नाथबाबांच्या गुहेत नेत, एक रात्र तिथेच राहत. माणूस बरा झाला तर बाबांची कृपा म्हणत, दगावला तरी बाबाला प्रिय झाला म्हणत.

तीच तऱ्हा शाळेची. ब्रिटिशांच्या कालावधीत एका छोट्याशा घरवजा इमारतीचे उद्घाटन झालेली नोंद असलेला गंजका फलक होता. तिकडे कुणी कधी फिरकले नसल्याने गवत न झाड-झाडोऱ्यात ती बुजून गेलेली. सुरुवातीला चार-सहा मुले येत; पण शिक्षक कुणीच यायला तयार नसल्याने ती बंद पडली ती कायमचीच. तसेही गावाला काय फरक पडत नव्हता शाळा असली न नसली तरी. निसर्गाच्या कुशीत वाढलेली मुलं बंदिस्त व्हायला नकार देत. दहा-बारा वर्षांची झाली की ती घरकामात मदत करत. कुणी शेतीत तर कुणी गुरे राखत. कुणी आसपासच्या चार गावातील गुरे वळत आणि तिकडेच चाकरी करत राहत. चहूबाजूला डोंगर असल्याने  पावसाळ्यातले निसर्गसौंदर्य मन मोहून टाकी. चहूबाजूला डोंगरमाथ्यावर आदळणारे जलद, डोंगरउतारावरून खळखळ वाहणारे शुभ्र जलप्रवाह, हिरवाई त्यावर चरणारी पुष्ट जनावरे. असंख्य प्रकारची वाऱ्यावर डोलणारी गवतफुले, पाखरांचे फांद्या फांद्यावर गाणे. एखाद्या चित्रकाराला सुद्धा इतकं सुंदर दृश्य चित्रात बद्ध करण्याचा मोह व्हावा इतका सुंदर निसर्ग. पण पानझडीनंतर सगळा माळ, डोंगर उजाड ओसाड व्हायचा. पायथ्याला असलेल्या भात शेतीच्या तुकड्यावर आणि दुभत्यावरच इथली उपजीविका चालायची. वस्तुविनिमयाची पद्धत अजूनही बऱ्यापैकी प्रचलित होती. त्यामुळं फारसे काही नडणारे नव्हते. भातकापणी संपली की नाथबाबांचा उत्सव असायचा. तांदळाच्या खिरीचा प्रसाद बाबाला आणि गावाला सुद्धा. खेळण्याची पालं, पाळणे, माणसांची गर्दी असला उत्सव नव्हता तो. डोंगर पालथा घालून गावातील म्हातारे, ज्येष्ठ कसलासा पाला आणायचे, चेचून नाथबाबांच्या मूर्तीला-मूर्ती कसली एक शिळाच होती ती अखंड पाझरणारी-तिलाच तो चेचलेला पाला थापायचा, एक दिवस ठेवून दुसऱ्या दिवशी गरम पाण्याने धुऊन काढायचे, गायीच्या दुधाचा नैवेद्य आणि खिरीचा प्रसाद. या दोन-चार दिवसांत सर्व जण नाथबाबांच्या पायरीशी अर्थात गुहेजवळ वस्ती करायचे, उत्सव संपला की घरी परतायचे. एकंदरीत गावाचे जीवन असे होते पण लवकरच वसंतराव रुळले. वसंतरावांचा एक मुलगा मिल्ट्री स्कूलमध्ये होता आणि मुली आईवडिलांकडेच ठेवल्या होत्या. वसंतरावांना अजून दोन भाऊ होते एक मास्तर आणि एक शेतीत. तीन चुलते, आईवडील आजी आजोबा असे एकत्र कुटुंब गुण्यागोविंदाने राहत होते.

इकडं मावशी काका आणि पती पत्नी असे चारच जण राहायचे. मुले फक्त सुट्टीला यायची. काका गावप्रमुख होते त्यामुळं आपसूकच वसंतराव देखील गावप्रमुख-गावकारभारी झाले. गावप्रमुखाला लोक दादासाहेब म्हणायचे. शेतीत फक्त भात



पिकायचे. त्यामुळं एरवी खूप वेळ रिकामा असायचा. हा वेळ सदुपयोगी लावण्यासाठी त्यांनी गावाला काळाच्या प्रवाहात आणायचं ठरवलं. कामाचा श्रीगणेशा त्यांनी शिक्षणापासून सुरू करायचा ठरवले. शाळा तर नव्हतीच गावात मग? मग त्यांना एक युक्ती सुचली. असे तसे लोक दररोज वाड्यावर पीक पाण्याची चर्चा करायला यायचेच. त्यांनी हा विषय त्यांच्यासमोर काढला. पण कोणीच काही बोलेना.'काय करायचं शाळा शिकून?आपली शेती गुरं कोण बघणार? आणि गुरे चारली नाहीत तर दूध कुठून मिळणार? दूध नाही तर पोरंबाळं धष्ट-पुष्ट कशी होणार? जो तो आपापसांत चर्चा करू लागला. दादासाहेबांचे मन अस्वस्थ झाले. पण, ते एक सच्चे सैनिक होते हरतील ते दादासाहेब कसले? रात्रभर विचार करून कसलासा तोडगा काढून शांत झोपले.

दुसऱ्या दिवसापासून त्यांनी दररोज संध्याकाळी गावातील सर्व लहान-मोठ्या मुलांना एकत्र घरात सोप्यात जमायला सांगितले आणि छोट्या-छोट्या गोष्टी सांगून त्यांच्याशी संवाद साधायला सुरुवात केली. मुले जसजशी रमू लागली तशी त्यांनी हळूहळू अक्षर ओळख सुरू केली. इनमिन साताठ लहान मोठी मुलं त्यातच काही रात्री पेंगायची तर काही चुळबुळ करायची, पण दादासाहेबांनी आपली जिद्द सोडली नाही. त्यांच्या मते एका मुलाला जरी लिहिता वाचता येईल तरी बरेच काही परिवर्तन घडेल.

आणि तसेच झाले.एका मुलाने लेखन वाचनात बरीच प्रगती केली दादासाहेबांनी त्याच्या वयानुसार लेखन वाचन शिकवले, अवांतर वाचनाची गोडी लावली. पुढं त्याला तालुक्यातल्या एका शाळेच्या वसतिगृहात ठेवून शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले नुसते प्रोत्साहन नाही तर आर्थिक मदत केली, त्याचं पालकत्व स्वीकारलं.

वाड्यातही श्रावण महिन्यात, चैत्र महिन्यात धार्मिक पुस्तकांचे वाचन दादासाहेब आणि वहिनीसाहेब करू लागले. नुसतं वाचनच नाही तर त्यावरून छोट्या-छोट्या कथाही रंगू लागल्या. आरोग्य, शिक्षण, अंधश्रद्धा यावरही चर्चा होऊ लागली. वहिनीसाहेब जुन्यातली सातवी झालेल्या. दादासाहेबांनी शाळा त्यांच्या गळ्यात टाकली न ते पुढच्या प्रश्नाकडे वळले.

गावात दवाखाना नव्हता, रस्ता म्हणजे कच्ची गाडीवाट होती. इतक्या छोट्या गावासाठी पक्क्या रस्त्याची गरज नव्हती आणि रस्त्यावाचून लोकांचे काही नडतही नव्हते, कारण नाथ बाबांच्या डोंगराच्या खाचखळग्यांना तुडवत लहानाची मोठी झालेली इथली माणसं काटक आणि दगडासारखी कठीण होती. गरज पडली तर त्यांना मैलोन् मैल चालायची सवय होती. तरीही भविष्याच्या दृष्टिकोनातून आणि विकासाच्या दृष्टिकोनातून एका चांगल्या रस्त्याची गरज होती, आरोग्यसुविधेची गरज होती. झाडपाल्याने किरकोळ आजार बरे होत असले तरी बाळंतपणासाठी, गरोदर मातासाठी काहीच सोय नव्हती. त्यामुळे बऱ्याच महिला बाळंतपणात दगवायच्या किंवा बाळंतरोगाला बळी पडायच्या.

त्यासाठी सरकारी दरबारी खेटे घालून आठवड्यातून दोनदा सरकारी आरोग्य तपासणीसाठी डॉक्टर आणि परिचारिकांना गावात यायला भाग पाडले. आता आठवड्यात दोनदा नियमित आरोग्य तपासणी होऊ लागली, लसीकरण होऊ लागले. गरोदर मातानाही टॉनिक, औषधं फुकट मिळू लागली. त्यांची नोंदणी होऊ लागली आणि दिवस भरत आले की दवाखान्याची गाडी येऊन घेऊन जाऊन बाळ बाळंतणीस नेऊ आणू लागली, नवजात बालकांचे पण नियमित लसीकरण होऊ लागले.

आता दादासाहेबांनी रस्त्याचे मनावर घेतले. गाडी वाटच थोडी रुंद करून मुरूम टाकून एकसारखा रस्ता केला तर किमान बैलगाडी तर नीट जाईल येईल असा त्यांचा विचार होता, त्याप्रमाणे त्यांनी गावकऱ्यांसमोर हा विषय ठेवला. बऱ्यापैकी आता गावकरी विश्वासात आले होते, दादासाहेब जे करतील ते आपल्या हिताचं, फायद्याचं असं प्रत्येकाला वाटत होतं आणि हळूहळू सर्वजण सहकार्य करायला पुढं येत होतं.

एके दिवशी दादासाहेबांनी रस्त्याचा प्रस्ताव गावकऱ्यापुढं ठेवला. गावापासून जवळजवळ दोन किमी रस्ता मुरूम टाकून पक्का करायचा ठरले. घरटी एक रुपया वर्गणी आणि अंगमेहनत ही करायची. स्वतः दादासाहेबांनी दोनशे रुपयांच्या पेन्शनमधले शंभर रुपये घातले आणि जातीने रस्त्यावर भराव टाकायला सुरुवात केली. नाथ बाबांच्या डोंगर पायथ्याजवळच एका ठिकाणचा मुरूम खोदायला सुरुवात केली, जेणेकरून भविष्यात डोंगरावरून वेगाने येणारे पाणी खड्ड्यात झिरपून उन्हाळ्यात देखील पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. सलग सहा महिने खपून मुरुमाचा चांगला रस्ता तयार झाला. तसेही बैलगाडीशिवाय गावात कुठलंच वाहन नव्हतं, फक्त दादासाहेबांची फटफटी होती.

रस्ता झाला, आरोग्य सुविधा झाली, शाळा सुराला लागली होती. आता दूधसंकलन करून ते तालुक्याच्या गावी पाठवण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्याप्रमाणे प्रत्येकाने घरात पुरेसे दूध शिल्लक ठेवून जितकं पण दूध उरेल ते संकलन करायचे ठरले. तालुक्यातील नामांकित डेअरीत गावाचे खाते काढले. त्याप्रमाणे कुणाचे किती दूध? याची नोंद गावातील नुकत्याच शिक्षित झालेल्या मुलावर सोपवली. स्वतः दादासाहेब दररोज वही तपासत.

गावातील दादू दररोज संकलन झालेले दूध बैलगाडीतून तालुक्याला नेई. आठवड्याचे बिल मिळू लागले ज्याच्या त्याच्या संकलनानुसार सगळ्यांच्या हातात पैसे आले न गावकरी हरकून गेले, कारण आजपर्यंत दूध कधी विकलं गेलं नव्हतं. दादूलाही बैलगाडीचा मोबदला मिळाला.

आता दादासाहेबांनी शेती पिकांवर लक्ष केंद्रित केले. इथलं मुख्य पीक होतं भात आणि बाजरी. याशिवाय लोक स्वतःपुरत्या भाज्या लावायचे. जमिनीचे तुकडे छोटे असल्याने पोटापुरते पिकायचे पण पावसाने ओढ दिली किंवा कमी पडला तर मात्र धान्य पुरवठी येईल याची खात्री नव्हती. कधीकधी जंगली प्राणीही पिकांची नासधूस करायचे. यासाठी धान्य साठवणे सुरू झाले, उसने धान्य देणे-घेणे आणि जास्तीच्या पोत्यांची सुरक्षित साठवणूकही. थोडक्यात धान्य बँकच. कमी पडलेलं धान्य उसने घेणे आणि जास्तीचे साठवून ठेवणे.

दुधाच्या बैलगाडीबरोबर गावातील शिल्लक, जास्त झालेला भाजीपालाही तालुक्याला जाऊ लागला, त्याचेही चार पैसे ज्याचे त्याला मिळू लागले.

आता दादासाहेबांनी नाथ बाबांचे छोटेसे मंदिर बांधायचे ठरवले. श्रमदानातून आणि वर्गणीतून डोंगराच्या माथ्यावर सुंदर अशा मंदिराचे बांधकाम झाले. गुहेतील नाथ बाबांची शिळा मंदिरात विराजमान झाली आणि गावावर लक्ष देऊ लागली. मंदिराच धार्मिक ग्रंथाचे वाचन होऊ लागले. गावात तालीम झाली. दादासाहेबांच्या अनौपचारिक शाळेतील मुलं लेखनात व वाचण्यात तरबेज झाली. गावस्वरूपी पतसंस्था स्थापन झाली. अनंत अडचणी आल्या, संकटे आली; पण दादासाहेब मागे हटले नाहीत. गाव स्वयंपूर्ण झालं. शाळेसाठी प्रयत्न करूनही इतक्या दुर्गम भागात आणि कमी लोकवस्तीच्या भागात शाळा सुरू होणे अवघड होते. त्यावर दादासाहेबांनी तोडगा काढला. दादासाहेबांच्या अनौपचारिक शाळेतील मुलांना सातवी बोर्डाच्या परीक्षेला बसण्याची परवानगी मिळाली. सातवी बोर्ड पास झालेल्या मुलांनीच मग गावात शाळा सुरू केली. दादासाहेब म्हणेल ती पूर्व दिशा झाली कारण माणसांना माणूसपण आणि गावाला सुरेख गावपण प्राप्त झाले होते. सगळं कसं सुरळीत चालू होतं.

मध्यंतरीच्या कालावधीत दादासाहेबांच्या मुलांची लग्न झाली. गावातील वयोवृद्ध इहलोकी गेले, लहान मुलं तरुण झाली, तरुण प्रौढ झाले, प्रौढ ज्येष्ठत्वाकडे झुकू लागले. गावची लोकसंख्या वाढू लागली. काही भटके लोकही गावाची संपन्नता आणि शांतता बघून गावाबाहेर स्थायिक झाले. गावात एक टेम्पो खरेदी झाला, त्याचे भाडे मिळू लागले, दिवसातून एक एसटीची फेरीही सुरू झाली. डेअरी झाली, पतसंस्थेचे रूपांतर छोट्या बँकेत झाले. पहिली ते चौथी प्राथमिक शाळा भरू लागली, नुसती भरूच नाही तर दादासाहेबांनी अतिशय देखणी, आदर्श इमारत आधुनिक सोयी-सुविधांसह बांधून दिली. भाताबरोबरच वेगवेगळ्या पिकांच्या नियोजनाने गावात आर्थिक सुबत्ता आली, समृद्धी आली. दादासाहेबांची तपश्चर्या फळास आली. एखाद्या मजबूत इमारतीचा पाया भक्कम व्हावा तसे गावाचे एकंदरीत स्वरूप झाले, जणू एक पक्की सोपी पायवाटच झाली आता पुढं फक्त आनंदाने चालत राहायचं बस्स! पण चांगल्या माणसाचे चांगुलपण न बघवणारे पण उघड विरोध करणं जमत नाही म्हणून छुपा डाव करणारे किंवा चांगुलपणाला पुरण्याची संधी साधणारे संधी साधू आणि पाताळयंत्री लोक प्रत्येक समाजात, गावात असतात म्हणून कुठल्याच चांगल्या गोष्टी दीर्घकाळ चांगल्या राहू शकत नाहीत, कालौघात त्यांना ग्रहण लागते. निंबवडेत पण तेच होऊ लागले.

चुलता-चुलतीचं रान आणि गावकारभारीपण आपल्याला आपसूकच मिळेल ही आशा बाळगून असलेल्या दादासाहेबांच्या मावशीच्या पुतण्याला चुलतीने दादासाहेबांना दत्तक घेतल्याने हात चोळत गप्प बसावे लागले होते; पण त्यांच्या मुलाच्या

सयाजीरावाच्या मनात मात्र त्यांनी सारखे सारखे हे भरवून भरवून उपऱ्या दादासाहेबांचा विरोधक म्हणून तयार केलं होतं. तो दादासाहेबांची प्रतिष्ठा कमी करण्याच्या संधीची वाट पाहत होता; पण तशी संधी न आल्याने आतून चरफडत होता. उपऱ्या दादासाहेबांच्या कर्तृत्वाने आणि यशाने, वाहवेने आतून जळत होता.

उन्हाळ्याचे दिवस होते ऊन मी म्हणत होते. रस्ते तापले होते, झाडांचा पाला सुकला होता. दादासाहेब तालुक्याहून गावाकडे येत होते. उन्हाच्या काहिलीने घामाच्या धारा लागल्या होत्या. एखाद्या झाडाखाली थोडा वेळ थांबून थंड व्हावे म्हणून ते झाडाचा शोध घेत होते इतक्यात अचानक मागून किंचाळ्याचा आवाज आला. बघतात तर काय एका टेम्पोवजा ट्रकने पाठीमागून पेट घेतला होता, ड्रायव्हरला याची कल्पना नव्हती तो त्याच्या तालात गाडी चालवत होता. दादासाहेबांनी हात दाखवून ओरडून-ओरडून गाडी थांबवली. 'मंजुळबाई लोकनाट्य पार्टी'चा बोर्ड असलेला तो टेम्पो थांबताच दादासाहेबांनी फळकूट ओढताच सगळ्यांनी पटापटा उड्या टाकल्या; पण मंजुळाबाईंना बरेच भाजले होते. बाकीच्यांना पण थोडी थोडी झळ बसली होती. मुख्य म्हणजे मंजुळाबाईंची चांदणीसारखी नाजूक देखणी मुलगीही या ताफ्यात होती. तिच्या हाताला थोडं भाजलं होतं. त्याकाळी रस्त्यावर वाहनांची वर्दळ कमी असायची त्यामुळे कुठल्या वाहनातून त्या दोघींना दवाखान्यात न्यायची सोय नव्हती. दादासाहेबांनी मागचा पुढचा विचार न करता दोघींना आपल्या गाडीवर घेतलं, पाठीमागे अजून एकाला बसायला सांगून सरळ दवाखाना गाठला.

इकडं आग विझवायला त्या आडरस्त्यावर पाणी कुठं होतं? जेवढं वाचवता येईल तेवढं सामान बाकीच्यांनी काठीने काठीने बाहेर काढलं. सगळा कालवा न दंगा चालू होता कारण फडाचं सर्व सामान अर्धवट जळले होते. पुढच्या गावच्या सर्व शोच्या सुपाऱ्या होत्या त्या रद्द कराव्या लागणार होत्या. मुख्य मंजुळाबाईच जायबंदी झाल्या होत्या. 'कसं होणार आपलं?' म्हणून कोण रडत होतं, कोण कपाळ बडवत होतं, कोण नुसतंच डोक्याला हात लावून विमनस्क बसलं होतं.

दादासाहेब मंजुळाबाईंना व मुलीला दवाखान्यात ॲडमिट करून आले. पुढच्या गावात जाऊन गावकऱ्यांना तमाशा रद्द झाल्याचे कळवले. येणाऱ्या-जाणाऱ्या तुरळक वाहनांपैकी एका टेम्पोला हात करून थांबवून वाचलेलं साहित्य आणि राहिलेल्या लोकांना बसवून त्यांनी आपल्या गावाकडे नेले. सर्वांची जेवणखाण्याची व्यवस्था करून त्यांची राहण्याची सोय केली, मानसिक धीर दिला अन् दुसऱ्या दिवशी त्यांच्या गावी पाठवले.

मंजुळाबाई बऱ्या होताच दादासाहेबांनी त्यांचा फड उभा करण्यास मदत केली. दादासाहेबांनी हे सर्व माणुसकी आणि निःस्वार्थी परोपकारी भावाने केले होते; पण मंजुळाबाईनी दादासाहेबांना देव मानले आणि उपकारांची परतफेड म्हणून आजन्म त्यांच्या तमाशाच्या शो फुकट पाहायला येण्याचे निमंत्रण दिले. मंजुळाबाईंचा तमाशा अख्ख्या जिल्ह्यात प्रसिद्ध होता, त्याचबरोबर मंजुळाबाईंची ख्यातीही. मंजुळाबाई आपल्या कलेशी आणि व्यवसायाशी प्रामाणिक होत्या. सौंदर्य, आवाज, नृत्य आणि अदाकारीसाठी तर त्या प्रसिद्ध होत्याच; पण गावोगावच्या यात्रा सुरू झाल्या की नारायणगावला त्यांच्या कनाती पुढं सुपारीसाठी अक्षरशः रीघ लागायची. एकदा सुपारी घेतली अन् शब्द दिला की मंजुळाबाई कितीही अडचणी येऊ देत आपला शब्द तर पाळतच. पण काही कारणाने शो करता नाही आला तर संबंधितांचे पैसे परत करत. म्हणूनच मंजुळाबाई प्रत्येक गावात सुप्रसिद्ध होत्या; पण या वर्षीचे त्यांचे सर्व खेळ रद्द होऊन खूपच आर्थिक नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर दादासाहेबांनी वेळेवर केलेली सर्व मदत त्यांना लाखमोलाची वाटत होती. पुन्हा एकदा नव्याने त्यांनी फड उभा केला; पण एक अख्ख्या सीझन वाया गेला; आता सहा-सात महिने तरी गप्पच बसावे लागणार होते. अशाच एका शोला मंजुळाबाईंच्या विनंतीला मान देऊन शेजारच्या गावात दादासाहेब शोला गेले होते. खरेतर पुढं काय चाललंय तिकडं त्यांचं मुळीच लक्ष नव्हतं. त्यांचं शरीर तिथं आणि मनात गावातील पुढच्या योजनांविषयी खल चालू होता; कारण त्यांचा पिंड वेगळाच होता. तिथंच सयाजीरावाने दादासाहेबांना पाहिले आणि त्यांच्या बदनामीचे कोलीत आपसूकच त्याच्या हाती आले. दादासाहेबांना तिथं बघून त्याला आतून आनंदाच्या उकळ्या फुटल्या होत्या. कधी एकदा गावाकडे जाऊन ही बातमी गावभर करतोय असे त्याला झाले.

सयाजीरावाने हळूहळू लोकांचे कान भरायला सुरुवात केली. दादासाहेबांना तमासगिरणीचा नाद लागल्याचे रंगवून रंगवून सांगायला सुरुवात केली. प्रत्यक्ष अनुभवापेक्षा दुसऱ्यांनी सांगितलेल्या गोष्टी माणसास खऱ्या वाटतात व लोक त्यावर चटकन विश्वास ठेवतात. सयाजीरावानी ही बातमी रंगवून, तिखट-मीठ लावून हळूहळू गावभर केली, एवढेच नाही तर पतसंस्थेतले, गावस्वरूपी ठेवीचे पैसे मंजुळाबाईंना परस्पर देत असल्याची खोटीच पुष्टी जोडली. एवढ्याशा गावात कंडी पिकायला वेळ लागला नाही. लोक विचित्र नजरेने दादासाहेबांकडे पाहू लागले. आपापसांत कुजबुजू लागले. दादासाहेबांना या गोष्टीची यत्किंचित कल्पना नव्हती पण हळूहळू सुगावा लागलाच. गावात उठलेल्या वादळाने दादासाहेबांच्या माजघरातही प्रवेश केला आणि माजघरातूनही मग विचारणा झाली.

ऐकलं ते?..

तुम्ही गावावर विश्वास ठेवायचा की इतक्या वर्षांच्या आपल्या नात्यावर? हे तुम्हीच ठरवा.

शांतपणे दादासाहेबांनी उत्तर दिले. घरातले वादळ शांत झाले; पण किंतु मनात राहिलाच. दादासाहेबांच्या जीवनातील हे भयंकर वादळ त्यांना अनपेक्षित होते. सर्व पूर्ववत झाले; पण या वादळाने दादासाहेबांची मानहानी तर झालीच पण दादासाहेब एकटे पडले. झाल्या गोष्टीने ते व्यथित झाले. गावात फळी झाली आणि नवीन पिढीतील तरुणाई सयाजीरावाच्या गटात सामील झाली. आत्तापर्यंतचा सर्व कारभार चोख, पारदर्शी आणि विश्वासू होता. तो दादासाहेबांनी गावकऱ्यांच्या हितासाठी, गावाच्या भल्यासाठी आंतरिक तळमळीने केला होता,त्याला राजकारणाची काळी किनार



लावली गेली. आजपर्यंत जे घडलं नव्हतं ते घडू लागलं.गावच्या वेशीपासून कोसो लांब केलेल्या गोष्टी गावात शिरू लागल्या. गावात गट-तट झाले, दादासाहेबांचा विरोध झुगारून काही लोक नको ते धंदे करू लागले. वढ्यावघळीत चोरून चोरून हातभट्ट्या घालू लागले, गावात जत्रेत तमाशा रंगू लागला. काहींना तमाशाचा नाद लागला, गावात निवडणुका लागू लागल्या. भांडणे, मारामारी, कोर्टकचेऱ्या सुरू झाल्या आणि गावात शांतता नांदावी म्हणून दादासाहेब कोर्टकचेऱ्याचे उंबरे झिजवू लागले. गावातील दादासाहेबांना मानणारी कृतज्ञ पिढी हळूहळू संपू लागली आणि सयाजीरावांचा उदो उदो होऊ लागला. आपल्याच घरातल्या घरभेद्याने गाव नासवलेला पाहून दादासाहेब व्यथित झाले आणि त्यांनी गावच्या कुठल्याच गोष्टीतून आपलं अंग काढून घेतलं.

आज मुद्दामच सयाजीरावानी मंजुळाबाईंचा लोकनाट्य तमाशा गावजत्रेत आणला होता; पण दादासाहेबांना त्याचे सोयरसुतक नव्हते. मंजुळाबाईंनाही कर्णोपकर्णी सर्व गोष्टी समजल्या होत्या आणि त्यांच्या माणुसकीच्या नात्याला गावाने गलिच्छ सुरुंग लावल्याचे कळले होते; पण त्या तरी काय करणार होत्या? लोकांच्या तोंडाला कोण हात लावणार? 'पण या देवमाणसाला लागलेला कलंक आपणच पुसायचा' ही खूणगाठ त्या आयुष्यभर मनात बांधून होत्या आणि तशी संधी शोधत होत्या. देवाच्या कृपेने तमाशाच्या सुपारीने ही संधी आली होती.

मंजुळाबाईही आता थकल्या होत्या. आता त्या फक्त तमाशात नृत्यांगनेला आवाज देत, गायन करत. नृत्यासाठी आता त्यांची मुलगी आणि भाची होती. काही जुने, काही नवे कलाकारही होते. निंबवडेतील त्यांचा आजचा शो पहिला आणि शेवटचा होता. तमाशाची सुपारी घेण्याचे कारण हेच होते म्हणूनच त्यांनी माईकवरून दादासाहेबांना बोलवायला सुरुवात केली होती, पण दादासाहेब तिकडं फिरकत नव्हते. शेवटी मंजुळाबाईनी जाहीरच केलं, 'दादासाहेबांनी नारळ वाढवल्याशिवाय शो सुरूच होणार नाही!' तेव्हा गावातील काही मोजके लोक त्यांना बोलवायला गेले आणि त्यांच्या मागोमाग मंजुळाबाईही! अनपेक्षितपणे मंजुळाबाई घरी आलेल्या बघून मात्र जास्त आढेवेढे न घेता दादासाहेब कार्यक्रमाकडे मूकपणे गेले, पण एका अटीवर-'नारळ वाढवून ते लगेच परत फिरतील.'

नारळ वाढवला तसं मंजुळाबाईंनी हात जोडून त्यांना स्टेजवरच बसायची विनंती केली.

मायबाप हो... हात जोडून गावकऱ्यांकडे बघून मंजुळाबाईंनी बोलायला सुरुवात केली. आज मी आपणास काय तरी सांगायला हितंवर आल्या. खेळाचं निस्त निमीत हाय. मायबाप हो...आपण समद्यानी जीवाचं कान करून ऐकावं. ऐका, मी मंजुळाबाई साठे... मंजुळाबाईनी त्यांचा सर्व जीवनपट उलगडला. लहानपणापासून गावोगावी फिरणे,वेगवेगळ्या ठिकाणी आलेले भलेबुरे अनुभव, आईच्या अचानक जाण्याने फडाची पेललेली जबाबदारी, फडाच्या टेम्पोला अचानक लागलेली आग, मदतीला देवासारखे धावून आलेले दादासाहेब. दादासाहेबांनी त्यांना नव्याने फड उभारणीसाठी केलेली अथ:ते इति पर्यंत केलेली मदत,आणि त्यांच्या भलेपणाचे कौतुक करताना मंजुळाबाईंचा कंठ दाटून आला. गावकरी मंजुळाबाईंच्या बोलाशी एकरूप झाले होते. मंजुळाबाईनाही आपल्यामुळे दादासाहेबांना जे भोगावे लागले त्याची बोच जिव्हारी लागली होती. त्यांना हुंदका अनावर झाला. इतका उशीर मान खाली घालून बसलेल्या दादासाहेबांनी मान वर केली. त्यांचे डोळे डबडबले. इतक्या वर्षात दादासाहेबांच्याही मनात दबलेली मानहानी अश्रूवाटे बाहेर पडली. पहाडासारख्या उत्तुंग माणसाच्या मनात दबलेलं इतक्या दिवसाचं दुःख, कोंडलेला निःश्वास भरलेल्या आभाळासारखा डोळ्यांतून अखंड पाझरू लागला. गावकऱ्यांच्या मनातील गैरसमज दूर झाला, पण दादासाहेबांच्या हृदयाला गेलेले तडे मात्र कधीच एकसंध होणार नव्हते. कारण या गावासाठी, गावाच्या भल्यासाठी, उत्कर्षासाठी, माणसांसाठी, चांगुलपणासाठी त्यांनी किती त्याग केलेला, किती खस्ता खाल्लेल्या, किती जिवाचे रान केलेलं त्यांनाच ठाऊक! आपल्या डोळ्यांसमोरच गावाच्या चांगुलपणाला आणि नीतिमत्तेला लागलेली ओहोटी त्यांना अस्वस्थ करत होती.

स्टेजवरून दादासाहेब शांतपणे उतरले आपल्या मूळ गावी परतण्याचा निश्चय करूनच! पाठोपाठ मंजुळाबाईही उतरल्या. आता वाड्यावर जाऊन वहिनीसाहेबांच्या मनातील किंतु पुसण्यासाठी त्यांची पावले वाड्याकडे वळली.

तिन्हीसांज झालेली होती. सूर्य आता अस्ताला चालला होता; पण क्षितिजापलीकडच्या गावात तो पुन्हा उगवून नवीन पहाट देणार होता...

**(या कथेतील सर्व पात्रे, घटना काल्पनिक असून त्यांचा जिवंत वा मृत व्यक्तींशी काहीही संबंध नाही.)**



# चांदीचा 'खरा शिक्का'

**डॉ. प्राजक्ता कोळपकर**
**पुणे**

काही काही लोक विचित्रच जन्माला येतात म्हणजे त्यांच्या येण्याने फार कोणाला आनंद झालेला नसतो किंवा त्यांच्या असण्याने सुद्धा कुणाच्या आनंदात भर पडत नाही. ती व्यक्ती सान्निध्यात असली काय किंवा नसली काय, भावनेचे ओझे कुणाचेही जड नसते त्यांच्याविषयी. तरीही ही माणसे जगत असतात त्यांच्या मर्जीने. चांगले जगतोय की वाईट हे समजण्याची त्यांची तरी कुवत कुठे असते? पण ठरलेली नित्याची कामे, दरवर्षीच योजिले कार्य त्यांच्या हातून पूर्ण नाही झाले तर नवल?

नुकतेच गणपती विसर्जन झाले. सगळ्या देशाला वेड लावणारा हा बाप्पा येतो आणि माहौल करून जातो. दहा दिवस घर, अंगण, शहर दमदमवून जातो. तो येतो कोणत्याही मागणीशिवाय; पण त्याच्याच मागण्या आहेत साऱ्या असे म्हणून लोक वाटेल तसा पाण्यासारखा पैसा उधळतात आणि भारतात सगळ्यात मोठी उलाढाल या दहा दिवसांत होते. होऊ देत! या उलढालीचे जगासाठी निर्विकार असणाऱ्या लोकांना मात्र काहीच घेणे-देणे नसते. दहा वर्षांपूर्वीचा साधेपणाने येणारा गणपती आता चांदीच्या मखरात येतो, गल्लीबोळातल्या गणपतीला आता मानाचे स्थान बहाल होते; मात्र मनाने दगड झालेल्या लोकांच्या ना राहण्यात बदल होत, ना

वागण्यात, ना कृतीत!

बावळ्या! आता कदाचित पन्नाशी उलटलेला असेल. तो जन्मापासून बावळट दिसत होता म्हणे म्हणून बावळ्या. असे गल्लीतल्या लोकांनी सांगितले. मी दिव्यांग मुलांसाठी काम करत असल्याने मला कळले तो कुठल्या जातकुळीचा आहे ते. तो गतिमंदात मोडतो आणि स्वमग्न आहे म्हणजे आपल्याच तालात जगणारा. पन्नास वर्षांपूर्वी त्याचा जन्म झाला आणि दुसऱ्या दिवशी बाप मेला. बाप पिऊन मेला असला तरी आपल्या या 'सुशिक्षित' लोकांनी बापाच्या मरणाचे खापर बावळ्यावर फोडले. तो कपाळ करंटा, पांढऱ्या पायाचा अशी विशेषण दिली आणि त्याच्या बारशाला त्याच्या आजीने पाळण्यात सुद्धा त्याला 'करंटा' म्हणून संबोधले. आईलाही तसेच वाटायचे म्हणून ती रोज त्याला 'वरवंटा' म्हणून हाक मारायची. आता तो साऱ्या गल्लीत करंटा, वरवंटा म्हणून प्रसिद्ध झाला होता. त्याचा कुणालाही त्रास नव्हता. मोठा होत गेला. बालपण कधी त्याला अनुभवायला मिळाले नाही, तो कधी मोठा झाला हे घरच्यांनाही कळले नाही. भरपूर जेवायचे. कुठे थांबायचे हे त्याला कळत नव्हते. तेव्हा खूप गरिबी असल्याने आईला त्याच्या खाण्याचा राग यायचा. ती त्याला दूध म्हणून शेंगदाण्याच्या कुटात पाणी घालून पाजायची तर हा चहा मागायला लागला. जाड भाकरी करून खाऊ घालायची तर हा चपाती मागायला लागला. त्यामुळे त्याची आई फार त्रस्त होती आणि आजीचे तोंड अखंड वाजत असल्याने एक दिवस कंटाळून आईने चुलीतले जलते लाकूड फेकून मारले त्याला. त्याला चटका बसला, तरी काहीही झाले नाही असे दाखवत तो आईजवळ लाकूड घेऊन गेला आणि म्हणाला- 'आई, जेवायला दे.  भाकरी नको चपाती दे.' आईच्या डोळ्यांत पाणी आले. त्याचा हा भोळा स्वभाव बघून आजीचेही डोळे भरले आणि आजीने त्याला जवळ घेऊन नवे नामकरण केले बावळ्या गं माझा. त्या दिवसापासून मात्र या दोघी ढालीसारख्या त्याच्या पाठीशी उभ्या राहिल्या.

आजी म्हातारी होती. आई कचरा गोळा करायला जायची, रस्ते झाडायची. तेव्हा ती बावळ्याला सोबत घेऊन जायची. कचरा उचलता उचलता त्याला इतकी सवय लागली की, ती दिसेल तिथला कचरा उचलायचा. खरे तर अशा गतिमंद किंवा स्वमग्न मुलांना एखादे काम शिकवले की ते चांगले-वाईट याचा विचार न करता नित्यनेमाने करत असतात; अर्थात हे त्याच्या आईला किंवा आजीला कळत नव्हते.



पण त्याला छोटी छोटी कामे करायला शिकवणे सुरू केले. हा दिसेल तिथला कचरा उचलायचा. आईच्या हद्दीतील, हद्दीच्या बाहेरचा सुद्धा. त्यामुळे तो थोड्याच दिवसात सगळ्यांच्या परिचयाचा आणि गळ्यातला ताईत ही झाला. तो उलटे उत्तर देत नसल्याने तो सगळ्यांना आवडायला लागला. तब्बल पंचवीस वर्षांपूर्वी त्यांच्याच गल्लीतल्या गणेश मंडळाने त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल सत्कार केला आणि त्याला तेव्हा चांदीचा शिक्का भेट म्हणून दिला. तोसुद्धा मान्यवरांच्या हाताने आणि त्यांनी सांगितले- 'आता आजपासून कचरा गोळा करायचा नाही, तर कचरा

गोळा करणाऱ्यांवर देखरेख करायची.'

आईच्या आणि आजीच्या डोळ्यांचे पारणे फिटले आणि आजीने तो शिक्का देव्हाऱ्यात ठेवला. त्याची पूजा या बावळ्याला करायला सांगितली आणि आजतागायत त्याच्या पूजा करण्यात खंड पडला नाही. त्या शिक्क्याची रोज तो पूजा करतो आणि खिशात घेऊन फिरतो. शिक्का म्हणजे त्याचे हृदय असल्यासारखे तो सांभाळतो. या बावळ्याची मध्यंतरी आजी वारली आणि बावळ्याला खूप धक्का बसला. तो धक्का असा होता की, त्याने शिक्क्याची पूजा करणे थांबवून दिले. आई त्याला रोज आठवण करून देत असूनही तो पूजा करायला नकार द्यायचा. पण रोज त्याच्या पायजम्याच्या खिशात तो असायचा; आणि अजूनही आहे.

रस्त्यात कचरा उचलत असताना टीव्हीवर त्याने पाहिले की प्लॅस्टिक आपल्या पृथ्वीला खाऊन टाकेल...प्लॅस्टिकमुक्त धरती व्हायला पाहिजे. ऐकलेले त्याला नीटसे कळले नव्हते. त्याने शेजारच्या दादाला जाऊन विचारले आणि दादाने त्याला प्लॅस्टिकची सगळी माहिती दिली, तर बावळ्या पटकन त्या दादाला म्हणाला, 'मग आजपासून मी प्लॅस्टिकच गोळा करणार.' आईला घरी जाऊन सांगितले- 'आता मी कचरा गोळा करणार नाही; तर प्लॅस्टिकचा कचरा गोळा करणार. तो दिवसभर आता प्लॅस्टिक गोळा करतो रस्त्यावरचे, गल्लीतले आणि घराघरातले. अक्षरशः तो लोकांच्या घरोघरी जातो आणि प्लॅस्टिक गोळा करतो. त्या घरी तोंड वर करून घरच्यांना रागवून येतो आता प्लॅस्टिक वापरू नका, मी पुन्हा या घरात प्लॅस्टिक घ्यायला येणार नाही. हे प्लॅस्टिक शेजारच्या भंगारात विकतो आणि त्यातून त्याला पैसे मिळतात. त्याच्या भरवशावर हल्ली त्याचे घर चालू शकते; म्हणजे घरचा खर्च त्या भंगारातून निघतो. आता त्याची आई थकल्यामुळे हल्ली ती कामाला जात नाही, पण त्याचीही एक कथा आहे. एक दिवस प्लॅस्टिक विकून तो घरी गेला आणि आईला म्हणाला, 'या महिन्यात किती पैसे झाले?' तर आई म्हणाली, 'तीनशे सोळा रुपये.' तर तो आईला पटकन म्हणाला, 'आई, आता मी कमावतो ना मग तू आता काम करू नको.' आईला त्याचं काहीच अप्रूप वगैरे वाटले नाही, कारण त्याचे बोलणे आजही लोकांसाठी तसा चेष्टेचा विषयच असतो. पण हल्ली ती कामाला जात नाही. कुणी विचारले तर तोच सांगतो, 'मी सांभाळतो न तिला?' सगळी वाक्यं त्याच्या तोंडी फिल्मी स्टाइलनीच असतात. दिवसभर पिक्चरची गाणी मोडकी-तोडकी म्हणतच असतो. त्याच्या आईसाठी खूपदा हा रोजचा रतीब म्हणजे डोकेदुखी असते. प्रचंड बोलत असतो आणि बोलण्याच्या मानाने काम संथ करतो. पण हुशार मात्र बिघडलेली मुले जेव्हा त्याची आई बघते तेव्हा ती- तिच्या पदरात देवाने बावळ्या दिल्याबद्दल आभारच मानते.

हा भेटलाच मला गणपतीच्या मिरवणुकीत. इतक्या गर्दीतही पाण्याच्या बाटल्या गोळा करत होता आणि पुन्हा बाटलीतले पाणी पिऊ नका म्हणून त्यांना दरडावत होता. तो मिरवणुकीच्या वेळेस मला तीनदा कुठे कुठे भेटला आणि मग उत्सुकता वाढत गेली त्याच्याबद्दल जाणून घेण्याची. वारकरी जेव्हा पुण्यात येतात तेव्हा तो आळंदीपासून ते पंढरपूरपर्यंत वारीत जातो आणि फक्त प्लॅस्टिक गोळा करतो. ज्या गावात जातो त्या गावात प्लॅस्टिक विकतो आणि पैसे घेतो. परत पुढच्या टप्प्यावर पुढचे प्लॅस्टिक उचलायला मोकळा. प्लॅस्टिक विकल्यावर किती पैसे घ्यावे किंवा मिळाले हे त्याला कळत नाही; पण डाटा फिट केल्याप्रमाणे काम करतोय. कित्येक वर्षे. आई आता खूप थकलीय त्याची; पण आईला आता त्याची चिंता नाही. तिच्याशिवायही तो जीवन जगू शकेल याची तिला खात्री झालीय. अतिशय बोलबच्चन असणारा हा बावळ्या खऱ्या अर्थाने पृथ्वीवरचा प्लॅस्टिकचा भस्मासुर कमी करतोय. पण गल्लीतले लोक त्याला चेष्टेने 'प्लॅस्टिक मॅन' म्हणतात.

यालाच ध्यास म्हणत असावे. इतके झपाटल्यागत काम करणे कदाचित सुशिक्षित आणि समंजस माणसालाही जमणार नाही आणि असे काम ज्यातून पृथ्वीच वाचवण्याचे काम तो करतोय. त्याला तत्त्वज्ञान कळत नाही, जगण्याचे फार मोठे सूत्रही कळत नाही; पण जगणे कसे असावे? आणि जगाने कसे जगावे? हे लाखमोलाचे तत्त्वज्ञान तो या सुशिक्षित लोकांना सांगून जातो. मी त्याला म्हटलं, प्लॅस्टिक मॅन, मी तुमच्यावर लिहिणार आहे, तुमचा एखादा फोटो द्या? तो पटकन रडवेला सूर करून म्हणाला, नको नको, फोटो काढला तर मी मरून जाईन. फोटो नको. हे त्याचे तत्त्वज्ञान कुठले होते माहिती नाही; पण बिचाऱ्याला प्रसिद्धीही नको हे किती कमालीचे नाही का? मला फोटो काढून त्याचे मन दुखवायचे नव्हतेच मुळी, पण त्याचा फोटो मनात फिट्ट बसलाय. तो असा, उंच, धिप्पाड, वरचे दात पडलेले, एकच शिल्लक, डोळ्यांवर जाड भिंगाचा चष्मा, अंगात ढिला ढगळ मनिला आणि पायजमा. पायजम्यात चांदीचा कळकटलेला शिक्का. प्लॅस्टिक गोळा करायला एक जाड दाभण दोरीत ओवलेली. प्लॅस्टिक मिळाले की दाभणीने दोरीत ओवायचे आणि पाठीवर घेऊन जायचे. पाठीवर नुसते प्लॅस्टिक नाही तर पृथ्वीवरचा भस्मासुर घेऊन जातोय हा बावळ्या....प्रश्न पडतोय हा बावळ्या कसा? हा तर चांदीचा खरा शिक्का!



# गजरा

**शुभांगी दळवी**
शाहूनगर, सातारा.





'इकडं आड आनं तिकडं हीर' अशी हालत झाल्या जिंदगीची. काय करावं, कायबी कळंना पोरी…संध्याकाळच्या वेळी दिनाकाका बोलला. त्याच्याऐवजी, भिंतीवर टांगलेल्या कॅलेंडरवरील श्रीदेवीच्या फोटोवर तिची नजर खिळली होती. हात श्रीदेवीच्या फोटोतील गजऱ्यावरून फिरत होता.

काय म्हणतूया मी नंदेऽऽ? ध्यान कुटं आसतंय तुझं?

त्याची लेक नंदा गडबडून म्हणाली,

हीऽऽ काय?

काय करतीस त्या नटीसंगं..? दिनाकाका भडकला.

आरं, तिचा, गजरा. मला आसा गजरा लई आवडतो. आणणार का मला एकदा आसा गजरा?

नंदाला प्रत्युत्तर न देताच, काहीतरी आठवल्यासारखा काका झटकन उठला. आपल्या मोडलेल्या पायाला काठीचा आधार देत, घराबाहेर जाऊ लागला.

आता ह्या टायमाला कुटं निगालास, तात्या? इति नंदा.

आलोच. जरा, जाऊन येतो.

लवकर ये. भाकरीचं जुगाड करते तवर……

अंथरुणावर मुटकुळा होऊन पडलेल्या आपल्या आईला दोन घोट पाणी पाजून, नंदा चुलीकडे वळली. चुलीच्या धुराच्या वासानं लहान भावंडं तिच्याभोवती गोळा झाली. चुलीचा विस्तव फुलला, पटापट भाजलेल्या भाकरी भुकेल्यांच्या तोंडी पडल्यावर नंदाचा जी-वही समाधानाने फुलून गेला.

नंदेऽऽ, मी आलो बरं का! काय आसलं दुरडीत तर आण वाढून. दोन घास भागत्यालं पाणी प्यासाठनं…..

बाहेरून जाऊन आलेल्या दिनाकाकाने लेकीला हाक दिली.

लगबगीने तिने उरलेली भाकरी, भाजी, चटणीची चिमट ताटात घालून तात्यापुढे ठेवले.

व्हयं, काय जमलं का कुटं कामाचं……?

आऽऽ , नाई. एक गोष्ट हाय हातात. परी……

काय ते स्पष्ट बोल बा.

त्याऽऽ, खालच्या आंगचा किसना हाय नव्हं? त्येनं….

हां, त्येचं काय……?

आगं, त्येनं एक स्थळ आणलंय तुझ्यासाठनं. बक्कळ पैशेवाला शेट हाय म्हणतूया त्यो. वरच्या जातीचा बी हाय. आपून काय बी द्याचं नाय. समदं शेट बघणार लग्नाचं. चार दिसानं लगीन करायचं म्हणलाय शेट………

दिनाकाका भरभरून बोलत राहिला. नंदाही त्याच्या बोलण्यावर विचार करत राहिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच किसन दिनाकाकाच्या घराबाहेर हजर.

एऽऽ तात्या, हाईस नव्हं घरात?

हाऽऽ. यं, आत यं.

दिनाकाकाने किसनला बसायला घोंगडी पसरत नंदाला हाक मारली,

आगं, नंदूऽऽ ऐकलंस का? च्या टाक. किसना आलाय.

रात्री पासून विचारांच्या गाडीत बसलेल्या नंदाने होकार दिला. काही मिनिटांत ती चहाचा कप घेऊन हजर.

हं. घ्या काका, ह्यो च्या पिऊन घ्या.

हां. आण, आनं यं बघू, हिथं आशी बस जरा. किसन बोलला.

त्ये नव्हं काका, दळभद्री खोपटात राहणारी माणसं आम्ही. वरच्या जातीचा शेट, राणासिंग! काय म्हणून माझ्यासंगट लगीन करत आसंल.

नंदाने आपल्या विचारांची कोंडी फोडली.

आगं पोरी, पैशेवाला शेट हाय राणासिंग. बायलीचं पॉटपाणी पिकलं नाय. तवा दुसरी बायकु हुडकतोय. जात-पातीचा ईचार नाय, पोरगी चांगल्या वळणाची पायजे म्हणला. तशी तुझी सय झाली मला.

आवं काका, लई वयाचा असणार त्यो?

त्यो…..? आता ते म्हणायचं. दोन दिसात तुझं कुक्कू होत्याल राणासिंग. हाईस कुटं? नंदाच्या आईनं बजावलं.

तुला काय बी कमी पडणार नाई तिथं. नुसती दिवाळी आसत्या रोज. शेटानी हुशील लगीन करून.

दिनाकाकाने समजूत घातली.

आनं, गजरा बी मिळणार का घालायला.? नंदा.

ह्या भली थोरली बाग हाय राणासिंगजींची.

किसनने हात पसरत, मोठ्या उत्साहात सांगताच नंदाची कळी खुलली.

घरच्यांनी जवळजवळ सगळंच ठरवलं होतं. जेमतेम दहा-वीचं तिचं शिक्षण. सौंदर्य म्हणाल तर चार चौघींसारखीच सामान्य रूपरंग. आईचं आजारपण, अपघातात आलेले दिनाकाकाचे अपंगत्व. पाठची चार लहान भावंडं. मोठ्ठं शिक्षण तर सोडाच पण रोजच्या भाकरीची चणचण. नवा कपडा कधीतरीच मिळायचा. आई-वडीलांनी कुणाकडे हात पसरून आणलेले खाणे-पिणे व कपडे यातच समाधान मानत ती जगत होती.

बालपणाच्या आठवणींचे धागे जुळवून बघेपर्यंत सुमनच्या नव्या आयुष्याची, मुहूर्ताची वेळ दारात येऊन थांबली.

बरं का नंदू? शहाण्यासारखी वाग. आमचं नाक खाली हुईल आसं काय करू नगं. मोठ्या खानदानी घरात निगालीस बाय माज्ये. धीरानं घे. सासरच्या चौकटीतनं भाईर पाय काडताना लई ईचार कर. शेटच आता तुझा देव हाईत. तुझ्या म्हायेराचा उद्धार करायचे हाईत ते. संभाळून घे समद्यासंगं.

कपाळावर मुंडावळ्या बांधलेल्या नंदाला तिची आई शहाणपणाच्या चार गुजगोष्टी सांगत होती.

व्हयं गं आये, समदं ध्यानात ठेवीन. काळजी करू नको.

मोजक्याच लोकांमध्ये लग्न आटोपल्यावर नंदा राणासिंगच्या गाडीतून रवाना झाली. गाडी एका मोठ्या वाड्याकडे जाऊ लागली तशी नंदा कौतुकाने गाडीच्या खिडकीला बिलगली.

बाबाऽऽ.........., एवढ्या मोठ्या वाड्याची शेटानी हाय व्हयं मी? नंदेऽऽ ,...... नशीब काडलंस गं बाय!

नंदा अशा विचारातच होती अन् राणासिंगनी गाडी वाड्याच्या शेजारी असणाऱ्या लहानशा घराकडे नेण्याचा हुकूम ड्रायव्हरला दिला. ती हिरमुसली. अनेक प्रश्नांच्या कल्लोळातच गाडीतून उतरून देवाजींच्या मागोमाग चालत त्या घरात गेली.

हं, हे तुझं घर. रोज सकाळी वाडयात यायचं. दिवसभराची कामं उरकून पुन्हा तुझ्या घरात येऊन आराम करायचा. आमच्या सौ. म्हणजे सरस्वतीदेवी, सांगतील ते ऐकायचं. तुला काय हवं, नको ते सर्व त्यांनाच सांगायचं. राणासिंगनी सुनावले.

व्हयं जी. आवो, पण तुम्ही..

तिला मधेच थांबवून राणासिंग बोलले,

आमच्या सौंची तब्बेत बरी नसते म्हणून तुला मोलकरीण म्हणून नेमलंय, हेच सौंना वाटू देत. फार बोलत बसायचं नाही. फक्त काम करायचं नि इथं येऊन बसायचं आणि हो, मला, अहो नाही तर शेटजीच म्हणायचं, समजलं?

हूं ! इति नंदा.

त्यानंतर राणासिंगनी सांगितल्याप्रमाणे नंदाची दिनचर्या पक्की झाली. महिना सरल्यावर एका रात्री तिच्या दारावर टकटक झाली.

आऽऽ.............? कोण..? नंदाने विचारले.

आम्ही, शेटजी. बाहेरून उत्तर आले.

लगबगीने नंदाने दरवाजा उघडला.

झोकांडी खात राणासिंग आत शिरले.

दारूच्या वासाने घर भरून गेले.

नंदाने दरवाजा आतून बंद केला.

राणासिंगनी आपल्या सदऱ्याच्या खिशातून कागदाची पुडी काढून तिच्या हातात दिली.

हं. घे. गजरा आवडतो ना तुला..? राणासिंगचा प्रश्न.

व्हयं. लईऽऽ.... नंदाचे भाबडे उत्तर.

घे मग.

राणासिंगची वासनेने भरलेली नजर त्या गजऱ्यासोबतच तिच्या

सर्वांगावर भिरभिरू लागली. तिने गजरा घेण्यासाठी पुढे केलेला हात खसकन ओढून त्यांनी तिला आपल्या बाहुपाशात आवळले.

ती गुदमरली.

पण आईच्या गुजगोष्टींची आठवण होताच, शांतपणे शेटजींच्या पुढ्यात स्वतःला तन-मनाने अर्पण करून मोकळी झाली.

त्यानंतर हे सतत घडू लागले. रात्र झाली की, दारूच्या वासात गजऱ्याचा दरवळ घुसमटून जाऊ लागला. हळूहळू तिला गजरा आवडेनासा झाला.

चार-पाच महिन्यांतच नंदाला नवी चाहूल लागली. नेहमीप्रमाणे ती वाड्यात काम करत असताना सरस्वतीदेवी  झोपाळ्यावर बसून काहीतरी वाचत होत्या. थोड्या वेळातच नंदाला मळमळून उलटी झाली.

काय गं? काय होतंय? सरस्वतीदेवींनी विचारले.

बाईसाहेब, मला दिवस गेलेत वाटतंय.

नंदा अडखळली.

हं, मग..ठीक. त्यात विशेष काय? शेटजी तुझ्याकडे येतात म्हणजे हे होणारच. सरस्वतीदेवी शांतपणे म्हणाल्या.

अं..? म्हणजे तुम्हाला हे समदं नंदा.


हो. मला माहिती आहे सगळं. मोलकरीण आहेस हे फक्त मला दाखवायला. तुझ्याआधी एकीला असंच आणलं. तिनं मुलगीला जन्म दिल्यावर हाकलून दिली. मग तुला आणली.

नंदा सुन्न. गरोदरपणामुळे गजराही दरवळायचा थांबला. तिने मनाशी निर्णय पक्का केला.

काही महिन्यांनी एका अंधाऱ्या रात्री नंदाने एका गोंडस मुलाला जन्म दिला. तोंड दाबून तिने साऱ्या वेदना सहन करत, बाळाची नाळ कापून स्वतःची व्यवस्थित 'सुटका' करून घेतली. ठरविल्याप्रमाणे तिने आपल्या लेकराला कापडात गुंडाळले आणि पहाट होण्याआधीच ती तिथून पसार झाली. तिला आता तो गजरा पुन्हा दरवळत ठेवायचा नव्हता. तेजाळलेली नवी पहाट तिचे स्वागत करत होती.

●●






# लाल पानाची राणी

श्री. मधुकर धर्मापुरीकर
मूळ कथा : फणीशवरनाथ रेणू

काय, मेळ्याला जायचं नाही वाटतं, बिरजूच्या आईला?

बिरजूच्या आईने रताळी उकडून ठेवली होती आणि अंगणात बसून ती मनातल्या मनात चांगलीच वैतागलेलीही होती. सात वर्षांचा बिरजू रताळ्यांसाठी हट्ट धरून होता अन् त्याच्या बदल्यात आईचा मार खाल्ला होता त्याने. आता, अंगणात लोळून-लोळून सगळा धुळीने माखला होता. चंपियाच्या अंगात भूत संचारलेलं आहे. अंगणात ऊन होतं, तेव्हा गेलीय सटवी त्या सावकारणीकडे काळा गूळ आणायला, अन् अजून नाही आली! आता दिवेलागणीची वेळ होत आलीय, येऊ तर दे कार्टीला! गोठ्यात बांधलेल्या बकरीच्या कोकराला गामाशीने हैराण केलं होतं. सारखं उड्या मारीत होतं ते. त्याच्यावर राग काढायचं निमित्तच शोधीत होती बिरजूची आई. परसातल्या फुललेल्या मिरचीची रोपं - या कोकराशिवाय कोण करणार त्याची नासधूस! मातीचं ढेकूळ घेऊन त्याच्यावर उगारणार तोच, शेजारीण मखनी मौसीचा आवाज कानी आला होता



''काय, बिरजूची आई, नाच पाहायला नाही जाणार का?''

''हूं! बिरजूची आई रिकामटेकडी-एकटी थोडीच आहे, आगा न पिछा नसलेली!''

धुसफुसत टोचून बोललेल्या गोष्टीतला इशारा समजून मखनी मौसीचा तळतळाट झाला. बिरजूच्या आईने हातातलं ढेकूळ टाकून दिलं. बिचाऱ्या कोकराला गोमाशीने हैराण केलं, 'छी! छट, छी!'

अंगणात लोळत असलेल्या बिरजूने तशीच त्या कोकराला काठी फेकून मारली. बिरजूच्या आईला संताप आला; वाटलं, की याच काठीनं बिरजूला बडवून काढावं. त्याच्या अंगातलं भूत काढावं!

पण तिकडे लिंबाच्या झाडाखाली पाणी भरायला जमलेल्या बायकांच्या गप्पा पाहून ती थांबली. बिरजूला मग दटावू लागली, ''थांब, तुझ्या बप्पानं फार चढवून ठेवलंय तुला! थांब, फार हात चालवतोस नं, बघच तू आता!''

लिंबाच्या झाडाजवळ मखनी मौसी होती. खाली वाकून तिने भरलेली घागर उचलून कमरेवर घेतली आणि जाताना सगळ्या बायकांसमोर बिरजूच्या आईची, तशा बोलण्याची तक्रार मांडू लागली

''पाहा की या बाईचा तोरा! चार मण जूटचा पैसा काय आला, जमिनीवर पाय नाही राहिले तिचे! तुम्हीच सांगा, खुद्द गल्ली-गल्लीत फिरत आपल्या तोंडाने होती सांगत - या वेळी बिरजूचे बप्पा सगळ्यांना बैलगाडीत घेऊन जाणार बलरामपूरच्या मेळ्याला, बैल आता घरचेच आहेत, तर बैलगाड्या हज्जार मिळतील, म्हणून मी सहज विचारलं, मेळ्याला जाणाऱ्या सगळ्या जणी तर स्वैपाकपाणी करून तयार आहेत, तर असं बोलली पाहा! माझंच मेलीचं चुकलं, कशाला बोलावं मी? माहीत आहे का, काय बोलली मला ती?''

मखनी मौसी आपल्या बोळकं झालेल्या तोंडाला मुरकून तोऱ्याने बिरजूच्या आईचे शब्द ती ऐकवू लागली.

''म्हणे, बिरजूची आई अशी रिकामटेकडी थोडीच आहे, आगा-पिछा नसलेली!''

जंगीची सून बिरजूच्या आईची पर्वा नाही करत. ती अगदी मोकळ्या आवाजात बोलू लागली,

''मौसी, सर्व्हे सेटलमेंटच्या वेळी, तू सुद्धा फलछाप किनारीवाली साडी नेसून साहबांच्या बंगल्यावर वांग्यांची टोकरी भरून पोचवली असतीस ना, तर तुझ्या नावानेसुद्धा काळ्याभोर जमिनीचा तुकडा मंजूर झाला असता बरं! मग तुझ्या घरीही आज सोनाबंग जूट राहिला असता, बैलांची जोडीसद्धा विकत घेतली असतीस! मग पुढे-मागे चार माणसं राहिली असती तुझ्या दिमतीला!''

जंगीची सून फटकळ आहे. रेल्वे स्टेशनजवळची पोरगी आहे. तीन महिनेच झाले तिला नांदायला येऊन! आणि कुर्मा वस्तातल्या सगळ्या सास्वांशी तिची एकदा तरी बाचाबाची झालेली आहे. तिचा सासरा सराईत चोर आहे - वाह्यात आहे, तिचा नवरा रंगी हा कुर्मा वस्तीच्या टोळीचा नामी लाठीधारी! म्हणूनच तर जंगीची सून ही नेहमोच शिंगं उगारून फिरत असते कुठेही.

बिरजूच्या आईच्या अंगणात या जंगीच्या सुनेचे गळा ताणून बोललेले शब्द गुलेरमधून सुटलेल्या खड्यांसारखे सणसण करीत आले. बिरजूच्या आईनेसुद्धा त्याला तितकेच सणसणीत उत्तर शोधून काढले, पण मनात दडपून टाकले. ...शेणात दगड कशाला मारायचा?

जिभेवरचा जाळ आवरून बिरजूच्या आईने आपली मुलगी चंपियाला आवाज दिला- 'अरे चंपियाऽऽ, आता आलीस, की तुझी मुंडी मोडून चुलीत टाकते बघ! दिवसेंदिवस बिघडत चालली आहे कार्टी! गावात तर आता बाइस्कोप अन् सिनेमातली गाणी म्हणणाऱ्या टवळ्या गोळा झालेल्या आहेत, कुठे त्यांच्याचबरोबर 'बाजे न मुरलिया' म्हणत बसली असेल कार्टी, चंपियाऽऽ.'

जंगीच्या सनेने भरलेली घागर उचलली आणि बिरजूच्या आईच्या बोलण्यावर नखऱ्याने बोलू लागली,

''चल, दीदी चल, इथल्या गल्लीत लाल पान भकभक करीत पेटलेली आहे.''

भगभग बिजली-बत्तीचे नाव ऐकताच सगळ्या जणी विनाकारण मोठमोठ्याने हसायला लागल्या. मौसीच्या फुटक्या दातांतून एक तिखट शिवीसुद्धा निघाली- 'शैतान की नानी!'

बिरजूच्या आईच्या डोळ्यांवर जणू काही कुणी प्रखर प्रकाशाचा झोत टाकला - भगभग बिजली-बत्ती! ...तीन वर्षांपूर्वी गावातल्या सर्व्हे कॅम्पनंतर गावातल्या कुजक्या डोक्याच्या बायकांनी एक बातमी घडवून-मढवून फिरविली होती- 'चंपियाच्या आईच्या अगणात रात्रभर बिजली-बत्ती भगभगत होती! चंपियाच्या आईच्या अंगणात रात्रभर नोकदार वाहनांच्या खुणा, . घोड्यांच्या टापांसारख्या...' जळू दे, आणखी जळू दे! चंपियाच्या आईच्या अंगणात चांदीसारखे जूटचे धाग वाळत घातलेले पाहून हेवा करणाऱ्या बायका... आता खळ्यावर सोनौली धान्याच्या पेंढ्या पाहून तर जळून जळून त्यांचं वांग्याचं भरीत होऊन जाईल!

गाडग्यातून पघळणारा गूळ बोटांनी चाटत-चाटत आलेली चंपिया आइच्या थापडा खाऊन ओरडू लागली. '' अं! मला का मारतेस? ती सावकारीण लवकर देतच नाही, त्याला मी काय करू?''

सावकारीण लवकर देत नाही! कार्ट, त्या एकटीच्याच दुकानात काय मोती आहेत का, तिथं तुंबून बसली होतीस ते, बोल! लाथ मारून थोबाडच फाडते तुझं, सटवे!, पुन्हा म्हणून तर पाहा 'बाजे न मुरलिया...' त्या स्टेशनच्या पोरींकडे चाल शिकायला जातेस, नाही का?'

बिरजूच्या आईने आपला आवाज जंगीच्या झोपड्यांपर्यंत पोचेल अशा हिशोबानेच वाढविला होता.

बिरजू आता झालेलं विसरून गेला होता आणि अंग झाडून आता तो गाडग्यातून ओघळणाऱ्या गुळाकडे नजर लावून होता. दीदीसोबत तो जर दुकानात गेला असता, तर त्याला जरूर गूळ खायला मिळाला असता; पण तो इथे रताळ्याच्या मोहात पडला होता आणि त्याच्यापायी त्याच्या आईने...

''ए आई, एक बोट गूळ दे ना!' त्याने आईसमोर तळहात पसरला. दे ना थोडासा...!'

''एक बोटभरच काय, परसात जाऊन सगळं गाडगंच पालथं करून येते, जा चाटत बस तिकडे! नाही करणार आता गोड दशम्या! दशम्या खायची नुसती मरमर चाललीय!'' उकडलेल्या रताळ्यांचे सूप चंपियासमोर ठेवून ती सांगू लागली,

'बसून त्याच्या साली काढ बघ, नाहीतर...!

दहा वर्षाची चंपिया जाणून आहे, रताळी छिलताना कमीत कमी दहा-बारा वेळा आई आपल्याला मारणार, छोट्या-छोट्या गोष्टींसाठी शिव्या देईल, पाय पसरून काय बसलीस-निर्लज्ज कुठली!... चंपिया आईचा राग पूर्ण ओळखून आहे.

बिरजूने परिस्थितीचा फायदा घेऊन लाडीगोडीने विचारले, आई, मीसुद्धा रताळी छिलू का गं?

''नाही!'' आई ओरडली एक रताळं छिलशाल तर तीन रताळी पोटात! त्या सिद्धूच्या सुनेला जाऊन सांग, एका घंट्यासाठी म्हणून घेऊन गेली, ती परत करायचे नाव नाही! मागून आण ती कढई! जा लवकर!

पडलेल्या चेहऱ्याने जाता-जाता बिरजूची नजर पुन्हा रताळी आणि गुळावर गेली. चंपियाने आपल्या झग्याआड हात घेऊन आईकडे पाहिले आणि तिची नजर चुकवून हळूच एक रताळे बिरजूकडे फेकले. बिरजू पळाला.

''सूर्यनारायण मावळले, दिवेलागण झाली आणि अजन गाडी...''

मध्येच चंपिया सांगू लागली, ''कोयरी वस्तीत कुणी दिली नाही गाडी आई! बप्पानी सांगितलं, सगळी आवरासावर करून तयार राहा, मलदहिया वस्तीतून मियांजानची गाडी आणायला चाललो म्हणून

सांग!''

हे ऐकताच बिरजूच्या आईचा चेहरा उतरला. वाटू लागलं, उघडलेली छत्री अचानक मिटली! कोयरी वस्तीतल्या कुणी गाडी नाही दिली! आता काय मिळणार गाडी? आपल्याच गावातल्या लोकांच्या डोळ्यात जर आपल्यासाठी पाणी नाही, तर मलदहिया वस्तीच्या मियांजानचा काय भरोसा! सगळेच तीन तेरा झाले. 'आता काय फायदा ती रताळी छिलून? ठेव उचलून. हा माणूस मेळा दाखवणार! बैलगाडीत बसवून मेळ्यातला नाच दाखवायला नेणार! बसले बैलगाडीत, पाहिला तुझा मेळा अन् तो नाच! पोटभरून पाहिला बरं! तिकडे पायी जाणाऱ्या सगळ्याजणी तेव्हाच पोचल्या असतील.'

छोटी कढई डोक्यावर पालथी ठेवून बिरजू परत आला. ''दीदी पाहा, मिलीटरी टोपी! याच्यावर दहा लाठ्या मारल्या तरी काही नाही होणार!''

चंपिया चुपचाप बसून होती. काही बोलली नाही. थोडीसुद्धा हसली नाही. बिरजू समजला - आईचा राग अजून उतरला नाही.

गोठ्यातन बकरीच्या कोकराला सोडन देताना बिरजची आई बडबड लागली 'उद्याच पंचकौडीच्या कसायाला देऊन टाकते याला! राक्षस नुसता! जिथे तिथे तोंड खुपसतो! चंपिया, त्याच्या गळ्यातली घंटी काढून टाक बरं! सारखं टुन-टुन! मला दुसरं काही सुचेना!'

'टुन-टुन' असं ऐकलं की बिरजूला सडकेवरून जाणाऱ्या बैलगाड्यांची आठवण झाली. आताच बबुआन वस्तीतल्या गाड्या मेळ्याला जात होत्या, नाच पाहायला... झुन झुन... बैलांच्या गळ्यातल्या घंटा... तू ऐकलंस?

''नसती बडबड करू नको! बछड्याच्या गळ्यातून धुंगरू काढताना चंपिया दटावू लागली.

''चंपिया, चुलीत पाणी टाक! बप्पा आले तर सांग त्यांना, त्यांच्या हवाई जहाजात बसून जा म्हणावं नाच पाहायला, मला नाही हौस त्या मेळ्याला जायची. मला कुणी उठवू नका, माझं डोकं दुखू लागलंय!''

ओसरीतून बिरजूने हळूच विचारले, ''दीदी, मेळ्यात हवाई जहाजसुद्धा उडणार आहे का?''

चटईवर गोधडी टाकून बसताना चंपियाने बिरजूला गुपचूप जवळ येऊन बसायचा इशारा केला, फुकटच मार खाईल बिचारा...

बिरजू मग बहिणीच्या गोधडीत घुसून आकसून बसला. थंडीच्या दिवसांत असं अंग दुमडून गुडघ्यावर हनुवटी ठेवून गप्प बसायचं तो शिकला आहे. चंपियाच्या कानाजवळ तोंड धरून त्याने विचारले, ''आपण मेळ्याला नाच पाहायला नाही जाणार? गावात तर एक पाखरू नाही, सगळे गेलेत...''

चंपियाला आता तर तीळभर भरोसा राहिला नाही. संध्याकाळची चांदणी दिसते आहे, बप्पा अजून गाडी घेऊन नाही आले... एक महिन्यापासूनच आई सांगत होती, बलरामपूरच्या मेळ्याच्या दिवशी गोड दशम्या बनविणार, चंपिया ठिपक्यांची साडी नेसेल, तर बिरजू पँट घालणार. बैलगाडीत बसून...

चंपियाच्या भरलेल्या डोळ्यांतून एक अश्रू ओघळला..

फार फार वाईट वाटू लागले. मनातल्या मनात त्याने चिंचेच्या झाडावर राहणाऱ्या जीनबाबाला एक मोठं वांगं कबूल केलं - रोपट्याचं पहिलं फळ, बिरजूने स्वतःच्या हाताने लावलेले ते वांग्याचे रोपटे! 'जीनबाबा! बप्पांना लवकर पाठव रे...!'

ओसरीच्या आतल्या खोलीत बिरजूची आई चटईवर निजून होती. ती अस्वस्थ होती. 'छे! आधीच ठरवायला नाही पाहिजे कुणी! ठरविलेलं सगळं देवाने मोडून टाकलं!' तिला आता देवाला सगळ्यात आधी विचारायचे आहे, की ही कोणत्या चुकीची शिक्षा देतो आहेस भोलेबाबा! कुणा देवता-पितरांचे इच्छा-संकल्प तिने पुरे करायचे ठेवले असे कधी झाले नाही. सर्वेच्या वेळेस जेवढे नवस कबूल केले होते, ते तर सगळे व्यवस्थित पूर्ण केले होते, पण... महावीरजींचा नवस तसाच राहिला की! अरे देवा! चुकलं-माकलं तर क्षमा करा महावीरबाबा! आता कबूल केलेलं दुप्पट करून नवस फेडेल ही बिरजूची आई! शप्पथ!_ त्या जंगीच्या सुनेचं बोलणं राहून-राहून बिरजूच्या आईच्या मनात घुमते आहे- भक-भक बिजली-बत्ती! ...चोरीमारी करणाऱ्यांच्या पोरी-सुना मत्सराने जळतील, नाहीतर काय! बिरजूच्या बप्पाने पाच बिघे जमीन काय मिळविली आणि सगळ्या भावकीतल्यांच्या पोटात लागले की दुखायला! शेतात भरभरून आलेले जूटचे पाट पाहून गावातल्या लोकांची छाती दडपली! जमीन फोडून पीक तरारले! वैशाखातल्या आभाळासारखे भरून आलेले ते सगळे पीक, उन्मळून पडले होते. आणि अलाण्या फलाण्या कितीतरी लोकांच्या वाकड्या नजरा त्या पिकाला कशा बरे सोसतील? पंधरा मणाची खात्री असताना, केवळ दहा मणाचा काटा झाला त्या रब्बी भगताच्या आडतीवर!

याच्यात द्वेष करायचा मुद्दाच कुठे येतो बरं? कुर्मा वस्तीच्या प्रत्येक माणसाला बिरजूच्या बप्पानी आधीच सांगितलेलं होतं, की आयुष्यभर मजरीच करीत राहणार मग पाहा तम्ही! सहेंचे दिवस येत आहेत, सगळ्यांनी मनावर घेतलं तर दोन-चार बिघे जमीन मिळवू शकता, मात्र गावातल्या एकाही बयेच्या भ्रताराने सर्वेच्या वेळेस त्या बाबूसाहेब जमीनदारासमोर तोंड उघडले नव्हते! बिरजूच्या बप्पाने थोडं सोसलं काय! बाबूसाहेब जमीनदार, सर्कशीतल्या वाघासारखे ओरडत होते, त्यांच्या मोठ्या पोराने धमकी दिली होती-घरच पेटवून देईन म्हणून! मग बाबूसाहेब जमीनदाराने आपल्या सगळ्यात धाकट्या पोराला पाठविले होते. बिरजूच्या आईला त्याने 'मौसी' म्हणून हाक दिली होती. 'ही जमीन बाबांनी माझ्या नावे खरेदी केली

होती. माझं सगळं शिक्षण याच जमिनीच्या उत्पन्नावर चालू आहे... आणखी काय काय!' एवढंसं पोर, पण किता काकुळतीला येऊन बोलत होतं! क्षणभर मोह पडला होता त्या विनवणीचा! जमीनदाराचा बेटा आहे का हा -

''चंपिया, बिरजू झोपला का? इकडे आत ये बिरजू, तूसुद्धा ये चंपिया... भला माणूस एकदा येऊ तर दे आज...'' बिरजूसोबत चंपिया आत गेली.

''चिमणी विझव... बप्पांनी हाक मारली तरी गप्प राहायचं, कडी लावून टाक!''

भला माणूस रे भला माणूस! तोंड पाहा त्या भल्या माणसाचं! ...बिरजूची आई रात्रंदिवस पाठीमागे लागली नसती, तर काय मिळविली असती याने जमीन! रोज येऊन डोकं धरून बसायचे. 'मला जमीन नको आहे बिरजू की मां, मजुरीच चांगली!' यावर मग कंटाळून बिरजूची आई म्हणायची, 'सोडून द्या! जर तुमचं मनच नाही तर काय करणार! जोरू-जमीन जोर के, नही तो किसी और के...'

बिरजूच्या बप्पाचा राग मात्र मोठा तेजीने चढणारा! चढत जाणारा. बिरजूच्या आईचं नशीबच खराब, असा गोबरगणेश नवरा तिला मिळाला! कोणतं सुख-चैन तिला दिलं आहे तिच्या नवऱ्याने! घाण्याच्या बैलासारखे राबून राबून सगळे आयुष्य काढले याच्या घरात, कधी पैशाची जिलेबी आणून दिली आहे का या दादल्याने! ...आडतीमधून पाटाचे आलेले पैसे घेऊन हा बाहेरच्या बाहरच गेला त्या बैल बाजारात. बिरजूच्या आईला एकदा त्या नोटासुद्धा डोळ्यांनी पाहू नाही दिल्या त्याने... बल घेऊन आला घरी. त्या दिवसापासूनच सगळ्या गावात दवंडी द्यायला सुरुवात केली मग - 'बिरजूची आई यंदा बैलगाडीत बसून जाणार आहे मेळ्याला-नाच पाहायला!' हुं! दुसऱ्याच्या गाडीच्या हवाल्याने हा नेणार मला!

शेवटी बिरजूच्या आईला स्वत:वरच राग होऊ लागला. ती तरी कुठे गप्प होती? आपल्या तोंडात विस्तू पडू दे! बैलगाडीत बसण्याची लालसा कोणत्या अभद्र वेळी आपल्या तोंडून निघाली, देव जाणे! शिवाय आज सकाळपासून दुपारपर्यंत सतरा वेळा बैलगाडीतन मेळ्याला जायचा विषय काढला होता! ...घे पाहन घे नाच! वाह रे नाच! गोधडीच्या आतन रेशमी शालीचं स्वप्नं पाहायचं! पहाटे पाण्याला जेव्हा ती जाईल, तेव्हा सगळ्या फटकळ टवळ्या फिदीफिदी हसत येतील, फिदीफिदी हसत जातील! सगळे तिच्यावर जळतात, हो दाढीजळक्या भगवानसुद्धा!... दोन पोरांची आई होऊनसुद्धा ती जशीच्या तश्शी आहे! घरवाला तिच्या शब्दाच्या बाहेर नाही. ती डोक्याला खोबऱ्याचे तेल लावते, तिची स्वत:ची जमीन आहे. आहे का कुणाजवळ उकंड्याएवढी तरी जमीन, अं! जळणारच ना! तीन बिघे जमिनीत आता साळ लावलेली आहे, मार्गशीर्षाची! पण लोकांच्या विषारी नजरेतून सांभाळायला तर पाहिजे नं!

बाहेर बैलांच्या चुंगरांचा आवाज आला. तिघे सतर्क झाले. कान लावून ऐकू लागले.

''आपल्याच बैलांचे चुंगरू आहेत, होनं चंपिया?''

चंपिया आणि बिरजू यांनी एकदमच उत्तर दिले, ''हं! हो...''

''चूप!'' बिरजूच्या आईने धुसफुसत सांगितले, ''गाडीसुद्धा आहे, धडधड वाजते आहे नं!''

''हो, हो...' दोघांनी पुन्हा हुंकार भरले.

''चूप! गाडी नाही, चंपिया तू गुपचूप जाऊन पाहा बरं, दार काढू नको, फटीतून गुपचूप पाहून ये जा!''

चंपिया मांजरीच्या पावलाने गेली, फटीतून पाहून परत येऊन तिने म्हटले, ''हो आई, गाडीसुद्धा आहे!''

बिरजू धडपडत उठून बसला. त्याच्या आईने हात धरून त्याला ओढले, निजविले. ''बोलू नको!''

चंपियासुद्धा गोधडीत घुसली.

बाहेर बैलगाडा सोडल्याचा आवाज आला. बिरजूच्या बप्पाने बैलावर आवाज चढविला, ''अरे, हो! आलोत घरी! घरी यायची मरमर चालू होती!''

बिरजच्या आईने ओळखले, जरूर मलदहिया बस्तीत गांजाची चिलीम चढविली असणार, आवाज तर मोठा खणखणीत येतो आहे!

''चंपियाऽऽ'' बाहेरूनच तिच्या बप्पाने हाक मारून म्हटले, बैलांना चारा टाक, चंपियाऽऽ.

आतून काही उत्तर नाही आले. चंपियाच्या बप्पाने अंगणात येऊन पाहिले तर ना उजेड, ना दिवा, ना चुलीत विस्तू! काय झालं?... मेळा-नाच पाहण्यासाठी उतावीळ होऊन पायीच निघून गेली का सगळी?

बिरजूच्या घशात खरखर झाली आणि थांबवायचा भरपूर प्रयत्न केला, तरी जमले नाही. आणि खोकला सुरू झाला, की पाच मिनिटं तो खोकलतच राहिला.

''बिरजू, बेटा बिरजमोहन!'' बिरजूच्या बप्पाने गोडीने बोलावले, ''आई रागावून झोपली का रे... अर, आता तर लोकं चाललीत की.''

बिरजूच्या आईच्या मनात आले, कचकन द्यावे त्याला उत्तर- नाही जायचे मेळ्याला अन् नाच पहायला, परत पाठवून द्या गाडी!

''चंपिया ऊठ की! हे बघ, या साळीच्या ओंब्या ठेवून दे.'' ओसरीवर साळीची पेंडी ठेवून चंपियाच्या बप्पाने आवाज दिला- दिवाबत्ती करा! ।

बिरजूची आई उठून ओसरीवर आली. ''एवढ्या उशिरा गाडी आणायची काय गरज होती? मेळ्याचा नाच तर आता संपला असेल!''

चिमणीच्या प्रकाशात साळीच्या पेंढीचा रंग पाहताच बिरजूच्या

आईच्या मनातले मळभ दूर झाले! ...पोपटी रंग तिच्या डोळ्यांतून तिच्या रोमारोमात भरून गेला.

''नाचाचा कार्यक्रम अजून सुरूसुद्धा झाला नसेल. आत्ताच बलरामपूरच्या बाबूसाहेबाची कंपनी गाडी मोहनपूर डाकबंगल्यावर मोठ्या साहेबांना आणायला गेली आहे. या वर्षी हा शेवटचा कार्यक्रम आहे म्हणे. ...या आब्या कुठेतरी खोचून ठेव! आपल्या शेतावरचे धान्य आहे.''

''आपल्या शेतावरचे धान्य?'' उल्हासाने बिरजूच्या आईने विचारले. साळ आली काढायला?''

''अजून नाही! मार्गशीर्षाच्या शेवटी-शेवटी तांबूस होऊन झुकेल सगळ्या साळीचं पीक! ...मलदहिया वस्तीकडे जाऊ लागलो, तर आपल्या शेतातलं पीक पाहून नजर ठरना! काय सांगू, रोपं काढताना बोटांना थरथर सुटली होती माझ्या!''

बिरजूने रोपाच्या टोकातली एक ओंबी काढून तोंडात टाकली आणि त्याच्या आईने त्याला थोडे दटावले,

''काय हावरट आहेस रे तू?... या पोरट्यांमुळे काही नेम-धर्म राहिलेच नाहीत!''

''काय झालं, का ओरडतेस?''

''नवान्न करायच्या आधीच धान्य उष्टं करून टाकलं, पाहिलं नं?''

''अरे, या पोरांना सगळं काही माफ असतं! पक्षी-पाखरासारखी असतात ही पोरं! फक्त आपल्या दोघांच्या तोंडात नवान्नाच्या आधीच नवीन धान्य पडू नये म्हणजे झालं!''

बिरजच्या पाठोपाठ चंपियानेसद्धा नवीन धान्याचे चार दाणे काढन तोंडात टाकले. वाह आई! एवढा गोड आहे तांदळ!''

''आणि सुगंधसुद्धा आहे नं दीदी?'' बिरजूने पुन्हा दोन ओंब्या तोंडात टाकल्या.

''गोड दशम्या केल्या का...'' बिरजूच्या बप्पाने खुशीत विचारले.

''नाही!'' मानभावी सुरात बिरजूची आई सांगू लागली, गाडीचा पत्ता नाही, अन् दशम्या करायच्या?

''वाहवा! तुम्हीसुद्धा विचित्र माणसं आहात - ज्याच्याजवळ बैल आहेत, त्याला गाडी बरी मिळणार नाही उधारीवर? गाडीवाल्यांनासुद्धा बैलांची जरुरी राहीलच की! ...कोयरी वस्तीच्या लोकांनी विचारू तर दे, मग सांगेन! जा, जल्दी बनव गोड दशम्या!''

''उशीर नाही का होणार?''

''अरे टोपलंभर भाकरी तर तू पाहता पाहता बनवितेस की! पाच दशम्या बनवायला किती वेळ लागणार!''

आता बिरजूच्या आईच्या चेहऱ्यावर खुशी उमलली. तिने नजर चुकवून बिरजूच्या बप्पाकडे पाहिले- बिरजूचा बप्पा तिच्याकडेच टक लावून पाहत होता. चंपिया अन् बिरजू नसते, तर मनातली गोष्ट हसून खुलायला वेळ नसता लागला. चंपिया आणि बिरजूने एकमेकांकडे पाहिले आणि खुशीने त्यांचे चेहरे खुलले. ...आई विनाकारणच राग राग करीत होती नं!

''चम्पी! जरा तिकडे जाऊन मखनी-मौसीला आवाज दे नं!''

'ए मासी! मौसी, तुला आई बोलावते आहे, मौसी!''

मखनी मौसीने सरळ उत्तर दिले नाही, पण तिची बडबड मात्र स्पष्ट ऐकायला आली- 'हं, आता मौसीचा का धावा करत आहात, अं? सगळ्या वस्तीत एकच तर आगा-पिछा नसलेली मौसी आहे नं?'

''अरे मौसी,'' बिरजूच्या आईने हसून त्याचे उत्तर दिले. ''त्या वेळी राग आला होता का! आगा-पिछा असलेल्याला येऊन पाहा- आता रात्र होते आहे, तेव्हा गाडी घेऊन आले आहेत! ये नं मौसो, मला त्या गोड दशम्या नाही जमत.''

मखनी मौसी खोकत खोकत आली. ''याच्यामुळं दिवस असतानाच विचारीत होते, की तुम्ही मेळ्याला नाच पाहायला जाणार नाहीत का? सांगितलं असतं, तर मी माझी शेगडो इथेच आणून पेटविली असती.''

बिरजूच्या आईने मौसीला शेगडी दाखवून दिली आणि म्हटले, ''घरात दाळ-दाना तर नाही काही, एक कोकरू आहे आणि काही भांडीकुंडी! आणि रात्रभरासाठी इथे तंबाखू ठेवून जाते आहे. आपला हुक्का घेऊन आलीस नं मौसी?''

मौसीला तंबाखू मिळाली, तर एक रात्रच काय, पाच रात्री जागत बसू शकते. मौसीने अंधारातच चाचपडून तंबाखूचा अंदाज घेतला... हात सोडून तंबाखू ठेवला आहे, बिरजूच्या आईने! आणि ती एक सावकारीण! रामा रामा! त्या रात्री अफीमच्या गोळीएवढी चिमूटभर तंबाखू ठेवून गेली होती गुलाब-बाग मेळ्याला, अन् जाताना सांगून गेली वरून, की डबीभर तंबाखू आहे!

बिरजूची आई चूल पेटवायला लागली. चंपियाने रताळे चुरून गोळे बनविले आणि डोक्यावर कढई पालथा ठेवून बिरजू मिरवू लागला- मिलिटरी टोपी! यावर दहा दंडे मारले तरी काही होत नाही!'

सगळे जण खळखळून हसू लागले. बिरजूची आई हसत हसतच सांगू लागली, कोनाड्यात तीन चार मोठी मोठी रताळी आहेत- दे बिरजूला, चंपिया! बिचाऱ्याने संध्याकाळपासूनच-

''बिचारा म्हणू नको आई, खूप चाबरा आहे तो!'' आता चंपिया मिटक्या मारीत सांगू लागली, ''तुला काय माहीत, गोधडीच्या आतून काय चालू होतं ते! बाबूसाहेबाचं तोंड का वाजत होतं ते?''

''ही ही ही...'' बिरजूचे दुधाचे दात पडले आहेत. तुटक्या दातातून त्याचे शब्द बाहेर पडले- ''बिलेक-मार्टिनमध्ये पाच रताळी खाऊन टाकली, हा हा हा!''

सगळीजण हसू लागली. मखनी मौसीचं मन राखण्यासाठी बिरजूच्या आईने विचारले, ''एवढा ढेकूळ भरून गळ आहे, अर्धा टाकू मौसी?''

मौसी भरभरून सांगू लागली, ''अरी, रताळी मुळातच गोड असतात, तेवढा गूळ कशाला?''

चारा-पाणी घेऊन बैल एकमेकांना चाटू लागले, तेव्हा बिरजूची आई तयार झालेली होती. चंपियाने ठिपक्यांची साडी नेसली होती आणि बिरजू- पँटला बटण नसल्याने पटसनच्या दोऱ्याने कंबरेला बांधू लागला.

बिरजच्या आईने अंगणात येऊन अंदाज घेतला, 'उं! इतका वेळ पायी जाणारे थोडेच थांबले असतील!'

पौर्णिमेचा चंद्र डोक्यावर आलेला आहे. असली रुप्याची बिंदी बिरजूच्या आईच्या कपाळावर रुळत आहे. पहिल्यांदाच ही बिंदी तिने लावलेली आहे. बिरजूच्या बप्पाला काय झाले आहे? गाडी का लावत नाहीय तो? तोंडाकडेच पाहत आहे टकमक टकमक...! जसं काही मेळ्याच्या नाचातल्या लाल पानची...

गाडीत बसल्या बसल्या बिरजूच्या आईच्या सगळ्या देहात एक अजब अशी सळसळ भरून राहिली. तिने गाडीच्या ताटव्याच्या खांबाला धरून म्हटले, गाडोत आणखी जागा आहे, जरा डाव्या बाजूच्या रस्त्याने घ्या...'

बैल जेव्हा धावू लागले आणि गाडीची चाकं करकर वाजू लागली, तेव्हा न राहवन बिरज सांग लागला, ''हवाई जहाजासारखी चालवा बप्पा गाडी!''

गाडी जंगोच्या वस्तीमागे पोचली. बिरजूच्या आईने म्हटले, ''जरा जंगीला विचारा नं, तिची सून मेळ्याला गेली आहे का नाच पहायला?''

गाडी थांबताच झोपड्यांतून येणाऱ्या रडण्याचा आवाज स्पष्ट झाला. बिरजूच्या बप्पाने विचारले, ''अरे जंगी भाऊ, काय रडारड चालू आहे अंगणात?''

जंगी वैतागून गेलेला होता, म्हणाला, ''काय सांगावं! रंगी बलरामपूरहून परतला नाही, सूनबाई नाच पाहायला कसं जाणार? वाट पाहून पाहून तिकडे गावातल्या सगळ्या बायका केव्हाच निघून गेल्या!''

''अरी स्टेसनवाली! तर रडायला काय झालं?'' बिरजूच्या आईने आवाज दिला. ''ये ये लौकर कपडे बदलून, सगळी गाडी रिकामी पडलेली आहे! बिचारी! ये ये... लौकर! ''


बाजूच्याच झोपडीतून राधेच्या पोरीने विचारले, ''काकी, गाडीत जागा आहे का... मीसुद्धा येईन!''

वेळूच्या बागेच्या कडेला लरेना खवासचे घर आहे. त्याची सूनसुद्धा नाही गेली. सोनेरी मुलाम्याचे धुंगूर असलेला घागरा घालून छमछम करीत येते आहे.

''ये, ये! जे कुणी राहिलं आहे, या लवकर!''

जंगीची सून, लरेनाची सून आणि राधाची पोरगी- सुनरी; तिघी गाडीजवळ आल्या, तसा बैलाने मागचा पाय झाडला. बिरजूच्या बप्पाने त्याला एक शिवी हासडली, ''साला, लात मारून सुनेला काय लंगडी करशील काय?''

सगळे खळखळून हसू लागले. बिरजूच्या बप्पाने चुंगटात लपलेल्या दोन्ही सुनांकडे नजर टाकली. त्याला आपल्या शेतात



झुकलेल्या साळीच्या पिकाची आठवण झाली!

तीन महिन्यापूर्वीच जंगीची सून नांदायला आलेली आहे. येतानाची रंगीत साडी! त्या साडीला मोहरीच्या तेलाचा अन् लठवा सिंदूरचा सुगंध येतो आहे. बिरजूच्या आईला तिच्या, त्या दिवसांची आठवण झाली- नांदायला आलेल्या दिवसांची. गुंडाळलेल्या कपड्यातून तीन गोड दशम्या काढून ती म्हणाली, ''खाऊन घ्या एक-एक. सिमराहच्या सरकारी नळावर मग पाणी पिऊ.''

गाडो गावाच्या बाहेरून साळीच्या शेतांच्या बाजूने जाऊ लागली. कार्तिकाची चांदणी... शेतांतून साळीचा घमघमता वास दरवळतो आहे. वेळूच्या बनातून दुधी गवताच्या लता फुललेल्या आहेत. जंगीच्या सुनेने एक बिडी पेटवून बिरजूच्या आईच्या पुढे केली. बिरजूच्या आईला अचानक आठवले- चंपिया, सुनरी, लरेनाची सून आणि जंगीची सून; या चौघीजणी तर गावात बाईस्कोपची गाणी गात असतात, त्यांना चांगले गाताही येते!

गाडीची वाट आता शेतातल्या भरल्या पिकांतून जाते आहे. चहूबाजूंनी नांदायला येणाऱ्या सासुरवाशिणींच्या साड्यांची सळसळ असावी तसा आवाज येतो आहे... बिरजूच्या आईच्या माथ्यावर बिंदीमध्ये चांदणी चमकते आहे...

''हं, आता एक बाइस्कोपचं गाणं तर म्हण चंपिया... लाजायला काय झालं, जिथं विसरशील, तिथं तर बाजूला मास्तरीण बसली आहे, सांगेल की!''

दोन्ही सनांनी तर नाही, पण चंपिया आणि सनरी यांनी आवाज लावन गळा व्यवस्थित केला.

बिरजूच्या बप्पाने बैलांना आवाज़ दिला, ''चल भैय्या! आणखी जोरात! चंपिया, म्हण गाणे, नाहीतर मी बैलांना सांगेन हळूहळू चला म्हणून!''

जंगीच्या सुनेने चंपियाच्या कानाजवळ धुंगट घेऊन काहीतरी सांगितले आणि चंपियाने सुरू केले, 'चंदा की चांदनी...'


बिरजूला जवळ घेऊन बसलेल्या त्याच्या आईचीपण इच्छा झाली - आपणही त्यांच्यासोबत गाणं म्हणावं. तिने जंगीच्या सुनेकडे पाहिले - तीसुद्धा हळूहळू गुणगुणत होती. किती गोड आहे ही सून! तिच्या अंगावरच्या त्या साडीचा एक खास असा गंध येतो आहे. ठीक तर म्हटलं आहे तिने! बिरजूची आई राणी आहे, लाल पानाची राणी!


ही तर काही वाईट बात नाही. हो, ती खरंच लाल पानाची राणी आहे!

आपल्या नाकाकडे दोन्ही डोळ्यांना केंद्रित करायचा प्रयत्न करून बिरजूच्या आईने आपल्या रूपाचा अंदाज घेतला. लाल साडीचा झिलमिल किनार, बिंदीमध्ये चंद्र...

.....बिरजूच्या आईच्या मनात आता कोणतीही लालसा राहिली नाही. तिला झोप येते आहे.

**'पद्मगंधा प्रकाशना'च्या आगामी 'तीसरी कसम आणि इतर कथा' या पुस्तकातून साभार.**




MADE IN INDIA



# समांतर

**सौ. अंजली कुलकर्णी मुतालिक**
कुडाळ.

पायऱ्या चढून ती वर येताना याचा नेमका नेम चुकायचा. हळुवारपणे काळजाचा ठोका पण चुकायचाच. ती एकदाची येऊन शेजारच्याच खुर्चीत येऊन बसली की यांचा कॅरम खेळ बहरत जायचा. एकामागोमाग एक सोंगट्या पॉकेटमध्ये जाऊन अक्षरशः कडेलोट करून घ्यायला तयार व्हायच्या. ती हसताना, एकटक सोंगटीकडे पाहताना हा तिच्यावर टक लावून असायचा.

ए खेळ ना!..ए खेळ ! १० सेकंद ओलांडून गेली हा...तुझं लक्ष कुठे असतं?

समोरून दुसरी मैत्रीण त्याला झापायची. भराभर भरकटलेलं मन कसतरी गोळा करून जीव एकवटून हा आपली टर्न खेळायचा..

त्यांच्या इतक्या गेल्या आपल्या अजून सात वरती आहेत असं पुटपुटत क्वीनला कोणतं कव्हर राखता येतंय का ते तो शोधत राहायचा...याच्या मनाचा हा राजा ती क्वीन असायची. याची स्वारी सदा भरकटत चाललेली जाणवायची तिलाही!

स्ट्रायकर पास करताना अलगद तिच्या बोटांना कधी हाताला तो मोरपिशी स्पर्श व्हायचा. पॉकेटच्या सोंगट्या काढताना तर तो मुद्दामच तिच्या हाताखाली आपला हात धरायचा. त्या वेळेस ती किंचितशी लाजत आपला हात सोडवून घेत असे.

तिची एखादी सोंगटी तिला घेत असताना थोडक्यात पॉकेटवर आपटून थोडी वरती राहिली की हा 'श्या'! असं तो म्हणत असे. पुन्हा त्याच्या मेंदूला आपल्या सोंगट्या काळ्या की पांढऱ्या असा प्रश्न त्याला पडायचा! मग तिच्याकडे पाहत कोणती मारू? असं विचारताना ती खुणेने त्याची ती 'पांढरी'वाली हे लक्षात आणून देत असे. आपल्या दोघांत काहीही नाही हे दाखवायचा कितीतरी प्रयत्न सुरू असायचा तिचा...खरं तर पांढरं-काळं हे निमित्त! नऊ पांढऱ्या, नऊ काळ्या जगात ती राणी आणि तिच्यासाठी कायम मदतीला आलेला तो कव्हर होऊन जायचा!

कॅरमवरील लख्ख त्या शंभरच्या दिव्याचा उजेड तिच्या भुरकट केसांवर विसावायचा. कितीदा तरी मिचमिच डोळ्यांनी तो तिचे उडणारे केस मनातल्या मनात मागे सरकवायचा...तिच्या मनमोहक हास्यासह तिच्या कानातील गोलाकार झुंबरे डोलू लागायची. त्या लयीत हा कुठल्या कुठे हरवत जायचा...

समोरचा बोर्ड आभाळभर चांदण्या माखलेला त्याला दिसायचा... तिला आभाळभर मुक्त पक्ष्यासारखं विहरत जाताना मोकळ्या श्वासात कितीतरी गुलाबी स्वप्नं दिसायची.....कॅरमच्या बॉर्डरवर बोटांनी मार्क लिहिताना तो सहज हात झटकत काहीच झाले नाही असे आविर्भाव आणत भाव लपवत राहायचा....एकत्र खाणं....एकाच बाटलीत पाणी पिणं....सगळं समजून उमजून चालायचं दोघांचं. पुन्हा काहीच न झाल्यासारखं एकटक!....तीन डावात त्यांची टीम आघाडीवर असायची. चौथ्या वेळी खरंतर खेळायची काहीही गरज नसायची.


इथपर्यंतच सगळा डाव त्याच्या नावे असायचा...आता आपलं कोणतं? काळं की पांढरं? असा विचार करत ती कधीच हातात धरू न येणाऱ्या काळाला हुलकावणी देत हसत सुटायची...तो फक्त पाहत राहायचा!

सगळीच नाती त्या कॅरम बोर्डच्या आकारासारखी कोणत्यातरी चौकटीत बसवता येत नसतात...कधीतरी आयुष्याचे असे काहीसे न कळणारे रिबाऊंड असतात की फक्त अनिमिष नेत्राने ते पाहातच बसावे लागतात...!

तिला असं खूपदा वाटत राहायचं,

तुझ्यामुळे अर्थ आहे सगळ्याला की सगळ्यामुळे तुलाच! नकोच अडकत राहू असल्या अर्थवाही शब्दांत! मराठीत व्यक्त नाही होता येत. still whats happening in the heart is truth. it cant stop by any cause. know the limits. want to fly high and the teritory where no one will say whats the problem!..

तुझ्यासोबत दूर कुठेतरी निघून जावं वाटतं. हिरव्यागार झाडांनी नटलेलं एक सुंदर निळसर तळं असावं त्यात पाय सोडून आपण दोघं बसावं. बाकी काहीच बोलायचं नाही...का, कधी, किती वाजलेत असले प्रश्न कुणी कुणाला विचारत बसायचे नाहीत. एकटक पाहत राहायचं. हळूहळू एकेक पक्षी आसपास फिरताना दिसेल त्याबद्दल भरभरून बोलायचं. त्याची लकब त्याची प्रचलित



नावं आणि सगळं आपल्याला माहिती असलेलं! झाडांबद्दल बोलायचं. झूलॉजी, बॉटनीत आपल्याला किती उमजेल ते ते सगळं इतकं बोलायचं की सगळ्या झाडांना आनंदानं नाचावस वाटावं. अगदी तलावाच्या गळ्यातील, तळातील दगडधोंडे-मातीवर बोलायचं. मग तू विचार मला...तू खरंच तुझ्या आयुष्यात सुखी आहेस ना?

मी हो म्हणत....हम्म म्हणत....तुझा हात हातात घेऊन बोलेन. हम्म...तुझा आश्वासक स्पर्श मला अजिबात अश्लील ओंगळ वाटणार नाही. मी तुझ्या रुंद खांद्यावर माझं डोकं टेकेन...आपोआप माझ्या डोळ्यांतून आसवं टिपकायला लागतील. तू म्हणशील- ए रडायला काय झालं? सगळं ठीक आहे ना वेडाबाय? ए ए? एक दोनदा तू गालावर टिचकी मारशील. हसशील.

म्हणत राहशील

काय असतं ना आयुष्य एकेक...नक्की काय मिळवायचं काय गमवायच कळतंच नाही कधी कधी!

कधी आपलं कोण? परकं कोण? प्रेम म्हणजे मी आता जे काय करतो ते प्रेम

की तुझा प्रत्येक प्रॉब्लेम मला माझा वाटतो हे प्रेम?

अलगद तू डोळे पुसशील. फक्त तुझा आणि माझा विचार करूया. असं म्हणत अलगद बोटांनी माझ्या गालावरील बट बाजूला करशील. मी तुझा असताना असं कधीच रडायचं नाही हा..असं परत परत सांगशील. झाडाच्या सावल्या लांबट होत जातील. तसं तू म्हणशील ए..चल ना आपण निघूयात....मुखवटे लावून परत खोट्या दुनियेत जायचेय ना?

असं एकमेकांना समांतर असलेलं आयुष्य सुरू असताना अचानक एक दिवस असा येऊन जातो अन् ...पुन्हा नव्याने श्वास वाढतात...तिला त्या संध्याकाळची आठवण परत परत आयष्यभर पुरून उरते.

कधी हुरहूर वाढवणाऱ्या कातरवेळी अचानकच तुझा फोन यावा नि तिसऱ्याच मिनिटात तू दारात दत्त म्हणून उभा राहावास.



माझ्याकडे पाहत तुझी नेहमीची बडबड सुरू केलीस, इकडून चाललो होतो वाटलं सहज फोन तर करू नि तू आहेस का आधी पाहू. पण अजिबात विचार न करता आलो पटकन.

जरासा ब्रेक घेत पुन्हा,

...आलं आहे का? चहा कर ना मस्त!

खरंतर एक चहा तू कुठेही १० रु देऊन पिऊ शकला असतास. पण तुला तुझ्या काही खास गोष्टी मला सांगाव्या वाटतात. घरातले बाकीचे कुठे गेले याची चौकशी होते कोणी नाही हे जाणवताच तू माझ्या मागून किचनपर्यंत येतोस.

गप्पा सुरू होतात. ते ना ते असं...झालं. मीपण हो, हं, हा..अशी हची सगळी बाराखडी तुझ्यासमोर आळवून रिकामी होते. चहाही गोष्ट एकट्याने पिण्याची नाहीच असं म्हणत मी तुला कंपनी देत सोबत टेबलावर तुझ्या  पुढ्यात बिस्किटे सरकवते. मग बिस्किटे तब्येतीला किती वाईट असतात याने पचन वगैरे कसे मंदावते असे म्हणत आपण दोघेही पार्ले जीचा अख्खा पुडा फस्त करतो.

ए आता आठवलं कालच मी भडंग केलं आहे असं म्हणत मी डिशमधून डब्यात असलेलं भडंग आपल्या समोर ठेवते. मी एकेक कढीपत्ता खात बसते. तू नेमका शेंगदाणे उचलत बसतोस. पटकन शेवटचा शेंगदाणा तुला मिळू नये म्हणून मी ए मला मला ह म्हणत मोठा बकणा भरते. माझ्या तोंडाला तिखट मसाला पूड आजूबाजूला लागलेली असते. तू सांगतोस इथे बघ इथे लागलंय. असं सांगत माझ्या गालावरचा मसाला झटकून देतोस.

खूपच तिखट झालंय का रे भडंग? माझा हा सस्स हा सस्स करत तुला प्रश्न. तू म्हणतोस थोडं जास्ती तिखट आहे, पण तेवढं हवंच गं. तू माझ्या लाल झालेल्या ओठाकडे नि डोळ्यांत आलेल्या पाण्याकडे पाहतोस. एकदम सर्दी व्हावी असं तांब्याभर पाणी आपण दोघे संपवून टाकतो. हॉलमध्ये येऊन तू समोर tv सुरू असताना मोबाईल चार्ज करत करत काही तरी ग्रुप ढवळू लागतोस. मी सोफ्यावर आडवी पडून पेपर वाचायला लागते.

आता तू एकदम हळू आवाजात बोलायला सुरुवात करतोस. हा जोक वाचला होतास काय? असं म्हणत मोबाईल पाहत हसू लागतोस. मला पण कुतूहल वाटून मी तुझा मोबाईल हिसकावून घेते. मला सेंड कर हा म्हणत आपण एकाच मोबाईलमध्ये जोक पाहतो.. नि मोठ्याने हसू लागतो.

इथपर्यंत सगळं ठीक होतं. मी हसता हसता तू म्हणतोस ए तू अशीच हसत राहा. खूप मस्त दिसतेस. हसणारी तू मला खूप आवडतेस. मी हाहाहा करून त्यावर पण एक जोक करते. तू अशीच हसत राहा. मला काय करायचं लोकं तुलाच वेडी म्हणतील.

असं नाही गं असं म्हणत तू खोलवर माझ्या डोळ्यांत पाहशील. मी लाज वगैरे न बाळगता तुझ्याकडे एकटक पाहत बसेन.

काय करावं काही सुचत नसताना तू अधिकच जवळ येशील मला पण ते सगळं हवंहवंसं होऊन जाईल. आपले उष्ण श्वास जवळ येतील. तू ए ए असं म्हणत माझे गालावर आलेले केस मागे सरकवशील. तिन्हीसांजा ढळून जातील. एकेक दिवे मंद होतील. केवळ दोन मनं एकरूप होतील...घट्ट बाहुपाशात डोळे पण मिटतील... खोलीभर तुझ्या माझ्या प्रेमाचा सुगंध दरवळत राहील.

तू म्हणशील अग मला असं काही करायचं नव्हतं गं. मला माफ कर. असं म्हणत माझ्याच कुशीत शिरत पोटभर रडून घेशील..

पापपुण्य नाती विचार मनात येतील. डोकं सैरभैर होऊन जाईल. जे झालंय ते विसरून जा म्हणशील. मला परत परत तुझे स्पर्श आठवत राहतील. तुलाही. एक मोठा उसासा सोडून आपण आपली कामं करत राहू सुरुवातीला होती तशीच.

सगळ्याच क्षणांचे हिशेब मागू नयेत. काही अनवधानाने घडून जातं ते उगाळत बसू नये, असं म्हणत आपण दोघे आपली आपली स्वतंत्र वाट चालत राहू. एकमेकांना कायमची समांतर असलेली!



# तथास्तु

# वास्तुपुरुष म्हणे 'तथास्तु'

**सौ. जुई कांदळगावकर**
पुणे.

घटना तशी जुनी आणि माझ्या लहानपणीच्या बऱ्याच आठवणींमधील खास आहे. म्हणतात ना-''यथा चित्तं तथा वाचो, यथा वाचस्तथा क्रिया॥'' जसे तुमचे मन त्याप्रमाणे तुमची वाणी असेल आणि त्याप्रमाणेच तुमचे कार्यदेखील घडेल.

अगदी हेच मला माझी लाडकी आजी सांगायची. तेव्हा फारसे कळायचे नाही. परंतु तिने काहीतरी गंभीर सांगितले म्हणजे त्यात तथ्य असणारच असा आपला पक्का समज करून सुधारणामतवादीचा आवेश माझ्यासोबत लहान भावांचा असायचा. थोडक्यात म्हणजे सर्वानुमते नीटच राहायचं आणि शिस्तीत बोलायचं.

तर घटना अशी, की त्या दिवशी मी फारशी काही खूष नव्हते. कारण कुठेतरी काहीतरी बिनसले होते. आजकाल सतत जाणारे मूड आणि मूड स्विंग्सचे प्रकार असे काहीसे ते प्रकरण असावे. जास्त महत्त्वाचे ही नाही; पण मनातून जात ही नाही ह्या प्रकारे अवघड कोंडी करणारे.

प्रकरण एवढेच, की आपल्या भल्या मोठ्या सोळा खोल्यांच्या

घरात प्रायव्हसी किंवा निवांतपणा नाही. सतत एकत्र कुटुंब पद्धतीतील आपलीच लोक आणि त्यांचे आपण असणे, एवढेच काय ते जग. नुकतीच मोठी होणारी मी जेव्हा ही कुरकुर घेऊन बसली तेव्हा एरवी सतत काम करून चंचल असणारी आपली मोठी बहीण आज का बरं विचारवंत झाली? हे बघून माझे तीन लहान भाऊ कुतूहलाने मला विचारू लागले.

तेव्हा त्यांना मी प्रायव्हसी म्हणजे एकांतपणा किती महत्त्वाचा आहे आणि तो कसा आपल्या घरात नाही, हे जीव तोडून सांगायला सुरुवात केली. जसे की आम्हाला मोकळा वेळ असताना ही काम ला जुंपणे, टीव्ही पाहताना नेमकं सतत उठवणे, झोपलेलं असताना उठून 'दुसरीकडे जाऊन झोप' म्हणून झोपमोड करणे, अभ्यासाला बसले की 'पाणी आण' 'चहा आण' सांगून भंडावून सोडणे, गाणे ऐकू म्हटले, की 'बंद करा.' म्हणून टोकलेले ऐकणे, सतत उठबस करायला लावणे इत्यादी घरातील अडचणी. ह्यात कमी की काय म्हणून सर्वांनी मिळून कुठलेही एक काम करण्यासाठी एकत्र येणे मग ती तुमची इच्छा असो की नसो म्हणजे कहरच.

हे सर्व ऐकण्यात ह्या बिचाऱ्यांना मजा तर येतच होती; पण नेमकं करायचं काय? आणि हिला सांगायचं काय? हे मात्र समजण्याच्या पलीकडे जात होते. त्यापेक्षा ताईला साथ दिलेली बरी असा सर्वानुमते विचार पक्का करून आमचं शिष्टमंडळ आजीकडे न्याय द्या म्हणून सांगायला गेले.

आजीने नेमके म्हणणे आणि विषय समजून घेताच चर्चेला सुरुवात केली. आम्ही चार विरोधक जास्तच आक्रमकपणे आमची बाजू मांडायचा प्रयत्न करत तर होतो; परंतु म्हणावा तसा प्रभाव काही पडत नव्हता. त्यामुळे जरा जास्त त्वेषाने मीच म्हणून गेले की ''सगळा दोष ह्या एवढ्या मोठ्या घराचा आहे.'' भरपूर खोल्या परंतु सगळ्या खचाखच सामानाने आणि पर्यायी येणाऱ्या-जाणाऱ्या घराव्यतिरिक्त इतर नातेवाइकांनी भरलेले. ''असे घर काय कामाचे. जिथे काहीच मिळत नाही.'' नुसता पसारा, माणसांचा आणि सामानांचा. माझे आणि माझ्या भावांचे वय जरी लहान असले तरी आम्ही समजून घेणाऱ्या वयातील नक्कीच होतो. त्यात एकत्र कुटुंबातील असल्यामुळे जरा जास्त हुशारही होतोच. आज्ञाधारक आणि शिस्तीत वाढलेले आम्ही मोठ्यांचे म्हणणे टाळणारे पण नव्हतो. त्यामुळे आजीने जो कानमंत्र त्या दिवशी दिला तो आम्ही आज ही पाळतो. माझ्या ह्या त्रासलेल्या तक्रारी वर मात्र आजीने मला थांबवले आणि आम्हांला एकत्र करून शांत बसवले. ती काय सांगणार हे ऐकाण्यकरिता आम्ही उत्सुकतेने आणि आशाने तिच्याकडे पाहत असताना तिच्या चेहऱ्यावरील हाव भाव बदलताना टिपले. थोड्याशा गंभीर आवाजात अतिशय महत्त्वाची परंतू उज्ज्वल भविष्यातील खरी कल्पना समजावून सांगायला तिने सुरुवात केली, ती म्हणजे- 'वास्तुपुरुष'

आम्ही सर्व जण स्तब्ध! हे काय नवीन गूढ अजब असे व्यक्तिवर्णन! काही कळेना.

आजीच्या म्हणण्याप्रमाणे मी ह्या घराला नाव ठेवणे किंवा अनावधानाने सुद्धा कुरकुर करून नापसंती दर्शवणे हे गैर होते. त्यामुळे मला आता समजावून सांगायचे ह्या उद्देशाने तिने छान सुरुवात केली.

आपल्या घरा किंवा वास्तूचे काही मूळ जागेचे मालक ह्या नात्याने संरक्षक असतात जे तुम्हाला ह्या त्यांच्या मूळ जागेत राहू देतात, जीवन जगण्याचा आनंद घेऊ देतात, आयुष्यात येणारे चढ-उतार, उन्हाळे-पावसाळे योग्य जाण्यासाठी मदत करतात आणि भरभरून आशीर्वाददेखील देतात. फक्त ते दिसत नाहीत किंवा अदृश्य रूपाने इथेच राहतात.

तुम्हाला येणाऱ्या कितीही अडचणी असो, वास्तू तुम्हाला नेहमी आसराचं देते, बाहेरून घरी कामामुळे थकून

आल्यावर सुखसमाधानाने दोन घास खाण्याचे सुख स्वतःच्या घरातील आसनावरचं मिळते, रात्रीची शांत निद्रा आपल्या वास्तूतील साध्या गादीवर पडल्या पडल्या येते आणि सकाळ तर प्रसन्न मनाने स्वागत करत उठवतेसुद्धा. आजी सर्व काही सुंदररीत्या एवढं महत्त्वाचे सांगत होती की आमची तक्रार किंवा माझी नाराजी ताबडतोब निघूनच गेली. ते प्रायव्हसी वगैरे तर मी झटकून टाकलेसुद्धा. कारण आता मला माझ्या घराचे महत्त्व अजून मोठे जाणवू लागले होते. आम्ही तिच्या ह्या अजब गूढ गोष्टींचा अजून खोलात जाऊन विचार करायला सुरुवात तर केलीच शिवाय तिला नक्की 'वास्तुपुरुष' कसा दिसतो? तो खरंच असतो का? त्याला आपण दिसतो का? मग तो खरंच असेन तर आपल्याला जाणवत का नाही? असे अनेक प्रश्न विचारून तिला आम्ही भंडावून सोडले. पण तीसुद्धा आमचीच आजी नाही का? तिने सांगितले की वास्तुपुरुष असण्याचा सबळ पुरावा म्हणजे तुम्ही घरातील सर्व जण जे बोलता तेच आणि तसेच घडणे हाच आहे कारण जेव्हा ह्या वास्तूत आपण काहीही बोलतो तेव्हा तो वास्तुपुरुष आपल्याला आशीर्वाद देतो आणि म्हणतो, की 'तथास्तु' अर्थात तसेच होईन!

म्हणजे जेव्हा आपण एखादी इच्छा किंवा आपल्या मनातील सुप्त भावना प्रत्यक्षात उतरण्याची वाट पाहत असतो

किंवा बऱ्याच लांबलेल्या अर्धवट कामाचे फलित कधी मिळणार ह्याचा वेड्यासारखा मागोवा घेत असतो तेव्हाचं आपण केलेल्या कष्टाचे आणि प्रामाणिक कार्याचे बक्षीस म्हणजे हे वास्तुपुरुष नावाचे गृहस्थ आपणास देत असतो. आपली खरी भरभराट आणि पुढील पिढीची उत्तम वाटचाल नेमकं ह्यावर टिकून आहे. म्हणून तर आज ही कित्येक घराणे नावाजलेले आहे.

मलाच काय आम्हा तिघांना आणि आमच्या घरातील इतर

व्यक्तींना सुद्धा हे ऐकण्यात खूप आनंद झाला. मी चुकले आणि माफीदेखील मागितली. आजीनी प्रेमाने गालावरून हात फिरवून माफ केले आणि त्या दिवशीपासून आपल्या घराला आपण कधीच नावं ठेवायची नाही हे आम्ही ठरवून टाकले.

लहानपणापासून सर्व भावंडे स्वतःच्या घराचा माज आणि फुशारकी अभिमानाने आजही मिरवतो. माझे लग्नही झाले, शिवाय स्वतःचे घरदेखील गेल्या १३ वर्षांपासून मी मिरवते आहे. वयाच्या येणाऱ्या चाळिशीच्या टप्प्यात आता अजून एका नवीन घराची चाहूल आहे त्यामुळे हा विषय माझ्या मनाच्या नाजूक भागातील विशेष असा एक आहे.

आज ही माझी आजी नसताना, मी माझ्या घराचे भरपूर लाड करते. जसे की साफसफाई तर आहेच शिवाय ह्या

माझ्या घरात मूळ आनंद कसा टिकून राहीन आणि योग्य काम कसे पूर्णत्वास नेईन ह्याकरता झटत असते. उत्तम

स्वयंपाक घरीच मी माझ्या हाताने बनवावा हा माझा विशेष अट्टाहास मी आवर्जून पाळते. कारण 'अन्नपूर्णा'

प्रसन्न रहो हीदेखील आजीप्रमाणेच आईची देखील शिकवण! आणि खरं सांगू! मोठ्यांनी दिलेली ही शिकवण आज मी भरभरून जगते आहे. मी माझ्या आयुष्यात समाधानी आणि खूष आहे. म्हणतात ना, ज्या घरातील लक्ष्मी म्हणजे स्त्री आनंदी ते घरसुद्धा आनंदी, अगदी तेच आज अनुभवते आहे. आणि हो, आजीने अजून एक गुपित सांगितले होते बरं का! ते म्हणजे 'वास्तुपुरुष' जर योग्य व्यक्तीला दिसला तर आहो भाग्यच. परंतु न दिसता जर घरात चंदनाचा सुगंध पसरला असेल तर समजावं की तो अवतीभोवतीचं आहे आणि म्हणतो आहे की 'तथास्तु'.

''आज माझा तेरा वर्षांचा मुलगा नेमका हेच शोधत आहे, लवकरच त्याला ही उत्तम शिकवणीची फलश्रुती मिळो.''



# भाऊबीज

**सौ. स्नेहल माळकर-फणसळकर**
माणगाव

विनय आणि रीमा केबीनमध्ये एका केससंबंधी चर्चा करत होते. तेवढ्यात नर्स आत आली.

''सर, एक बाई चालता चालता रस्त्यावर भोवळ येऊन पडली. आपल्या हॉस्पिटलच्या समोरच पडल्यामुळे लोक तिला आपल्याकडे घेऊन आलेत.''

''ठीक आहे. बीपी चेक कर तोपर्यंत मी आलोच.''

विनय पेशंटकडे आला. नर्सने ब्लडप्रेशर कमी असल्याचे सांगितले. विनय तपासण्यासाठी पुढे गेला आणि त्याची नजर पेशंटच्या चेहऱ्यावर पडली. तसा तो चमकलाच. पहिल्यांदा त्याला वाटले आपली काही तरी गफलत होतेय. पण नीट निरखून पाहिल्यावर त्याची खात्री पटली. ती बाई दुसरी तिसरी कोणी नसून श्रेया होती. ही इथे कशी काय? तो मनात विचार करत असताना सवयीने तिला तपासत होता. अति ताणाने शुद्ध हरपली होती. फार काही गंभीर परिस्थिती नव्हती. त्याने नर्सला सलाईन लावायची आणि योग्य ते औषधोपचार करण्याची सूचना दिली.

''पेशंटला स्पेशल रूममध्ये हलवा. पूर्ण शुद्धीवर येईपर्यंत नीट लक्ष ठेवा आणि शुद्धीवर आल्यावर मला ताबडतोब कळवा,'' असे सांगून तो परत केबीनमध्ये गेला.

''रीमा, आता आलेली ती पेशंट म्हणजे तुला मी नेहमी ज्या श्रेयाबद्दल सांगतो ना ती श्रेया आहे.''

काय सांगतोस?

''हो अगं.''

मलाही आश्चर्यच वाटलं. ती इकडे कुठे? आणि अशी भोवळ येईपर्यंत रस्त्यावरून अशी का फिरत होती कोण जाणे.

कशी आहे आता?

बरी आहे. बीपी लो आहे. आयव्ही लावलंय. येईल आता शुद्धीवर.

मला तिला बघायची खूप उत्सुकता आहे.

रीमाने विनयच्या तोंडून श्रेयाबद्दल खूप ऐकले होते. तिला तिच्याबद्दलच्या विनयच्या भावनाही माहीत होत्या. विनयच्या मामाचे घर कोकणातल्या निळेली गावी होते. त्याच्या घराशेजारी श्रेयाचे घर होते. लहानपणी विनय जेव्हा पुण्याहून सुट्टीत आजोळी जायचा तेव्हा ही चिमुरडी श्रेया सतत मामाच्या घरी असायची. ती जवळजवळ मामाच्या घरीच वाढत होती. चालायला यायला लागल्यावर आपल्या पायातल्या पैंजणांचा छुमछुम आवाज करत इकडेतिकडे फिरायची. मामाला दोन मुलगे असल्यामुळे मामा-मामी आपली मुलीची हौस तिच्यावर भागवून घेत. विनयचे मामेभाऊ तिला खेळवायचे. तीही दादा दादा करत त्यांच्या मागे मागे असायची. विनय मामाकडे गेला की तोही श्रेयाला खेळवायचा. तीही त्याला नय दादा, नय दादा' म्हणायची. तिला कितीही सांगितले की 'नयदादा' नव्हे विनयदादा' असे म्हण. तरीही ती नयदादाच म्हणायची. नंतर मोठी झाल्यावर मात्र विनयदादा म्हणायला लागली होती. दरवेळी दिवाळीला जेव्हा विनय आजोळी असे तेव्हा ती बाकीच्यां बरोबर त्यालाही ओवाळायची. विनय एकटाच होता. श्रेयाला बघितले की त्याला नेहमी वाटायचे की आपल्याला पण अशी एक छानशी, गोंडस बहीण असायला हवी होती. बारावीनंतर त्याने मेडिकलला ॲडमिशन घेतली आणि मग तो त्यात एवढा अडकला की आजोळी जाणे जवळपास बंदच झाले. अधूनमधून तिकडच्या बातम्या समजायच्या. श्रेयाने आपल्याच कॉलेजमध्ये शिकणाऱ्या एका मुलाशी प्रेमविवाह केल्याचे त्याला समजले होते. तिच्या आईबाबांना फारसे पसंत नसल्यामुळे त्यांचा त्याला विरोध होता. म्हणून मग तिने परस्पर पळून जाऊन त्याच्याबरोबर लग्न केले होते. परिणामी आईवडिलांनी तिच्याशी कायमचे संबंध तोडले होते. त्यानंतर मात्र तिच्याबद्दल काहीच कळले नव्हते.

नर्सने श्रेया शुद्धीवर आल्याचे सांगितले. विनय आणि रीमा तिला भेटायला गेले. नर्सने श्रेयाला तिला भेटायला डॉक्टर येत असल्याचे सांगितले होते. परंतु समोर डॉक्टर म्हणून विनयला बघितल्यावर तिला आश्चर्यच वाटले.

''अरे, विनयदादा तू? हे तुझं हॉस्पिटल आहे?''

''हो, आता कसं वाटतंय तुला?''

श्रेयाचा चेहरा पडला. बरी आहे. नर्स सांगत होती, लोक मला इथे घेऊन आले म्हणून.


''हं. तुला नक्की बरं वाटतंय ना? की अजून एखादं सलाईन लावूया?'' विनय हसत हसत म्हणाला.

नको नको. त्याची खरंच काही गरज नाही.

''श्रेया, ही माझी पत्नी डॉक्टर रीमा. आणि श्रेया, रिमाला तुझी वेगळी ओळख करून द्यायची गरज नाही.

श्रेया तिच्याकडे पाहून हसली.

''नमस्कार मॅडम. विनयदादा, मला आता बरं वाटतंय. मी निघू का?''



''अगं थांब. एवढीही बरी झाली नाहीयेस तू. मी तुला घरी सोडायची व्यवस्था करतो.''

''पण त्याआधी तू आमच्या घरी चल. थोडी विश्रांती घे. थोडं काहीतरी खाऊन घे.'' रीमा म्हणाली.

''नको नको.'' श्रेया संकोचत म्हणाली आणि घरी सोडायची पण गरज नाही. जाईन माझी मी. श्रेया विनयची नजर चुकवत म्हणाली. तिच्या एकूण प्रतिक्रियेवरून विनयला काहीतरी गडबड असल्याचे जाणवले. त्याने तिचे काहीही न ऐकता तिला घरी नेले. रीमाने बाईला कॉफी बनवायला सांगितली. कॉफी पिऊन झाल्यावर विनयने तिला डायरेक्ट विचारले.

''काय झालेय? सगळं व्यवस्थित आहे ना?'' मला तुझ्या एकूण वागण्यावरून काहीतरी प्रॉब्लेम असावा असं वाटतंय.

''नाही रे. खरंच काही नाही.''

''ठीक आहे. मग तुझ्या नवऱ्याचा नंबर दे. तू इथे असल्याचे मी त्याला कळवतो.''

''नको नको. त्याला काही कळवू नकोस.''

''असं का? नक्की काय प्रॉब्लेम आहे ते तू आम्हाला सांगणार आहेस का? अगं, दादा म्हणतेस ना? मग हा परकेपणा का?''

''आणि तू काही बोलली नाहीस तर आम्हाला कसं कळणार काय झालंय ते? आम्हाला शक्य असेल ती सर्व मदत आम्ही तुला करू. पण तू आधी मोकळेपणाने बोल. घरात काही प्रॉब्लेम आहे का?'' रीमा म्हणाली.

या मायेच्या ओलाव्याने श्रेयाचा बांध फुटला. ती हमसून हमसून रडायला लागली. त्यांनी तिला शांत होऊ दिले. हळूहळू ती सावरली.

''हं आता सांग बघू सगळं. तुझं लग्न झालं एवढंच मला माहिती आहे. नंतर तुझी काही बातमीच नाही.''

''तुला माहीतच आहे. आईबाबांना लग्न पसंत नव्हते. त्यांनी माझ्याशी संबंध तोडले ते आजपर्यंत.'' सांगता सांगता ती भूतकाळात शिरली.

''लग्नानंतर तिने त्यांचे मन वळवण्याचा खूप प्रयत्न केला; पण काही उपयोग झाला नाही. नंतर राकेशला पुण्यात नोकरी मिळाली आणि ते इथे राहायला आले.'' ती सांगत होती.

''घरी मी, राकेश, आमचा मुलगा वेदांग आणि सासूबाई असे चौघे जण आहोत. वेदांग आता तीन वर्षांचा आहे. सगळं कसं व्यवस्थित चालू होतं आणि अचानक आमच्या सुखाला कोणाची तरी दृष्ट लागली.'' ती क्षणभर थांबली.

''म्हणजे?''

''माझ्या पायावर पांढरा डाग उमटला. डॉक्टरांना दाखवले. त्यांनी कोड आहे म्हणून सांगितले. ते ऐकून माझ्या पायाखालची जमीनच सरकली. मी प्रचंड अस्वस्थ झाले. मला काहीच सुचेनासे झाले. त्वचारोग तज्ज्ञांना दाखविले. ते म्हणतात यावर खात्रीशीर इलाज नाही. पण यापासून काही धोका नाही. तो डाग कदाचित पसरणारसुद्धा नाही.'' ती थांबली.

''बरोबरच आहे त्यांचं.''

''राकेशचंही हेच म्हणणं आहे. पण..''

''पण? पण काय?''

''डॉक्टर असं म्हणत असले तरी मला खूप भीती वाटतेय. माझ्यामुळे या रोगाची लागण माझ्या वेदांगला, घरातल्या इतरांना झाली तर? आणि राकेशने तरी माझ्यासारख्या कोड उठलेल्या बाईबरोबर संसार का करावा? आमच्या गावी तर असं म्हणतात की आपले पूर्वजन्मीचे पाप या जन्मी कोडाच्या रूपाने फेडावे लागते. माझ्यामुळे त्यांच्या आयुष्याची वाट लागायला नको. तुला आठवतं का रे विनयदादा, गावी आपल्या घराशेजारी ती साटम आजी होती बघ. तिच्या संपूर्ण अंगावर कोड उठले होते. मधेमधे पांढरे डाग आणि मधेमधे काळपट त्वचा.''

''हं, चांगलीच आठवतेय.''

''किती विचित्र दिसायची ती! आम्ही मुलं तिला खूप घाबरायचो. इतर मोठी माणसेसुद्धा आम्हाला घाबरवायची. सांगायची वाईट वागलात तर देवबाप्पा शिक्षा म्हणून साटम आजीसारखे डाग अंगावर देईल. त्यामुळे तर आम्हाला जास्तच भीती वाटायची. हे सगळं मला आठवलं तरी शहारा येतो. विचार करून करून माझं डोकं फिरायची वेळ आली होती. शेवटी हे सगळं माझ्या सहनशक्तीच्या बाहेर गेलं. माझ्यामुळे माझ्या घरच्यांना त्रास होऊ नये म्हणून मग मीच त्यांच्या आयुष्यातून दूर जायचा निर्णय घेतला. पाय नेतील तशी चालत राहिले. शेवटी योगायोगाने तुझ्या हॉस्पिटलसमोर पडले.''

''याचा अर्थ तू घर सोडून आली आहेस. आपल्या मुलाचा, नवऱ्याचा कोणाचाच विचार न करता? अगं हा शुद्ध वेडेपणा आहे.''

''विनय, अरे ही मुलगी कुठल्या जगात वावरतेय? तुझ्यासारख्या सुशिक्षित मुलीला कोड म्हणजे गेल्या जन्मीचे पाप वाटते? कमाल आहे. रिमाचा श्रेयाच्या बोलण्यावर विश्वासच बसत नव्हता. एवढी अंधश्रद्धा अजूनही लोकांच्या मनात आहे? मला तर हे पटतच नाही आहे. अगं कोड येणं हे संसर्गजन्य नाहीच आहे. मुळात तो रोगच नाही आहे. तुझ्या अशा अचानक निघून जाण्याचा वेदांगवर काय परिणाम होईल याचा तू विचार केलास का? तू एवढी मोठी झालीस तरी आईबाबा भेटत नाहीत म्हणून अजूनही हळहळतेस. मग त्या एवढ्याशा लेकराला आई नको? त्याची काय चूक?'' रीमा पोटतिडकीने श्रेयाला समजावत होती.

वेदांगसाठी आधीच श्रेयाचा जीव तळमळत होता. आता रीमाचे बोलणे ऐकून ती अधिकच कासावीस झाली.

''घरचे काळजीत असतील. सकाळपासून तू घरात नाहीयेस. त्यांना तू इथे आहेस हे आधी कळवायला हवं. मग आपण सविस्तर बोलू. मला राकेशचा नंबर दे.'' विनयने लगेच राकेशला फोन लावला.

''हॅलो, मी डॉक्टर विनय जोशी बोलतोय. आपण मिस्टर राकेश ना? तुमची पत्नी श्रेया आमच्याकडे आहे. तुम्ही इथे येऊ शकाल का? माझा पत्ता 'जीवनदान हॉस्पिटल, कसबा रोड, पुणे.''

''हो हो तुम्ही काही काळजी करू नका. ती इथे एकदम सुरक्षित

आहे. या, आम्ही वाट बघतोय.'' विनयने फोन ठेवला.

''बघितलंस किती काळजीत होते ते.'' ताबडतोब निघतो म्हणाले.

तासाभरात खालून कॉल आला- ''सर, कोणीतरी मिस्टर राकेश आपल्याला भेटायला आलेत.''

''त्यांना लगेचच वर घेऊन ये. बघ श्रेया, राकेश आलेसुद्धा.''

''डॉक्टर, मी राकेश. श्रेया बरी आहे ना?''

''हो. ती एकदम ठणठणीत आहे. आत या. तुम्ही आधी बसा शांतपणे. रीमा, श्रेयाला घेऊन बाहेर ये.''

श्रेयाला पाहून राकेशला खूप आनंद झाला.

''श्रेया, अगं कुठे होतीस तू? कुठे कुठे नाही शोधलं तुला. शेजारीपाजारी, सगळ्या नातेवाइकांकडे, ओळखीच्यांकडे सगळीकडे चौकशी केली. पण तू कुठेच नव्हतीस. वेदांगने तर रडून गोंधळ घातला. शेवटी आईनं त्याची कशीबशी समजूत घातली. आम्ही आता पोलीस स्टेशनवर जायचीच तयारी करत होतो. एवढ्यात यांचा कॉल आला.''

''सॉरी राकेश, पुन्हा अशी चूक होणार नाही.'' श्रेया अपराधीपणे म्हणाली.

''होताच कामा नये आणि झालीच तर कान पकडायला हा विनयदादा तयार आहेच.''

''अच्छा! म्हणजे तू ज्या विनयदादांबद्दल कधीतरी सांगतेस ते हेच का?''

''हो, हो, तोच मी. देवाचीच कृपा म्हटली पाहिजे की ही आज माझ्याच हॉस्पिटलसमोर चक्कर येऊन पडली. नाहीतर बाईसाहेब तिरमिरीत कुठे गेल्या असत्या काय माहीत?''

''खरंच दादा, माझं चुकलं. तू आणि वहिनीने माझे डोळे उघडलेत. मला आयुष्याकडे बघण्याची नवी दृष्टी दिली.''


''डॉक्टर, तुमचे खूप खूप उपकार आहेत आमच्यावर. आम्ही निघू का आता? वेदांग आणि आई घरी वाट बघत असतील. अरे हो. डॉक्टर, तुमची फी?''

''अहो, तुम्ही कसली फी देताय? मीच तिचं देणं लागतो.''

सगळ्यांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह पाहून विनय हसत हसत म्हणाला, ''मधल्या एवढ्या वर्षांची भाऊबीज कुठे दिलीय मी तिला. बोला बहिणाबाई, यंदा काय भाऊबीज घालू?''

ते ऐकून श्रेयाचे डोळे पाणावले. दाटल्या कंठाने ती म्हणाली, ''दादा, अरे आज मला तू माझ्यासाठी सर्वांत मौल्यवान असलेली गोष्ट परत मिळवून दिलीस आहेस. मी तर माझ्या सुखी संसाराची आशाच सोडून दिली होती. माझा सोन्यासारखा संसार तू मला परत मिळवून दिलास. याहून मौल्यवान भाऊबीज दुसरी कुठली असणार?''

●●





# लो लो

**सौ. सतेजा सुभाष दांडेकर**
सातारा

‘‘अगं ए , कोण दंगा करत आहे? चल माग फिर बघू? का तिला मारतेस? अगं, काय तुझे केस झाले आहेत. केस बांध ना जरा! तुझा चेहरा तरी दिसतो का? सगळा चेहराच वेडा वाकड्या केसांनी व्यापला गेला आहे. काय तू?’’ असे म्हणून आपल्याला एवढे कोण बोलत आहे असे बघायला त्या मुलीने पाठ फिरवली व आपले केस मागे घेऊन त्याला व्यवस्थित रबर बँड लावला आणि समोर बघितले. चेहऱ्यावर अजून रागवण्याचा, दंगा करण्याचा भाव होता. केस अस्ताव्यस्त झालेले, जरी बो बांधला तरी त्यातून बरेचसे केस बाहेर पडलेले होते. समोरच्या बाईकडे ती निरखून बघत होती; पण ओळखीची चमक काही डोळ्यांत नव्हती.

‘‘अगं, लो लो, तू काय अवतार करून घेतला आहेस तुझा? ओळखलंस का मला? अगं मी...वंदना... तुझ्या शाळेतली.’’

त्या मुलीने पाठ फिरवल्या फिरवल्या तिथे भेट देण्यासाठी आलेल्या डॉक्टर वंदनाने या दंगा करणाऱ्या मुलीला

ओळखले व तिला लो लो म्हणून हाक मारली.

‘‘हे काय, तुम्ही या मुलीला ओळखता का?’’

‘‘हो, हो, ओळखते. तिचे खरे नाव लीलावती आहे. शाळेत असताना आमच्या सगळ्या मुलींच्या मध्ये दिसायला गोरी, मोठे डोळे, कुरळे केस, छानच होती. मनमिळाऊ स्वभाव होता. तिला नटण्या-मुरडण्याची खूप हौस, आवड होती आणि नशिबाने तिला घरातल्यांची साथ होती. कोणी तिला रागवायचे नाही, अगं किती तास आरशासमोर उभी आहेस, बास की आता, आवर अभ्यास वगैरे आहे का नाही? शाळेत जायचे का नाही?’’ असे कोणीच तिला म्हणायचे नाही. त्यामुळे ती सतत तिला शोभेल असा नट्टापट्टा करूनच शाळेमध्ये यायची आणि अर्थात कॉलेजमध्ये गेल्यावर तर जास्तच. ती नुसती कॉलेजच्या गेटमधून आत आली सगळ्या मुलांच्या माना वळल्याच म्हणून समजावे. तिलाही हे जाणवत होते. आपल्याशी बोलण्यासाठी, आपल्याला स्पर्श करण्यासाठी मुले किती आतुर आहेत हे तिला कळत होते. तिला सतत वाटायचे, की आपण चित्रपटक्षेत्रात जावे, हिरोईन म्हणून काम करावे, पण तिचे ते स्वप्न कॉलेजमध्ये असताना तरी पूर्ण झाले नाही. त्यानंतर आमची लग्न झाली. आम्ही आमच्या व्यवसायामध्ये गुंतलो, संसारामध्ये अडकलो, आता आमची मुले मोठी झाली. समाजकार्य करायला घेतले तेव्हाच ठरवले मानसिक रुग्ण असलेल्या रुग्णांसाठी आपण काही काम करावे म्हणून मी आज येथे भेट देण्यासाठी आले आहे. इथे फारच दंगा दिसला म्हणून मी त्या मुलीला हाक मारली, तर नेमकी ती माझी मैत्रीण निघाली. मी तिच्याशी थोड्या वेळ गप्पा मारू शकते का?’’



''ठीक आहे, तुम्ही गप्पा मारू शकता, पण मला नाही वाटत तिला पूर्वीचं काही आठवत असेल आणि ती तुम्हाला त्रास देणार नाही ना तेवढे बघा. कारण ती मानसिक रुग्ण असलेली आहे. केव्हा कोणाला त्रास देईल केव्हा कुणाच्या अंगावर धावून जाईल सांगता येत नाही. म्हणून आपले सांगितले.''

मग मी त्या मुलीचा हात धरला. तिच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला. तिच्या केसांना चांगले तेल लावून चोळून केसांना बो लावला. चेहऱ्यावरून पाण्याचा हात फिरवला व ती कॉलेजमध्ये करायची तसा तिला मेकअप केला. अर्थात माझ्याकडे जे साहित्य होते त्यामधूनच व तिला घेऊन इमारतीच्या बाहेर एका झाडाच्या पारावर आम्ही दोघी येऊन बसलो. मी तिला म्हटले, ''ओळखलस का मला? मी तुझी मैत्रीण वंदना.' म्हटल्याबरोबर लो लो माझ्या गळ्यात पडून रडू लागली. मलाही कळेना काय झालंय! मी तिच्या डोक्यावरून पाठीवरून हात फिरवून तिला मनसोक्त रडू दिले व ती मोकळी झाल्यानंतर तिला विचारले, ''आता तू मला सर्व काही सांग. तुला सर्व काही आठवत आहे हे मला दिसत आहे.''

ती मला म्हणाली, ''माझे खरे नाव लीलावती, पण मला चित्रपटक्षेत्रात जायचे होते हे तुम्हा सर्वांना माहितीच आहे. त्या दृष्टीनेच माझी तयारी सुरू होती. कुठे ऑडिशनला जाणं. कुठे काय, मी करतच होते. पण आपण जे ठरवतो ते परमेश्वराला मान्य नव्हते. त्यामुळे घरामध्ये सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेली मी. तेच घर माझ्या काकाने माझ्या वडिलांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन माझ्या वडिलांच्या वेगवेगळ्या कागदांवर सह्या घेतल्या. वडिलांनी काकांच्यावर विश्वास ठेवून कागदपत्र न वाचताच सह्या केल्या. इथेच माझे वडील फसले व काकांनी आमचे घर, जमीनजुमला, शेत सर्व काही स्वतःच्या नावावर करून घेतले. हे जेव्हा वडिलांना कळले तेव्हा ते या धक्क्यातून स्वतःला सावरू शकले नाहीत व एक दिवस रामरूप झाले. माझा सख्खा भाऊ होता तो वेड लागून कोठेतरी निघून गेला. फक्त मी व माझी आई एवढेच उरलो. मग आम्ही दोघींनी काय घरातील सापडतील त्या चीज वस्तू घेऊन तेथून बाहेर पडलो व मुंबईमध्ये येऊन स्थिर झालो. मुंबईमध्ये अशासाठी की तिथे काहीतरी काम मिळेल. पोटापाण्याचा व्यवसाय करता येईल. आम्ही दोघी जणी सुखासमाधानात जगू. कारण परमेश्वराने आम्हाला एकदम वरच्या पायरीवरून धाडकन खाली आणून ठेवले होते. आमची काहीही चूक नसताना आम्हाला मात्र शिक्षा भोगायला लागत होती. म्हणून काहीतरी काम शोधू लागले. तेव्हा.'कावेरी' म्हणून मला एक मैत्रीण भेटली.

ती म्हणाली, ''तू कुठेही नोकरी केलीस तरी महिना पगार पंधरा ते वीस हजार रुपये मिळेल पण जर माझ्याबरोबर आलीस तर दिवसाला तुला दहा हजार तर नक्कीच मिळतील आणि तुझे नशीब

चांगले असेल तर जास्तही मिळतील.'' मला त्याचा मोह पडला व मी तिच्याबरोबर गेले. आईला सर्व काही कल्पना दिली होती. तरी आईने मला विचारले, ''असे कोणते काम आहे की दिवसाला दहा हजार रुपये मिळतील.''

तिला थोडी शंका आली होती. पण मला पैशाचा मोह होता म्हणून मी तिकडे थोडे दुर्लक्ष केले. तिने मला एका नाईट क्लबला डान्स करायला लावला. मी मुळातच सुंदर, त्या छान मेकअप केलेला, सुरेख ड्रेस घातलेला मग काय सगळ्यांच्या उड्या म इयावर पडल्या व मला त्या दिवशी भरपूर पैसे मिळाले. ते सर्व पैसे घेऊन मी घरी आले. आईला सांगितले, की 'असे असे' काम आहे.

आई म्हणाली, ''हे काम चांगलं नाही, तुझ्याशी कोणी अतिशयोक्ती केली तर काय?''

मी म्हणाले, ''तसे काहीच होत नाही. तिथेही आमच्यावर लक्ष ठेवणारे बॉस असतातच. त्यामुळे तू काही काळजी करू नकोस'' मला त्या पैशाची हाव सुरू झाली. मी रोज रात्री तिथे जायची व खूप पैसे कमवून आणत होते. त्याच स्वतःच्या पैशावर मुंबईमध्ये घर घेतलं, सुसज्ज सजवले. आई पण खूष झाली. काही का असेना आपल्याला स्वतःचे घर झाले, इथून कोणी ऊठ म्हणणार नाही आणि एके दिवशी प्रेक्षकांमधील एकाने मला विचारले, ''तू चित्रपटात काम करशील का?'' आणि माझ्या मनात खूप दिवसांची असलेली इच्छा पूर्ण होणार असे मला दिसू लागले व मी त्याला 'हो' म्हटले. त्याचे नाव 'अभय' अभयशी गप्पा मारणे, त्याच्याबरोबर भेटायला जाणे, त्याच्याबरोबर पार्टी करणे सर्व काही सुरू झाले. तो नुसता मला चित्रपटात काम देणार यावरच झुलवत होता.

एक दिवस अभय म्हणाला, ''आपण दोघे लग्न करू या का?''


मला अभय आवडलाच होता, त्यामुळे मी पण त्याच्यावर विश्वास ठेवला व लग्न करण्याच्या आधीच आम्ही दोघे एकत्र आलो. आता काय लग्न करायचंच आहे आणि हे वारंवार घडतच राहिले. नाईट क्लबला जाणे माझे सुरू होते. ते काही मी सोडले नव्हते. त्यामुळे मला माझा पैसा येतच होता. राहिलेल्या वेळेत मी त्या अभयला भेटत होते. एक दिवस माझ्या लक्षात आलं आपल्याला दिवस गेलेले आहेत म्हणून मी अभयला म्हणाले, ''आपण लग्न कधी करायचे?''

तेव्हा तो म्हणाला, ''कशासाठी लग्न करायचे आहे. असेच राहिलो तर काय वाईट आहे का?''

मी म्हटले, ''नाही, लग्न करायचे.''

तो म्हणाला, ''माझे लग्न झालेले आहे. मला दोन मुलेपण आहेत. त्यामुळे मी काही तुझ्याशी लग्न करू शकणार

नाही.''



हे ऐकल्यावर मला धक्काच बसला ज्याच्यावर विश्वास ठेवून आपण इतके दिवस त्याला साथ दिली. त्यानेच


आपला विश्वासघात केला म्हणजे वडिलांच्या बाबतीत जे झाले तेच माझ्या बाबतीत झाले. मला दिवस आहेत हे जर आईला सांगितले आईला जबरदस्त धक्का बसेल. मी परस्पर जाऊन गर्भपात करून घेतला व या गोष्टीचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला की मी मानसिक रुग्ण झाले. बरेच औषधोपचार झाले, पण काहीच फरक पडेना म्हणून मला या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले व मी इथे येऊन पडले. अशी ही माझी कर्मकहाणी. वंदना म्हणाली, ''तुला नुसता मानसिक त्रास झाला म्हणून तू इथे येऊन ॲडमिट व्हायला नको होतेस त्यापेक्षा आता

त्याच्यावर भरपूर नवीन औषधोपचार निघालेली आहेत. घरात राहूनही त्यावर औषध उपचार घेऊ शकतेस व यातून बाहेर पडू शकशील. माझ्या ओळखीचे एक जण आहेत त्यांचा तुला मी पत्ता देते. ते डॉक्टर तुला व्यवस्थित औषधोपचार करतील. तुला घेऊन जाते. म्हणजे प्रश्न यायचाच नाही. त्याप्रमाणे औषधोपचार सुरू केला त्यातून ती पूर्णपणे बरी झाली व त्या हॉस्पिटलमधून ती घरी आली. आईला ही बरे वाटले. योग्य वेळी योग्य मैत्रीण भेटणे हे चांगले असते. आता तिने अभयवर वचपा काढायचे ठरवले.

वंदनाने सांगितले असे काहीही करू नकोस. कारण आता नुकतीच तू बरी झालेली आहेस. तुझे तू परत नाईट क्लबला जाणे सुरू कर. तुझ्या तुझ्या क्षेत्रांमध्ये आनंदात राहा. कारण तू तुझा राग काढलास तरी तोपण तुला काहीही करू शकतो. त्याला प्रतिकार करणे तुला जमणार नाही. कारण आपण बायका भावनांमध्ये जास्त अडकलेल्या असतो. त्यापेक्षा तू त्याच्याकडे दुर्लक्ष करून तुझे तुझे काम करीत राहा. आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे हे लक्षात आल्यावर तो तुझ्या वाटेलाही जाणार नाही व आता मात्र पुढील कालक्रमणा मागील अनुभवावरून व्यवस्थित चालू ठेव.

''अशी ही लीलावती''

लीलावती पूर्ण बरी झाल्यावर वंदनाच्या सांगण्याप्रमाणे तिने परत नाईट क्लब जॉईन केला. पण आता मात्र दुधाने तोंड भाजल्यावर ताकसुद्धा फुंकून प्यायला तिने सुरुवात केली व तिचे आयुष्य व्यवस्थित मार्गी लागले हे सगळं ऐकून मला माझे समाजकार्य करताकरता एका मुलीला तिच्या खोल गर्तेतून बाहेर काढल्याचे, आपण योग्य सल्ला दिल्याचे समाधान झाले.



# इट्टी

**सौ. कुंदा गुणवंता अशोक**
हिंगणगादे

तर दर वरसासारखं या वरसी बी आनंदनगरच्या साळत नवी जॉयनिंग झाली पर निहमीपेक्षा जराशान लेट.

पाऊसकाळ वाढल्यानं इटाचा सीझन सुरू हुयाला उलीशान येळच झाला हुता. गिली सा महिनं सामसूम असणाऱ्या इटभट्टीवर माणसाची वरदळ वाडल्याली. बायका-पोरं, गडीमाणसाचं नवं-नवं मुखडं दिसू लागल्याल. आय-बाप दिनरात कामावर पालथी पडल्याली असायची. आन आठ-धा वरसाची न्हान-मुटी लेकरं स्वोताला जमलं तसं त्यांच्या सौंसाराला हात भार लावायची. पोरी दिसभर ल्हान्या लेकरासनी संभाळत भांडी घासायच्या, धुनी धुयाच्या, रातच्यासाटणी सरपणाला बारीक-सारीक काटक्या गोळा करायच्या. उरलेल्या येळात आवरल अशा बेताबेताच्या बादल्या, कळश्या आनं हांडं घिवून पानी भरत बसायच्या.

त्यांच्या माय-बाला मनवून या पोरांना साळत दाखल करून घेणं मंजी लय जिकरीच काम. आठ-धा चकरा मारल्याबिगर लंगर तुटायचा नाय. रांगत्या-फिरत्या पोरांची आंगणवाडीत सूय लावून दिली तरी बाळुत्यातल्या तान्ह्यांचा परस्न असायचाच. कितीबी धडका घेतल्या तरी धा पयकी सा-सात लेकरंच हाताला लागायची. बाकीची आया-गमनी गायब हुयाची. चिकाटी दाखवून यत्याली तिवडी गोळा करतं ऱ्हायला लागायचं.

त्यावरसाला वड्यापल्याडच्या महिंदून साळतल्या सावंत बाईंना



यक इम्पोरटंट बातमी दिली.

म्हणला, ''म्याडम, कर्नाटकातन लय पाल आल्याती, बारका-चिरका नुसता चिगूर हाय सोबती.''

''किती मुलं असतील रे?''

''लय नाय पर आपल्यासनी पाच-सा अन आंगणवाडीला आठ-धा तरी भेटत्याली''

''जावूया का उदया आपण?''

''व्हय जावयाकी'' महिंदून पुसटी जुडली.

मग दुसऱ्या दिशी दोपारच्या म्होरं सावंत बाई,महिंदू अन गणू हाळू-नेट भट्टीवर पोचले. उनं उतरणी लागल्याली. पाटपसन आंग मुडून काम केल्यानं आत्ता कुठं बायामाणसं जरशान निसावल्याली. डअररररर... गाडीचा आ-वाज आयकून ती चाटकन उटून बसली. बाईनी आपली गाडी यक बाजूला लावली. वही-पेन काडला आन समद्या पोरांचा सर्वे करायला सुरुवात केली. सर्वे करत करतच परतेकांबरोबर त्या बोलत हुत्या. त्यांच्या आडी-आडचणी समजून घेत हुत्या. तास-दोन तास त्यानला कसंतरी मनवून त्या परत शाळत आल्या. दुसऱ्या दिशी लय वाट बघितली त्यायनी पर कुनीबी साळकडं फिराकलं नाय. मग आणि दोन-चार हेलपाटं मारलं, तवा कशी तरी चार-दोन लेकरं साळत इऊ लागली.

तर त्यामधी चिनू आन रंभापण हुतीती. चिनू आन रंभा अफ लातनं भैन-भावंड हुती. काळी-सावळी, बारक्या चणीची, कापसावाणी हलकी असल्याली ही पोरं इमानागत पळायची. आत्ता इत तर मग कुटं. चिनू ल्हान आन रंभा मूटी. दो-गात दीड-दोन वरसासाच फरक आसल.

इतर पोरांनल्यागत बक्कळच्या न समद्या गुष्टी नसतं त्यांच्याकडं पर मन लय साफ. आपल्याकडं नाय म्हूनशानसोन आसंल तरी कुणाच्या यकाद्या वस्तूकडं ढुकूनबी बगायची नायती. रंभाच्या अंगात कुनीबुनी दिल्याला घोट्यापावतूरचा पंजाबी नायतर चिटाचिटाचा झगा असायचा आन चिनूच्या अंगात ढगाळ इटकरी शर्ट. सोबत नावाला पिशवी अन मोकळा डबा, भात खायाला.

सकाळच्या पारी शिक्षकानी साळत इन्ट्री किली रं किली, सगळ्या पोरांचा यकदमच गलका हुयाचा- म्याडम आल्या, म्याडम आल्या, सर आलं, सर आलं म्हणून पोरं नु-सती नाचायची. तर त्यांच्यामधून म्याडम आला, म्याडम आला, सर आली, सर आली; असा येगळाच आवाज आता इवू लागला. जराशान निरखून पाह्यलं तर रंभा आन चिनू.

आता काय करावं? त्यांची मायबूली तेलगू त्यानला मराठी नीट बोलताच येत नव्हती. इथून तर खरी सुरवात हुती.

पण रंभा आन चिनू लवकरच सावरली. उमालत्या वयात टकाटका समदीकडं कुतूहलानं बगायची. आपली कापडं, भाषा येगळीच हाय, जाणवून गारठून जायची. चिकन्या-चोपड्या पोरा-तनी येगळं पडायची. आता काय करावं बरं? मग सावंत बाईंना यक आयडिया सुचली. चौथीच्या पोरापोरींचं जुनं साळचं डिरस गोळा केलं आन दिलं त्यांना घालायला. मापाच्या कपड्यात बरीच निटकी दिसाय लागली. हाळूहाळू भाषापण सुधरायला लागली. सुरवातीला साळतल्या शिलकीच्या जुन्या पाट्यावर यक यक शबूद घुटून घुटून लिव लागली. दोपारची खिचडी घ्यायाला कुठं रांकत उभं राह्यचं, ताट कुठं धुयाची, वर्ग-आंगाण कुठंवर झाडायचं, पार्थना कुठल्या म्हणायच्या त्यासनी हाळूहाळू जमू लागलं.

अशातच सव्वीस जानेवरीच झेंडा वंदन आलं. सगळी शाळा जोमानं कामाला लागली. दोपारच्या पुढचा सगळा योळ गाणी, कविता आन कवायतीच्या तालमीत खर्ची पडू लागला. साळच्या आसपास वाढल्यालं कांग्रेस गवात, खुरटी झुडपं काढून शाळा लकलकीत किली. दरवरसापरमान याबी वरशी समद्या मुलांनी काळं बूट आन पांढर मोजी इकत घेतलं. शाळच्या डिरसावर बूट, मुजी, बेल्ट न आयडेंटी कार्डामुळं पोरं रुबाबात दिसू लागली. पण कवायत करताना निमकी चार पावलं वगळून दिसायची. माग वार्षिक क्रीडा स्पर्धात याच चार पावलांनी नंबर मारलं हुतं. ना चप्पल, ना बूट पण वरच्या वर्गातल्या मुटूल्या पोरापोरींना हारवलं हुतं.

दुसऱ्या दिशी बाईंनी आठवणीनं काळ्याकुट बुटाचं आन निवी ब्लू कलरच्या मोज्याच ज्वाड आणलं आन शाळच्या चप्पल स्टँडला ठिवून दिलं. सांजच्याला साळा सुटल्यावर पाटी-दप्तर घिऊन सर्वी पोरं भिर्रररर पळाली. रंभान पण दप्तर पाटीवर टाकलं अन सू.... सुटली. चिनू तर तिज्याभी पुडं पळाला. बाईंनी मागन जोरक शान आवाज दिला, ''ए......रंभा,ए.... चिनू आरे तुमचं बूट राहिले की!''

''आमचं?'' नाय वो!''

'अरे बघा, तुमचचेच आहेत!

तुमचंच हायत म्हणलं तरी त्यासनी खरं वाटंना. शिवटी त्यांच्या मायला बुलवून घेतलं आन समदी कथा सांगितली तवा ती दोघं राजी झाली.

त्या वरशीचा झेंडावंदन लय दणक्यात झाला. गाणी, मनोरं, कवायती आन झांझ पथकानं कारीकर्मात इ्याक

रंगत आणली. पिसासारखा हलका चिनू तर माकडासारखा आज्ज्याद मनुऱ्याच्या शेंड्यावर चढला. मनुऱ्यावर सरसर चढणारी मुलं बघून गाव समदा हारखून गेला. गावातल्या दोस्त मंडळानं मुलासनी दूध-बिस्कुटाचा नाष्टा दिला. रंभा न चिनूचा आनंद तर तोंडावर मावत नव्हता. काळ्या चकचकीत बुटाचं त्याज त्यांच्या डोळ्यात लकाकत हुत. परमुलखातन आल्याली ही लेकरं लोण्यासारखी साळत इरघळत गेली. चालणं, वागणं, बोलणं, लिवंन आन वाचन शिकत गिली. नदीनाल्याचं पाणी समींद्रात मिसळून जावं तशी समदी साळा एकसारखी झाली. साळतला हर यक दिस पाखरासारखा भारकन उडून जावं लागला.

आन यक दिस सावंतबाई साळच्या फाटकातनं आत शिरत व्हत्या तवर पाठीमागनं गणू पळत आला. हातात

कसली तरी पिशवी व्हती.

''म्याडम, ही धरा!''

''काय आहे रे त्यात? कुणी दिली?''

''रंभान दिली.''

''काय आहे त्यात?''

बाईं परसनावर परस्न ईचरू लागल्या.

गणू गप झाला. बाईंनी पिशवी हातामधी घितली आन आतमधी डुकवून बगत्यात तर काय, आतमधी बुटाचं ज्वाड.

''माघारी दिले? पण का?''

बाईंना काय बी उमजना. त्यांनी पुना इचारलं

''चिनू न रंभा कुठं आहेत?''

''ती आयागमनी कुठं तरी निगून गिली, इटभट्टीवाल्याच अन् त्यांच्या बाच पैक्यावरन काय तरी बिनासलं हुतं.


रातच्याला रंभा पळत पळत इवून दिवून गिली ही पिशवी. म्हनली, ''आमच्यासारखी दुसरी कुणी बी पोरं आली साळला, तर त्यांला द्या म्हणावं.''

सावंतबाईंच्या काळजामधी चर्र झालं. त्या इचार करू लागल्या ''एवढ्या लहान वयात कुठून एवढी समज आली असेल या मुलांच्यात? आत्ता त्यांच्या भवितव्याचं काय?'' शर्यतीत झाप झाप पळणारी चिनू न रंभा त्यांच्या डोळ्यासमूरण हटता हटेनात.

इटभट्टीवर दरसाल यणाऱ्या लेकरांच्या आविष्याची चित्तरकथा दांडून टोलवल्याल्या इटीगत आसती, कुटं जाऊन

पडलं त्यचा नेम न्हाय.

●●



# मेनका

सौ. सरिता देशपांडे
सातारा



नामदेव तसा १४-१५ वर्षांचा होता. सगळे त्याला नाम्याच म्हणत. लहान दोन भाऊ, आई-वडील असा परिवार होता. आई-वडील मोलमजुरीचे काम करत होते. नाम्याला शाळा अजिबात आवडायची नाही. सतत माळ रानात भटकंती, नदीकाठी निसर्गात राहणे हेच त्याला जास्त आवडायचे. त्याला देवदेवतांच्या मूर्ती बनवायला फार आवडायचे. माळरानात भटकून लहान-मोठे पाषाण गोळा करायचे. तिकडेच बसून छिन्नी चालवीत त्यांना आकार द्यायचा. सतत तेच केल्याने नाम्या आता छान मूर्ती बनवू लागला. आसपासच्या गावातले लोक येऊन त्या मूर्ती विकत घेत असत. तेवढाच आर्थिक हातभार लागायचा. नाहीतर घरची परिस्थिती ओढग्रस्तीचीच होती. नाम्या कसाबसा मॅट्रिकपर्यंत शिकला आणि शाळा सोडून दिली. मूर्ती बनवण्याच्या कामातच तो रमून जायचा. आई-वडील ओरडायचे छिन्नी आणि पाषाणाचा हा कसला खेळ करीत बसतोस? काही कामधंदा तरी बघ. अशीच चार-पाच वर्षे गेली, नाम्याच्या मनात व्यापार करायचा विचार नव्हताच. आता नाम्या राधा-कृष्ण, राम, शंकर, दत्त अशा देवांच्या छान छान मूर्ती बनवायला लागला. लोकांना पण त्या आवडू लागल्या, लोक विकत घेऊ लागले. नाम्या अगदी मन लावून त्यात जीव ओतून मूर्ती

बनवीत असे. त्यामुळे मूर्ती सुंदर, सुबक, आकर्षक बनत असत. त्यावरून नजर हटायची नाही. आता ज्याला जशी पाहिजे तशा मूर्तींची ऑर्डरपण येत असे. नाम्याचे गाव छोटे खेडे होते. पण आसपासच्या गावात तो माहीत झाला होता. आता तो 'नामदेव मूर्तिकार' म्हणून ओळखला जाऊ लागला. कोणतीही देवाची मूर्ती बघेल तशा स्वरूपात तो आकार देत असे.

आता मात्र नाम्याच्या मनात वेगळेच विचार घोळायला लागले, आत्तापर्यंत आपण फक्त देवतांच्याच मूर्ती बनवल्या आता आपण एखाद्या सुंदर 'स्त्री'ची मूर्ती बनवायची अगदी स्वर्गातली अप्सरा वाटली पाहिजे. रंभा, उर्वशी, रती की मेनका? आपण 'मेनका'च बनवायची. मेनकाबद्दल थोडेफार कधी ऐकलं होतं, पण आपल्या मनाप्रमाणे बनवायची. आता तो सतत विचारात गढलेला असायचा. आपल्या कल्पनेतील मेनका फक्त आपल्यासाठीच असेल ती फक्त आपलीच असेल. तिला विकाऊ मूर्तीमध्ये आपण ठेवायचं नाही. आता मेनकेसाठी छान पाषाणाची गरज होती. मग रानावनात, माळरानात भटकंती सुरू झाली. अखेर माळरानात एके ठिकाणी त्याला एक सुंदर बऱ्यापैकी मोठा पाषाण दिसला.

पण तो मोठा आणि जड असल्याने तिथे जाऊनच मूर्ती बनवावी लागणार होती. आता नाम्या रोज सकाळी तिथेच जाऊन बसे सतत 'मेनके'चाच विचार, तिचेच चिंतन मेनका कशी असायला हवी? तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव महत्त्वाचे होते, तिचे वस्त्र प्रावरण कशी पाहिजेत? मोजकेच पण सुंदर दागिने हवेतच, तिचा केस संभार मात्र भरपूर हवा एक ना दोन नाम्या तिच्या सतत विचारातच असे. मेनका अशी बनवायला हवी की लोक बघतच राहतील. तिच्यावरून नजर हटणारच नाही. नाम्याला जेवण-खाण, झोप काही सुचेना, आई काळजी करायला लागली. तेव्हा तो आईला म्हणाला, ''हे बघ मी आता अशी मूर्ती बनवणार आहे, की ती फक्त माझीच असेल 'माझी मेनका' असेल. ती फक्त माझीच आणि माझ्याजवळच राहील.'' आई म्हणाली, ''अरे, वेडा आहेस. मेनका किती देखणी असायला हवी? तू ती कशी बनवणार? देवांच्या मूर्ती तुझ्या डोळ्यासमोर होत्या ही मेनका तू कुठे पाहणार तिचं सौंदर्य अप्रतिम होतं म्हणे तू ते मूर्तीत कसं बनवशील?'' पण नाम्याला काही ऐकू येत नव्हते. मग नाम्या रोज सकाळी भाकरी बांधून घेऊन त्या पाषाणापाशी जाऊन बसे. आता त्याची छिन्नी पण जोरात चालू लागली, आता सर्व लक्ष मेनकेकडेच होते आपल्या मनातली मेनका प्रत्यक्ष साकारताना

त्यानी जिवाची बाजी लावली होती. रात्रंदिवस ऊन-पाऊस कशाचाच विचार नव्हता. त्याचे काम तो थांबवू शकत नव्हता. आता छिन्नीच्या आवाजात तिचे सुमधुर बोल आणि पैंजणाची रुणझुण ऐकू येऊ लागली, त्याची करमणूक करू लागली. सततच्या कामाने आता आराखडा, आकार तयार झाला तरी चार महिने गेले. आता त्या कच्च्या आराखड्याला मेनकेचे एक सुंदर मोहक रूप देणे चालू झाले. डोळे कसे करावेत? मृगनयनी का कमलनयनी, केशसंभार मोकळा असावा की त्याला बंधन घालावे? नाक चाफेकळी हवे आणि हो बांधा कमनीय हवा. स्वर्गलोकीच्या रंभा व

अप्सरासारखीच मेनका मग ती देखणीच हवी. कानात कुंडल हवे ते गाणे आहे ना- वारियाने कुंडल हाले, डोळे मोडीत राधा चाले, चाफेकळी नाकात नथनी हवीच, जिवणी अगदी गोड बारीक छोटीशी पाहिजे जिवणी हसती ठेवूया म्हणजे खालील दंतपंक्ती सर्वांना मोहात पडतील लोभस वाटतील का? मोनालिसासारखे स्मितहास्यच ठेवूया प्रत्येक अवयवातून, सौंदर्यातून जिवंतपणा हवा तिला पाहिल्यावर प्रत्येकालाच लाजवाब असंच म्हणावं लागेल.

नाम्याचे काम जोरात चालू होते. तो अगदी मेनकामय झाला होता. डोळे कमलनयनी केले पण त्यात मादकता होती, कानातले कुंडल पण शोभिवंत झाले, केशसंभार पाठीवर रुळत होता, गळ्यात निरनिराळे प्रकारचे अलंकार तिच्या भरगच्च उरोजावर विराजमान झाले. जिवणी छोटीशी पण स्मितहास्य करीत होती, नाकातली नथणी चेहऱ्यावरच्या सौंदर्यात भर घालीत होती, सुंदरशी साडी अगदी सराईतपणे नीटनेटकी नेसवली होती, त्याला शोभणारी कंचुकीपण सुंदर झाली. कंचुकीचे गोंडस गोंडे पाठीवर रुळत होते, दंडात वाकी कोरण्याचे तो विसरला नाही ती हवीच, हातात भरगच्च बांगड्यांचा चुडा, बोटात मोती, पोवळे, माणिक, हिऱ्यांच्या अंगठ्या शोभून दिसत होत्या मेनका तयार झाली. ती दगडाची कोरलेली कलाकृती वाटतच नव्हती, नाम्याला तर जिवंतच वाटत होती. नाम्या आता तिच्या प्रेमात आकंठ बुडला होता. तिला कुठे ठेवू आणि कुठे नको असे झाले. कुठे लपविणे तर आवश्यकच होते. आता नाम्या तिच्याशी सतत संभाषण करी तिच्या बांगड्यांची किणकिण, पायातल्या छुनछुनचा गोड आवाज त्याच्या कानाला तृप्ती देऊ लागला. एक उत्तम कलाकृतीचा नमुना मेनका झाली. तो आता घरी न जाता तिथेच झोपू लागला. हे काम पूर्ण व्हायला एक वर्ष लागले. सगळे

सौंदर्य मेनकेच्या रोमारोमांत भरले होते. तिची लांबसडक बोट ओठावर विसावली होती, कमनीय कंबर कशी असावी हे मेनकेकडे पाहून कळत होते. एकूण काय प्रचंड परिश्रमाने एका वेड्या ध्येयाने झपाटलेल्या नामाची सुंदर, आकर्षक, अप्रतिम, अतुलनीय मेनका तयार झाली पण तिचा व्यापार नाही करायचा.

गावात, परगावात सगळीकडे मेनकेची बघता बघता जाहिरात झाली. मेनकेला बघण्यासाठी लोकांची रीघ लागली. प्रत्येक जण तोंड भरून कौतुक करीत होता. नाम्या कृतकृत्य झाला. त्याला काळजी होती माझ्या मेनकेला दृष्ट तर लागणार नाही ना, तो तिला जिवापाड जपत होता. तिची कीर्ती सगळीकडे पसरली. काही जण तिला मागणी घालू लागले, मेनका आम्हाला द्या किंमत करू लागले; पण नाम्याचे मौन होते. त्या माळरानाला भाव आला. आता ते एक प्रेक्षणीय स्थळ झाले. लोक आवर्जून भेट देऊ लागले. नाम्याला वाटायचे माझ्या मेनकेला त्रास तर होत नसेल; पण लोकांचा प्रवाह थांबवायचा कसा? तो मेनकेला सॉरी म्हणू लागला. तिच्या अंगा खांद्यावर प्रेमाचा हात फिरवू लागला. त्याच्या आई- वडिलांना त्याच्या कलाकृतीचा अभिमान नक्कीच होता; पण नाम्याने इतके मेनकामय होऊ नये इतके वेडे होऊ नये असे वाटे. इतक्या मूर्ती बनवल्या विकल्या पण मग नाम्या म्हणे ही मेनका फक्त माझीच आहे सर्वांनी लांबूनच बघायची.

एकदा दोन-चार परदेशी पाहुणे मेनका बघायला आले. तिला पाहून तर ते पार वेडे झाले हे फक्त भारतीयच करू शकतात, असे म्हणत आम्ही तुम्हाला कोरा चेक देतो कितीही रक्कम भरा फक्त आम्हाला मेनका द्या. तिकडे कसे न्यायचे आम्ही बघू. तुम्ही तर उत्कृष्ट कलाकार आहातच तुम्ही पण तिच्याबरोबर चला आम्ही तुम्हाला भरपूर पगार देऊ, पण नाम्याचा नकार कायम होता आई-वडिलांनी इतर प्रतिष्ठित गावकऱ्यांनी त्याला खूप समजावले हो म्हण दारिद्र्य संपून आयुष्यात समृद्धी येईल दुसरी मेनका तयार कर पण नाम्या तयार होईना. जोरात रडू लागला ही माझी मेनका आहे आणि माझीच राहील ही एकच आहे दुसरी होणे नाही.

मेनकेच्या काळजीने नामा आजारी पडला. जेवणखाण सोडले तिला कोणीतरी चोरेल म्हणून झोपेना आपण रात्रंदिवस मेनका असा जप करीत राहिला, सतत काहीतरी बडबड करीत असायचा, कधीतरी खूप हसायचा, तर कधी धाय मोकलून रडायचा. माझी मेनका माझी मेनका म्हणून तिच्या पायाशी बसून रडायचा, आता येणारे लोक म्हणायचे तो बघा मूर्तिकार वेडा नाम्या. या मेनकेने त्याला वेड केलं.

# निर्णय

**सौ. आशा निरंजन भट**
**पुणे**



आज माधवराव निवृत्त होणार होते. त्यांच्या उच्चशिक्षित पण गृहिणी असणाऱ्या मला आज ऑफिसात बोलाविले होते. कारणही तसेच होते. कॉर्पोरेशनमधून ३४ वर्षे लिपिकाची नोकरी करून आज ते निवृत्त होत होते. त्यांच्या निरोप समारंभाला आज मी पहिल्यांदाच मनापासून तयार होऊन पोहोचले. माधवरावांचा कौतुक सोहळा दोन-तीन तास चालला. जाणाऱ्या माणसाबद्दल कधी कुणी वाईट बोलत नाही. नंतर भेटवस्तू, शाल आणि श्रीफळ देण्याचा सम रंभ पार पडला. माझाही गौरव करण्यात आला. उत्तम साडी, शाल, आणि श्रीफळ देऊन असं म्हणतात की, प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीच असते. माधवरावांचे आयुष्य यशस्वीच होते.

माधवरावांचे जगणे मनमानीच होते. संसारही नावापुरताच केला. कोणाचीच कधीच चिंता केली नाही. नव्या संसारात सुद्धा कधी बायकोची हौसमौज केली नाही ना कधी फिरायला ना सहलीला.

स्वतःच्या आईवडिलांकडेही बघणे, त्यांचे औषधपाणी करणे, कधी तरी त्यांच्याशी निवांत बोलणे, विचारपूस करणे, काही नाहीच. आपली बायको बघतेच आहे सगळं. पुढे मुले झाली, एक मुलगा एक मुलगी. त्यांनाही कधीही कुठलीच माया लावली नाही. त्यांच्या नशिबाने लहानपणापासून जिव्हाळ्याचे आजी-आजोबा होते. मुले वीस-बावीस वर्षांची असताना ते दोघेही एका वर्षात लागोपाठ देव-



ाघरी गेले. देवदयेने आमचे सगळ्यांचे आरोग्य चांगले होते. पण आमचे साहेब सोडले तर इतर प्रत्येक जण सतत मानसिक ताणाचे शिकार झाले होते. मानसिक व्याधीच जडली होती म्हणा ना. घरात फक्त ''बाबा'' वाक्यंप्रमाणं! ते म्हणतील तसंच घर चालत असे. सर्व काही त्यांच्या आदेशानुसारच. पगार झाल्यावर एकदाच काय ते घरात पैसे देणं व्हायचं. नंतर महिनाभर कधी लागलं खुपलं, आजारपण, शाळेची सहल, कशाहीसाठी पैसे मागण्याची हिंमत करायची नाही.

वर्षानुवर्षे मुले मानसिक काळजीतच मोठी होत गेली. नाही म्हणायला महागाई वाढली तसे घरातही थोडेफार पैसे देणं वाढलं, पण पगार नक्की किती येतो, हे कधीच कुणाला कळू शकले नाही. नशिबाने मिळालेल्या प्रेमळ सासू-सासऱ्यांमुळे कधीही तुटू शकणारा संसार कसाबसा वीस-बावीस वर्षे टिकला आणि मुलांच्या भविष्याच्या काळजीपोटी पुढेही रेटावा लागला.

माधवरावांच्या हुकुमाप्रमाणेच रोज घरात सकाळी सात वाजता चहा, साडेनऊ वाजता चारपोळ्या, वरणभात भाजी चटणी असा व्यवस्थित डबा तयार ठेवायला लागायचा. संध्याकाळी सात वाजता घरी आल्यावर चहा आणि त्याबरोबर चिवडा किंवा शंकरपाळे असा काही पदार्थ. सगळं काही घड्याळाच्या काट्यावर. ते झालं की साडेसातला माधवरावांचं बाहेर जाणं व्हायचं. मित्रपरिवारासह कट्ट्यावर. घरात कधी काही आणणं माहीतच नाही. बरोबर साडेनवाला घरी आणि पावणेदहाला पानावर, तेही एकटेच. त्यांचं झाल्याशिवाय कुणीच जेवायचं नाही, अगदी आईवडिलांनीही नाही.

इतक्या चांगल्या आईवडिलांनी सुखात वाढवलेल्या म ाधवरावांचे आईवडिलांशी तरी वागणे चांगले असावे ना?

तसंही नाही.वडिलांची पेन्शनबरोबर दहा तारखेला आणायला लावून लगेच स्वतःच्या ताब्यात घेणार. एक दिवस जरी उशीर झाला तरी रुद्रावतार धारण करणार. त्याला घाबरून बाबा एक-दोन दिवस आधीच पेन्शन आणायला जायचे. वयोमानाने वेळेवर पेन्शन काढणे बाबांना कठीण होत गेले.तरी बिचारे नातवाला नातीला बरोबर घेऊन कसे तरी पेन्शन आणत.

मुलांना कळायला लागल्यापासून खूप प्रश्न पडायचे. आपले वडील असे विचित्र का वागतात? आपल्यावर त्यांचे प्रेमच नाही का? ते कधी आपल्या शाळेत येत नाहीतच पण आपल्यालाही का कुठे घेऊन जात नाहीत? आपण मिळवत असलेल्या उत्तम गुणांची, आपले विविध खेळातील आणि कलांमधील प्रावीण्याचे त्यांना काहीच कौतुक कसे नाही? फक्त आईच सकाळी सहा ते रात्री अकरा राबत असते तरीही आपला अभ्यास व्यवस्थित घेते.

एम.एस्सी. गोल्ड मेडलिस्ट आई घरातली भांडी घासण्यापासून सगळी कामे करत असते. मुले मोठी होऊ लागली तसे त्यांना पडत असलेले प्रश्नही वाढले. आपले वडील आपले का नाहीत? आपली आई तर त्यांची बायको आहे. पण तिच्याशीही असे विचित्र का वागतात? प्रत्येक रविवार, सुट्टीचा दिवस म्हणजे माधवरावांसाठी सणच असायचा. नेहमीप्रमाणे वेळच्या वेळी चहा नाश्ता

झाला की जेवणाचा पूर्ण डबा घेऊन, आपल्या चार-पाच मि त्रांना घेऊन एका मित्राच्या रिकाम्या फ्लॅटवर जात, रमी खेळायला.



रात्री नेहमीप्रमाणे जेवायच्या वेळेला घरी.त्यांचे सगळे आनंद, मौजमजा, सिनेमे, पिकनिक, सणवार फक्त आणि फक्त मित्रांबरोबरच साजरे होत. तेच त्यांच्या दृष्टीने सुखी आणि यशस्वी आयुष्याचे गणित होते. आम्ही सगळे कधीही कुठल्याच क्षणी त्यांच्या जगात नसायचोच.

अशाच वातावरणात मुलगी उत्तम गुणांनी बीएस्सी झाली. स्वतः च्या गुणांवर नोकरीलाही लागली. थोड्याच दिवसात तिने आपला प्रेमविवाह ठरविला. त्याच्याशीही तिच्या बाबांना कसलेही देणेघेणे नव्हते. ना पसंती ना हरकत. तिच्या रजिस्टर लग्नालाही त्यांनी उपस्थित राहण्याचे कष्ट घेण्याचा प्रश्नच नव्हता. अक्षरशः लंकेची पार्वती म्हणतात अशा परिस्थितीतही लग्नाला उभी राहिली. मुलगी दुसऱ्या घरी जाणार या दुःखापेक्षाही ती आपल्या घराच्या रोगट वातावरणातून मुक्त होणार याचा आनंदच वाटला. मोठ्या सुखाची गोष्ट म्हणजे खरं भरभरून प्रेम करणारा नवरा तिला मिळाला. त्या आनंदापुढे घरची दुःखे विसरायलाच झाली.

तिच्या लग्नानंतर दोनच वर्षांत मुलगा बीई झाला. फर्स्ट क्लास मिळवून लगेचच एमएस करायला अमेरिकेला रवानाही झाला, आपल्या मावशीची सक्रिय मदत घेऊन. जाताना खूप रडत होता. म्हणाला, की आई तूच माझा देव आहेस, मी नोकरीला लागलो की तुला या तुरुंगातून कायमची मुक्त करणार, बाबांपासून अगदी दूर, अमेरिकेत. तिथे माझ्या कुणीच नसणाऱ्या वडिलांना कुठेच जागा नसणार. मग तू सुखातच जगशील. काही काळजी करू नकोस. दोन वर्षे बघता बघता निघून जातील आणि तुझे सुखाचे दिवस सुरू होतील. मुलगा रवाना झाला, त्याला एक वर्ष पूर्ण झाले. माधवरावांची निवृत्ती पार पडल्यावर मी माझ्या मनाची पूर्ण तयारी केली. तशी ही माझी घरातली सर्व कर्तव्ये पार पाडलीच होती. गेल्या दहा वर्षात करत असलेल्या निश्चयाची अंमलबजावणी करायची असे ठामपणे ठरविले. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता नेहमीप्रमाणे जेव्हा
माधवराव चहासाठी सोबत पेपर हातात घेऊन टेबलावर बसले तेव्हा, मी, त्यांची पत्नी, चहाचा कप एका पत्रासह ठेवती झाली. थोड्याशा आश्चर्याने पतिदेव विचारते झाले, हे काय? तुला माझ्याकडून काय हवे आहे? आता माझ्या जवळ भरपूर पैसा आणि वेळच वेळ आहे. बराच वेळ उत्तर येईना म्हणून परत एकदा विचारणा केली. मी कित्येक वर्षांनी नऊ शब्दांत त्यांच्याशी बोलती झाले.

''मला जे हवे आहे ते सर्व या पत्रात लिहिले आहे' ''श्री. माधवराव कुलकर्णी, मी आपली तथाकथित पत्नी मानिनी, तीस वर्षे कशाबशा रेटलेल्या तथाकथित संसारातून आजपासून निवृत्त होत आहे. मी माझ्या मैत्रिणीच्या मोठ्या ऑर्थोपेडिक हॉस्पिटलमध्ये मुख्य व्यवस्थापक म्हणून रुजू होत आहे. माझी पूर्ण व्यवस्था, राहणे, जेवणखाण हॉस्पिटलच करणार आहे. तुमचे उर्वरित आयुष्य अधिकाधिक स्वच्छंदी बनवा आणि आनंदात रहा.''

**आपली (नाइलाजाने)**
**सौ. मानिनी बर्वे**

# सायन्स



# बळ

**सौ. अश्विनी निवर्गी**
**उदगीर**

शेजारचा माणूस घरातून बाहेर पडला आणि लीना घरी आली. तिने मागे वळून पाहिलं. तो कशासाठी घरी आला असावा याचा विचार करतच ती घरात शिरली. तोच तिची आई वसुधा तिच्या अंगावर धावून गेली.

''आमचं नाव खड्ड्यात घातलंस ना कार्टे, हे काय वय आहे तुझं मुलांबरोबर मारामारी करायचं? कधी अक्कल यायची तुला? मुलाचा शर्ट फाडलास ना तू?'' असं म्हणून तिच्या गालावर ताडताड दोन चापटा मारल्या.

लीनाच्या डोक्यावरून तिची आजी हात फिरवत होती. लीना रडूनरडून झोपी गेली होती. जेवलीही नव्हती.

सरूबाई, तिची आजी तिच्या आईला वसुधाला म्हणाली, ''का अशी वागलीस गं पोरीशी? काय चुकलं त्या लेकराचं?''

वसुधा चिडून म्हणाली, ''काही चुकलं नाही? अंगाने मजबूत आहे. दांडगी दुंडगी. म्हणून काय पोरांसोबत भांडणं करायची? त्यांना भिडायचं?''

''तुला बाहेरून कोणी तरी येऊन सांगितलं, की हिने पोरांबरोबर मारामारी केली आणि तेवढ्यावरून तू तिच्या गालावर ताड ताड मारलं. पण तिचीही काही तरी बाजू असते हे का नाही कळत तुला? अशी कशी आई आहेस तू? आपल्या पोरीचं मन समजत नाही तुला. काय झालं पोरी म्हणून तिला विचारावं असं का नाही वाटलं तुला? लोकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवते; पण आपल्याला लेकराच्या वागण्यावर आपण विश्वास ठेवावा असं नाही वाटत का तुला? ते आपलं लेकरू आहे. आपल्या संस्कारात वाढलेलं... ते चुकीचं काही करणार नाही आणि तिने काही चुकीचं केलं असं वाटत असेल तर आधी आपण तिला विचारलं पाहिजे, की बाळा तू असं का केलं? तिचीही काहीतरी बाजू असेलच ना. मला तुझं हे वागणं अजिबात पसंत नाही वसुधा.'' सरूबाई म्हणाल्या. वसुधाच्या डोळ्यांत पाणी जमा झालं होतं. ती म्हणाली, ''सासूबाई, आपल्या घरात आपण चारच माणसं आहोत. लीना, मी तुम्ही आणि बाबा. बाबा गेल्या एक वर्षापासून आजारी आहेत. हातापायावरून वारं गेलं. अर्ध अंग लुळं झालं. त्यामुळे झोपून आहेत. देवानं माझं कुंकू हिसकावून घेतलं. लीनाचे बाबा वर्षभरापूर्वी अपघातात गेले. पदरात तरणीसाठी पोरगी. हे गेल्याच ऐकून धक्क्यानं लीनाच्या आजोबांना अर्धांगवायूचा झटका आला. मी नोकरी करते म्हणून घर चालतं आपलं. जी काय थोडीफार शेतीवाडी आहे त्यातून धान्य येतं आणि वर्षभर आपल्याला काही कमी पडत नाही पण मला सांगा, घरात कुणीही पुरुष माणूस नाही. उद्या काही भलतंच झालं, वेडंवाकडं घडलं तर आपल्या पाठीशी उभा राहायला एकही पुरुष नाही. अशा परिस्थितीत आपल्या पोरीने

कशाला नाही तिथे भांडणं करायची?''

सरुबाई म्हणाल्या, ''नाही वसुधा. तू विचारलंस का एकदा तरी लीनाला. हेच चुकतं तुझं. हे बघ लीना बाहेर

चालली होती. एका गुंड पोरानं तिची छेड काढली, तर लीनाने त्याच्या दोन थोबाडीत ठेवून दिल्या. त्याने तिच्या ओढणीला हात लावला म्हणून त्याचा शर्ट फाडला. काय चुकले आहे गं तिचं?''

''कमालच आहे. म्हणून असं वागायचं?''

''मग तुला काय वाटतं, तिने त्याची आरती करायला हवी होती की खाली मान घालून, घाबरून थरथर कापत

घरी यायला हवं होतं?''

''अहो पोरीची जात आहे तिची.''

''म्हणूनच मी सांगत आहे तुला. बरोबर केलं आहे तिने. मी तर म्हणते तिला कराटेच्या क्लासला घाल.''

''अहो आई पोरीची जात आहे तिची. आता ती सारखी हट्ट करत आहे मला सायन्सला जायचंय. तालुक्याच्या

गावाला जाऊ दे. आपलं गाव लहान आहे. आपल्यासारखी शिकलेल्या लोकांची अगदी थोडीच घरं आहेत. बाकीची सारी झोपडपट्टी आहे. हे छोटं व कमी वस्तीचं गाव आहे आपलं. गावात आर्ट्स कॉलेज आहे. जावं तिथं.''

''अगं पण तिला इच्छा आहे ना सायन्सला जायची. मग जाऊ दे ना... आपली काय ऐपत नाही का?''

वसुधा म्हणाली, ''अहो पण इथं गावात शिकायला काय त्रास आहे?''

पण सरूबाई म्हणाल्या, ''हे बघ. आर्ट्स कमी दर्जाचं असतं किंवा सायन्स वरच्या दर्जाचं असतं असं काहीच मला म्हणायचं नाही. पण आपल्या पोरीची जर इच्छा आहे सायन्सला जायची तर तिला जाऊ दे ना.''

''सासूबाई मला खूप भीती वाटते हो. तिला रोज बसने तालुक्याच्या गावाला जावं लागणार. गावातली पोरं बरी

नाहीत तर शहरातले कशी आहेत आपल्याला माहिती नाही. तिला तिथे पाठवायचं म्हटलं तर काळजात धस्स करतं माझ्या. म्हणून मला वाटतं आपली पोरगी आपल्या जवळ राहावी. तिला काहीच त्रास होऊ नये. उद्या ती गावात राहिली तर तिला काहीच त्रास होणार नाही असं वाटतं का तुला? आणि तिला त्रास होऊ नये म्हणून तू तिला कापसाच्या पेटीत बंद करून ठेवणार का? तिची प्रगती रोखणार वसुधा कसं कळत नाही तुला? आपल्या पोरीच्या पंखात आपणच बळ भरायचं असतं. तिचा आत्मविश्वास आपणच जागा करायचा असतो. नशिबाने आपली पोरगी घाबरट, भित्री नाही उलट चांगली खमकी आहे. तिला कोणी त्रास दिला तर ती सरळ सगळे ऐकून घेणारी नाही आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ती शरीरानं पण चांगली धिप्पाड आहे. तिला योग्य प्रशिक्षण मिळालं तर स्वतः ची काळजी स्वतः चांगल्याच पद्धतीने घेईल ती. मला तर आपल्या लेकराची काहीच काळजी वाटत नाही.''

''असं कसं म्हणता सासूबाई तुम्ही. शहर गावात सहा महिने काही सरळ धडपणे जात नाहीत. सारखं कुणाला जाळलं, कुणाच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकलं, कुणाला मारलं, एकतर्फी प्रेमाच्या छेडछाडीच्या थोड्या घटना होत आहेत का?''

''वसुधा मला मान्य आहे की शहरात असे प्रकार घडत आहेत, पण तिथं तसे प्रकार घडतात म्हणून आपण

आपल्या मुलीला घरात बसवायची? तिची प्रगती रोखायची? तिला आपण समजावलं पाहिजे. मुलींनी सक्षम

झालं पाहिजे. कणखर, खंबीर असलं पाहिजे. इतकं सक्षम असलं पाहिजे की एखाद्या गुंडाच्या थोबाडीत दिली तर त्याचे दोन दात पडले पाहिजेत. कसलीही परिस्थिती येऊ दे त्यामध्ये टिकलं पाहिजे.''

वसुधाला हे ऐकताना खूप आश्चर्य वाटत होतं. आपल्याही आधीच्या पिढीच्या असूनही सासूबाईंचे विचार कसे

आहेत? ती म्हणाली, ''परक्याचं धन आहे ते. आज ना उद्या सासरी जाणार. कशाला तिच्यावर खर्च करायचा? देवाने एख-ादा पोरगा दिला असता तर निदान म्हातारपणी हाताशी तरी आला असता.''

पण सरूबाई खूप संतापून म्हणाल्या, ''आता बोललीस ते बोललीस. पुन्हा असं बोलू नकोस. ज्यांना मुलगा आहे त्यांचे आई-वडील वृद्धाश्रमात जात आहेत आणि मुली पुढे येऊन आपल्या आई-वडिलांना सांभाळत आहेत. सगळीच मुलं वाईट असतात आणि सगळ्याच मुली चांगल्या असतात असं नाही. पण परक्याचं धन, परक्याच धन, म्हणून तिला बोलू नकोस. आपल्या म्हातारप-णची काठी हीच होणार हा विश्वास आहे माझा.''

तेवढ्यात लीना उठली. आजीच्या गळ्यात पडली. म्हणाली, ''आजी मी जाऊ नं सायन्स कॉलेजला?''

''हो बाळा. तू डॉक्टर व्हायचं.''

वसुधा मध्येच म्हणाली, ''पैसे कुठून आणणार एवढे?''

आजी म्हणाली, ''पोरगी हुशार आहे. रात्रंदिवस अभ्यास करील. तिचा जर मेडिकलला नंबर लागला तर मी

पाठीशी उभी राहीन. माझे सगळे दागिनेदेखील विकून टाकेन. प्रसंग पडला तर शेतीचा तुकडा विकते पण तिला

शिकवते.''

लीनाच्या डोळ्यांत पाणी आलं. ती म्हणाली, ''आजी मी तुझं नाव कधीच खाली येऊ देणार नाही. माझ्यावर

तुझा एवढा विश्वास आहे?''

आता वसुधाला खूपच वाईट वाटू लागलं. आपल्या लेकराच्या अंगावर उगीच हात उचलला. वसुधा म्हणाली, ''माफ कर बाळा. मला माहीत नव्हतं.'' तिने लीनाला जवळ घेतलं.

''तुला जायचंय ना तालुक्याच्या गावाला...बसचा पास काढ. सोबत येऊ?''

''नको''

आजी आणि लीना एकदमच म्हणाल्या. आणि तिघी जणी हसल्या.

● ●



# पूर्णत्व

**सुनीता मधुकर पाटील**
**कामोठे, नवी मुंबई**

“अरे! काय ऐकतेय मी हे राघव. दादाने तुझ्या निर्णयाबद्दल सांगितलं आणि मी पुरती हादरले रे. रात्री नीट झोपसुद्धा लागली नाही. सकाळी पहिली गाडी पकडली आणि इथे आले. शेवटी आपल्या घराण्याच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती, राघव.”

सुमाआत्याने घरात पाऊल टाकताच राघवची कानउघाडणी करायला सुरुवात केली. अहो वन्स, प्रवासाने दमला असाल. चहापाणी घ्या आधी. नंतर बोलू आपण या विषयावर. शामलने नणंदबाईच्या हातात चहाचा कप देत त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. “हो, तुझ्या अशा मऊ वागण्या आणि बोलण्यानेच आज ही वेळ आली आहे. घराण्याची पत, अब्रू सगळी वेशीला नेऊन टांगली तुम्ही मायलेकराने.”

बहिणीचा आवाज ऐकताच आपल्या खोलीतून बाहेर येत वसंतरावांनी तिची री ओढली. अहो, काय बोलताय तुम्ही हे?

शामलने बोलायला तोंड उघडलं इतक्यात.....पुरे आता. पहिल्यापासून तू त्याला पाठीशी घालत आलीस. त्याचेच परिणाम आहेत हे. आज काय तो सोक्षमोक्ष लावूनच टाकायचा आहे मला म्हणून मी आक्काला तातडीनं इकडे बोलावणं धाडलं. सुमा

आक्काच्या बाजूला जाऊन बसत वसंतरावांनी एक जळजळीत कटाक्ष राघववर टाकला.

राघव आपल्या नऊ महिन्यांच्या लेकीला परीला छातीशी कवटाळून निःशब्द उभा होता. वसंतरावांची ती आग ओकणारी नजर पाहून तो परीला घेऊन आपल्या खोलीत निघून गेला आणि दार ओढून घेतलं. बघितलंस आक्का मागील आठवड्यापासून हे असं चालू आहे. शांत हो वसंता, आता मी आले आहे ना. सगळं नीट होईल बघ. काळजी करू नकोस. रात्री जेवणाच्या वेळी सुमाआत्याने परत विषयाला हात घातला इतक्यात परीच्या रडण्याचा आवाज आला आणि राघव धावतच त्याच्या खोलीत निघून गेला. त्यामुळे तात्पुरता तरी वादाला पूर्णविराम लागला होता. जेवणानंतर सगळी आवराआवर झाल्यानंतर शामल राघवच्या खोलीत डोकावली. परीला कुशीत घेऊन निजवता निजवता राघवचा देखील डोळा लागला होता. शामल हळूच चोरपावलांनी राघवच्या शेजारी जाऊन बसली. बाजूलाच टेबलावर ठेवलेला राघव आणि आरतीचा लग्नातला फोटो पाहून शामलचे डोळे भरून आले.

''का गं इतकी घाई केलीस जायची. लेकीला जन्म दिलास आणि निघून गेलीस कायमची. त्या इवल्याशा जीवातही तुझा जीव अडकला नाही का? सगळे पाश कायमचे तोडून गेलीस.... तू गेलीस आणि राघव पुरता कोलमडून गेला गं. परीला एकट्याने सांभाळता सांभाळता त्याची खूप दमछाक होते. आम्ही सगळे आहोतच त्याच्यासोबत पण तुझी जागा कशी भरून निघेल, सांग बरं?'' फोटोतल्या आरतीशी बोलता बोलता नकळत शामलचा हात राघवच्या डोक्यावरून फिरू लागला तशी त्याची झोप चाळवली आणि तो उठून बसला. त्याचे लाल डोळे आणि उतरलेला चेहरा त्याच्या होणाऱ्या घुसमटीची साक्ष देत होता.

''का इतका त्रास करून घेतोयस बाळा. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वाहण्याचा इतका अट्टाहास का? दमशील अरे! तू कितीही जोर लावलास तरीही तुझी ताकद कमीच पडणार आहे. असे असामान्य निर्णय घेण्यासाठी खूप हिंमत लागते रे आणि ती तुझ्यात आहे हे ठाऊक आहे मला. तरीही पार लागणं खूप अवघड. निदान परीचा तरी विचार कर.'' शामलने राघवला समजावण्याचा प्रयत्न केला.

''अगं आई, परीसाठी तर हा निर्णय घेतला ना. तूच मला सांग, आरती गेल्यानंतर मला किती स्थळं सांगून आली. बाबांच्या म्हणण्यानुसार मी त्यातल्या एखादीशी लग्न जरी केलं तरी ती परीला निःस्वार्थ प्रेम देऊ शकेल का? उद्या तिला स्वतःची मुलं व्हावीत असं नाही का वाटणार? तिची स्वतःची काही स्वप्नं उराशी बाळगून ती माझ्या आयुष्यात येईल. तिच्या स्वप्नांना मी न्याय नाही देऊ शकणार. कारण माझ्या आयुष्यात आरतीची जागा दुसरी कोणीही घेऊ शकणार नाही. भलेही आमची साथ अल्पायुषी होती; पण जितका वेळ मी तिच्यासोबत घालवला तो वेळ, त्या आठवणी माझ्या पुढील प्रवासात मला साथ देण्यासाठी पुरेशा आहेत आणि म्हणूनच मी माझ्या परीसाठी, तिचा सांभाळ करण्यासाठी सुशीलची निवड केली यात माझं काय चुकलं? अगं सुशील इतकं निर्मळ आणि निःस्वार्थ प्रेम माझ्या परीवर कोणी करूच शकणार नाही. खात्री आहे मला.''

''सुशील नव्हे! सुशीला म्हण तिला.''

इतका वेळ राघव आणि शामलचं बोलणं दारात उभं राहून ऐकणारी सुमाआत्या आत येत म्हणाली- ''अगं, आत्या हे काय बोलतेयस तू. सुशील माझा बालपणाचा मित्र आहे. आम्ही एकत्र वाढलो, खेळलो, शिकलो आणि काय कमी आहे गं त्याच्यात.''

''अरे! ज्या सुशीलला त्याच्या घरच्यांनी इतकी वर्षे एका अडगळीच्या खोलीत डांबून ठेवलं आहे त्याच्यावर तू आपल्या परीची जबाबदारी सोपवणार आणि मुख्य म्हणजे त्याच्यात काय कमी आहे हे तुला नाही का माहिती?''

अरे, तो एक तृतीयपंथी आहे, किन्नर... असं ही तुला काय माहिती असणार. त्याच्याबद्दल माहिती असायला तू इथे होतासच कुठे? मध्यंतरी दहा-बारा वर्षे तू परदेशी होतास ना. सुमाआत्या एका एका शब्दावर भर देत होत्या.

''मला सगळं ठाऊक आहे आत्या. अगं मागील दहा-बारा वर्षे मी परदेशी होतो म्हणून काय झालं. आमची मैत्री तरी कायम होतीच ना. आरतीला देखील सुशीलबद्दल सगळं माहिती होतं. आई तुला आठवतंय आम्ही लहानपणी इथे अंगणात खेळायचो, तेव्हा तू त्याचे किती लाड करायचीस. त्याच्या आवडीचे पदार्थ त्याला खाऊ घालायचीस.'' राघव शामलचा हात हातात घेत म्हणाला.

''हो पण तेव्हा मला कुठे ठाऊक होतं की तो...... अगं, मग काय झालं. तो तेव्हाही माझा जिवलग मित्र होता आणि आजही आहे. आम्ही अगदी पहिलीपासून एकत्र वाढलो, शिकलो पण जसजसा काळ पुढे सरकू लागला तो खूप उदास राहू लागला. मी कितीदा तरी त्याला या मागचं कारण विचारलं पण त्याने नेहमीच हसून टाळलं आणि दहावीत असताना अचानक त्याने तो पुढे शाळा शिकू शकणार नाही म्हणून सांगितलं. कारण त्याच्या घरच्यांना त्याने बाहेर कोणाशी भेटलेलं, बोललेलं आवडणार नव्हतं. त्याचा बाहेरच्या जगाशी असणारा संपर्क त्यांना चालणार नव्हता, का? तर तो सामान्य नव्हता. तो इतर मुलांसारखा नव्हता. त्याला स्वतःलाच माहिती नव्हतं की तो मुलगा आहे की मुलगी. त्याची ओळख नक्की काय? हळूहळू घरच्यांचं त्याच्यासोबत वागणं बदलू लागलं. घरी पाहुणे आले तर त्याला एका खोलीत बंद करण्यात येऊ लागलं. दिवसा त्याने त्या खोलीबाहेर यायचं नाही, अशी सक्त ताकीद होती. मी मात्र माझं शिक्षण, नोकरी यामध्ये व्यस्त झाल्यामुळे लाचार झालो. त्याच्यासाठी काहीच करू शकलो नाही, पण तीन वर्षांपूर्वी मी जेव्हा इथे परत आलो तेव्हा त्याला भेटलो. त्याला भेटल्यानंतर मला माझीच लाज वाटू लागली. आई अगं, मी जरी माझ्या व्यस्ततेमुळे त्याला विसरलो असलो तरी त्याने एक एक आठवण काळजात कोरून ठेवली होती गं. त्या वेळी त्याची अवस्था त्या वठलेल्या खोडासारखी झाली होती. त्याच वेळी ठरवलं त्याला असं कणाकणानं उद्ध्वस्त होऊ द्यायचं नाही. त्यानंतर मी त्याला एक फोन घेऊन दिला आणि नेहमी त्याच्या संपर्कात राहू लागलो.''


''अरे पण राघव, म्हणून काय परीची जबाबदारी त्याच्यावर सोपवायची.'' राघव बोलत असताना सुमाआत्याने मध्येच त्याला रोखलं.

''हो, का नाही आत्या? तुला आठवतंय आई! परीच्या जन्माच्या वेळी आरतीला दवाखान्यात नेताना तो खिडकीतून हात हालवत आम्हाला धीर देत होता. तो गुपचूप लपतछपत दवाखान्यात परीला बघायलादेखील आला होता. मला एक गोष्ट सांग आत्या एक स्त्रीच मुलांचं संगोपन व्यवस्थित करू शकते का? सुशील नाही का करू शकणार? आत्या अगं, शारीरिक आकर्षण किंवा शारीरिक सुखच सर्व काही नसतं. आत्मिक समाधान त्याहून जास्त महत्त्वाचं आणि ते आत्मिक समाधान मला आरतीने प्रदान केलं आहे. माझ्या संपूर्ण आयुष्यासाठी ते मला पुरेसं आहे. आता माझ्या जीवनाचं सार, आधार माझी परीच... आई, सुशील असा आहे यात त्याचा काय दोष? परमेश्वराने त्याला शारीरिकदृष्ट्या अपूर्ण ठेवलं असलं तरी ममतेने ओतप्रोत प्रेमळ हृदय नक्कीच दिलं आहे. एकाच परमेश्वराने आपल्यालाही बनवलं आणि त्यालाही. मग आपल्याला काय अधिकार आहे त्याच्या कलाकृतीला हीन समजण्याचा.''

राघवचं बोलणं ऐकून सुमाआत्याची अवस्था त्या झाडावरून गाळलेल्या सुकलेल्या पानासारखी झाली होती. जे फक्त हवेत इकडून तिकडे उडत होतं, स्वतःच अस्तित्व शोधत होतं पण थांग काही लागत नव्हता. बाहेर गार वारा वाहत होता. मध्येच पाखरांची किलबिल ऐकू येत होती. बोलण्या-बोलण्यात सकाळ कधी झाली, हे त्या तिघांनाही समजलं नाही. सकाळी नाश्त्यानंतर वसंतरावांनी राघव, शामल आणि सुमाला हॉलमध्ये बोलावलं आणि बोलायला सुरुवात केली इतक्यात सुशीलही तिथे आला. सुशीलला पाहून राघवला एकीकडे आनंद झाला, तर दुसरीकडे वसंतरावांची प्रतिक्रिया काय असेल याची भीती वाटू लागली.

''हे बघ राघव, आज काय तो सोक्षमोक्ष लावूनच टाकू. सुशीलला इथे पाहून तुला आश्चर्य वाटलं ना. मीच त्याला इथे बोलावून घेतलं आहे. त्याचं काय आहे ना रात्री मी तुम्हा तिघांचं बोलणं ऐकलं आणि एका निष्कर्षावर पोहचलो. आरती गेल्यानंतर तुझ्यासाठी बरीच स्थळं सांगून आली पण परीचा सांभाळ करेल अशी एकही नव्हती. कोणाला पैशाचा हव्यास, तर कोणी बंगला गाडी पाहून भुललं तर कोणी स्वातंत्र्याचा स्वतःच्या सोयीनुसार अर्थ लावून स्वातंत्र्य भोक्ती... त्यामुळे मी रात्री बराच विचार केला. एका असामान्य व्यक्तीला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार नाही का? सुशीलच्या मनात परीबद्दल असलेली ममता, वात्सल्य पुरेसे नाही का? परी रडत असताना गच्चीवर अस्वस्थपणे तासन् तास फेऱ्या मारणारा सुशील मीही पाहिलाय. त्यामुळे मी एक निर्णय घेतला आहे. वसंतरावांनी राघवच्या हातातून परीला घेऊन सुशीलच्या हाती सोपवलं. मला माहिती आहे राघव तुला आश्चर्य वाटत असेल; पण काय करू मीपण एक माणूसच आहे ना. आधी तुझा निर्णय मला मान्य नव्हता; पण बराच विचार केल्यानंतर तुझं म्हणणं पटलं मला. अरे, सुशील अपूर्ण नाही. प्रेम, ममता, वात्सल्य आणि संवेदनशील मनाने तो पूर्ण आहे. आमच्यासारखे संकुचित आणि कुंठित बुद्धिमतेचे लोकच खरंतर आपल्या विचारांनी अपूर्ण असतात. समानतेचा गाजावाजा करणारे आमच्यासारखे लोकचं सामाजिक विसंगतीना जन्माला घालतात. यात दोष सुशीलचा नाही आमच्या विचारसरणीचा आहे, जो एका मुलाच्या शारीरिक विसंगतीला किन्नर..... हिजडा ही नावं देऊन मोकळे होतो. आम्ही पार विसरूनच जातो की यांच्यातही एक प्रेमळ मन आहे. त्यांनाही परिवार हवा आहे आपल्याचं प्रेम हवं आहे. राघव अरे, प्रवाहाच्या विरुद्ध वाहायला सगळ्यांनाच नाही जमत. खूप हिंमत लागते त्यासाठी आणि ती हिंमत तू दाखवलीस. तुझ्यामुळे समाजाने नाकारलेल्या आणि उपेक्षित सुशीलला असामान्य मातृत्व बहाल झालं. मला अभिमान आहे बाळा तुझा.''

वसंतरावांच बोलणं ऐकून सुशीलच्या डोळ्यांत पाणी आलं. आजवर ऐकलेली निंदा, उपेक्षा सगळं काही त्या पाण्यात वाहून जात होतं. आज तो खूप खूष होता. त्याचा एक एक अश्रू त्याच्या मनातील अव्यक्त भावना व्यक्त करत होता. एकीकडे वसंतराव बोलत होते आणि दुसरीकडे सुशील परीला आपल्या मिठीत घेऊन जोजवत होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाट वाहत होते. असं वाटत होतं जणू ह्या इवल्याशा परीने जादूची कांडी फिरवली आणि सुशीलच्या अपूर्ण जीवनाला पूर्णत्व प्राप्त करून दिलं.



# माहेरवाशीण

**संदीप मणेरीकर**
**गोवा**

कंडक्टरनं 'सावरवाडी, सावरवाडी कोण आहे का?' असा आवाज दिला आणि घंटेची दोरी ओढली. 'टिंण्ण' अशी एकदा घंटी वाजली आणि अर्ध्या मिनिटाच्या आत 'भुश्श' असा आवाज करत आणि धुरळा उडवत एसटी बस थांबली. आपली तीन मुले आणि कापडी एक पिशवी व काळी बॅग काखोटीला मारून शकू बसमधून उतरू लागली आणि त्या वेळी सावरवाडी बस थांब्यावर गर्दी करून असलेल्या शकूच्या भाचरांनी अचानक 'आत्या इली, आत्या इली' असा एकच गलका केला. त्या मुलांपैकी एकाने शकूच्या हातातील काळी बॅग घेतली. एकाने कापडी पिशवी घेतली. शकूच्या लहान मुलीने गंधाने आपल्या आईचा हात सोडला नाही. तिच्याहून मोठे दोन्ही मुलगे सुहास आणि सात्त्विक हे तिथे आलेल्या मुलांसोबत आपल्या मामाकडची वाट अगदी मौजेने चालू लागले. पाच मिनिटांच्या अंतरावर शकूचं माहेर होतं. शकू आणि तिच्या तीन मुलांना घरी नेण्यासाठी हे भाचे कंपनी रस्त्यावर आलेले होते. शकूच्याही मनात कित्येक आठवणी दाटून आल्या होत्या.

शकूचं सावरवाडी हे माहेर. तिचा विवाह सावरवाडीहून साधारण साठ-पासष्ट किमी अंतरावरील कोरभाट या खेडेगावातील एका शेती-बागायती असलेल्या शांताराम नावाच्या शेतकऱ्याशी वयाच्या विसाव्या वर्षी झाला. कोरभाट हे कोकणातलं अस्सल खेडेगाव होतं. घराच्या समोर माडाची झाडं. शेणानं सारवलेलं अंगण, अंगणात पोफळींच्या आणि माडांच्या झावळ्यांचा थंड मंडप. तसंच पाहिलं तर सावरवाडी हे खेडेगावच होतं. नुकतीच आलेली बस जर चुकली तर चार पाच किमी अंतर पायी चालत यावं लागलं असतं शकूला. पण कोणी ओळखीचा भेटलाही असता. शेवटी शकू इथे म्हणजे माहेरवाशीण होती. त्यामुळे तिला कोणीतरी लिफ्ट दिलीही असती. वाटेत एक गाव मिळायचं; पण ते गाव सोडल्यावर संपूर्ण जंगलच परिसर. मातीचा रस्ता. चुकार एखादी दुचाकी गेली तर किंवा एखादा लाकडांचा व्यवसाय करणारा ट्रक. ह्यापलीकडे त्या रस्त्यावरून फारशी रहदारी नव्हती. पंधरा दिवसांपूर्वी शकूने सात्त्विककडून मामाला आपण येणार असल्याचं पत्राद्वारे कळवलं होतं. परंतू कोरभाटहून तीन-चार बस तरी पकडाव्या लागल्यानंतर तालुक्याच्या ठिकाणाहून ही शेवटी बस शकूला मिळालेली होती.

सकाळी साधारण दहाच्या सुमारास घरातील सर्वांची व्यवस्था करून मजल दरमजल करत संध्याकाळी ६ च्या दरम्यान शकू घरात पोहोचली होती. घरात जाताच अगदी अंगणातच तिची म्हातारी आई तिची वाट पाहत असलेली तिला दिसली. टचकन डोळ्यांत आलेलं पाणी शकूनं पदरानं पुसलं.

'आये कशी आसय?' शकूनं आयेच्या खांद्यावर हात ठेवून विचारलं.

'माजां मेल्याचा काय इच्यारतस, सुकलला पान. बारीक वारोय पुरे जाता पडाक. जावंदे, तू कदी भायर सरलय?' आयेतील नेहमीची आई जागी झाली.

'अगे सकाळी.. हेंचा, सासवेचा काय तां रानून ठेवन धाच्या सुमराक भायर सरलय. मगे थंयसून चार चार गाडयो बदलीत एकदांचा पोचलय बाये तुज्याकडेन.' शकूनं इत्थंभूत माहिती दिली.

तितक्याच शकूच्या मोठ्या भावानं, अण्णानं 'बाय, आता खळ्यातच रवाचां ठरयलात काय दोगांनी?' असा जरा आवाज चढवून प्रेमळ इशारा देताच शकू आणि आये दोघंही हसली आणि घरात शिरली.

अण्णाच्या बायकोनं माधुरीने पाणी आणि गूळ टेबलावर ठेवला. शकूची आस्थेनं चौकशी केली. भावोजी, सासू, शेजारी पाजारी यांची चौकशी केली. आणि 'च्याय दोअरतय गो बाय...' असं

म्हणून आत निघून गेली.

शकूची लेकरं मामाच्या मुलांसोबत रमली होती. शकूचा दुसरा भाऊ दादा गोठ्यातून दूध घेऊन आला. तर तिसरा भाऊ त्याला भाई म्हणत, तो कामावरून पाहोचणारच होता. हा भाऊ शकूचा जास्त लाडका होता. त्याची बायको जरा साधीभोळी होती. घरात माधुरीचा एक कॉलेजमध्ये जाणारा भाऊ शिकायला होता. माधुरीने दोन सतरंज्या आणून ओसरीवर घातल्या. थोड्या वेळाने अंगणातून 'बाय....' अशी साद ऐकू आली आणि भाई दारात आला. मग लगेच घरात हालचाल सुरू झाल्यासारखी वाटली. कारण भाई हा हरहुन्नरी आणि गप्पिष्ट, हसत खेळत विनोद करत गोष्टीवेल्हाळ असा होता.

त्याने आल्या आल्याच त्या सतरंजीवर आपली पथारी पसरली. गंधाला आपल्याजवळ ओढून घेतलं. अण्णा, दादा हेही सतरंजीवर बसले. गप्पा-विनोद यांना ऊत आला. भाई अधूनमधून शकूसह आपल्या भावोजींचीही नक्कल करत होता. शकू पदर तोंडावर घेऊन हसत होती. यातच रात्र कधी झाली ते कळलंच नाही.

***

दुसऱ्या दिवशी सकाळी शकू शेजारीपाजाऱ्यांची घरं फिरून आली. जुन्या आठवणीत रमलेल्या शकूला चार-पाच दिवस कधी लोटले ते कळलंच नाही. आता शकूला सासरी जायचे वेध लागले. आज उद्या करता करता आणखी दोन तीन दिवस थांबून अखेर शकू आपल्या मुलांसह नाईलाजाने जायला निघाली. मुलांचीही मनं खट्टू झाली होती. भाईचा निरोप घेताना ती जशी गदगदली तशीच आईचाही निरोप घेताना तिला भरून आलं. माधुरीला तिने मिठीच मारली. अण्णा मूक होता, तर दादा अबोल होता. अखेर देवांना नम स्कार करून दिवाळीच्या सुट्टीत येऊया असं मुलांना सांगून शकूनं अंगणातील तुळशीला नमस्कार केला. डोळ्यांत कचरा गेल्याचं निमित्त करून डोळे पुसून घेतले आणि दारात भाईनं आणलेल्या रिक्षात बसून शकू आपल्या मुलांसह सासरी रवाना झाली.

****

दिवाळी आणि मे महिन्यात शकू अशी माहेरी आपल्या मुलांसह येत होती. पाच-सहा वर्षांनी सावरवाडीत मातीच्या रस्त्याच्या जागी डांबरी रस्ता झाला. फोन आला. पत्राची जागा आता फोनने घेतली. सुधारणा होत गेली तसतशी सावरवाडीही बदलू लागली. मुलांची शिक्षणं झाली नोकरीधंद्याचे उद्योग सुरू झाले. मे आणि दिवाळीच्या सुट्टीत येणारी शकू आता अधूनमधून येऊ लागली. सुहासनं चारचाकी घेतली होती. कोरभाटही सुधारलं होतं. दारात डांबरी रस्ता, घरात फोन, हातात मोबाईल आले. मनात आलं तर शकूला सुहास किंवा सात्त्विक चक्कर मारल्याप्रमाणे सावरवाडीला नेऊन आणत होते. आता वारंवार फोन, मोबाईल. व्हॉट्सॲप अशा माध्यमातून संवाद साधता येत होता. गंधाचे लग्न थाटात पार पडलं.

गंधाचा संसार सुखाचा सुरू झाला. रोज फोनवर बोलणं सुरू होतं. सुरुवातीला तासभर बोलणारी गंधा महिन्याभरात हळूहळू पाच मिनिटांवर आली आणि 'उद्या मी येतय गे आये' म्हणून एक दिवशी फोनवरच शकूला निरोप दिला. लग्नानंतर साधारण महिन्याभराने गंधा चार दिवसांसाठी म्हणून माहेरी आली. घरभर नाचली. सुहास, सात्त्विक यांच्याबरोबर लहान मूल झाली. आई-बापासोबत बागडली. हवे नको ते सगळे लाड आईकडून करून घेतले. बागायतीत फिरून आली. शेतीवर नजर मारून आली. आंब्या फणसाखाली बसून लहानपण कुरवाळून घेतलं. निघायचा दिवस उजाडला. शकूचे डोळे भरून आले. बाबा पिशवी घेऊन अंगणात आले. सात्त्विक गाडीत पुढे बसला होता. सुहास गाडी चालवणार होता. दोघेही भाऊ तिला घरापर्यंत सोडून येणार होते. गंधाने देवाला नमस्कार केला. आईला नमस्कार करायला वाकली तोच शकूने तिला मिठीत घेतली. डोळ्यांतून पाणी... गंधाला त्या वेळची सावरवाडची माहेरवाशीण आपली आई आणि आज्जीची ती मिठी आठवली. शकूला सावरवाडचं घर डोळ्यांसमोर दिसून येत होतं. परंतू पाण्याच्या लोटांपुढे दोघांच्याही डोळ्यांसमोर सारंच काही पुसट पुसट दिसू लागलं होतं.



# अस्तित्व

**श्री. वि. वा. भागवत**
नारूर-कुडाळ

कोंऽऽगे आली कोंऽऽगे
आमच्या लेखी हीच तिची ओळख आणि नाव..!!

ती दिसली की आम्ही बाहेरूनच ओरडून आईला वर्दी द्यायचो, लांबूनच ती येताना दिसायची, हातात परड्यातली भाजी नाहीतर डोक्यावर शेतात टाकायला घेऊन जात आलेली शेणाची टोपली असायची.

तीच खरं नाव काय आहे हे कधी जाणून घ्यावंस वाटलंच नाही, तसही इथे वास्तविक नावं कधीच गळून पडून बाबलो, बाळगो, म्हातारो, थोरली, न्हानगी, मुंबई रिटर्न असलेली मुंबईकारीण, आवाटदाजी असलीच नाव रूढ झालेली असतात. मूळ नाव ही फक्त रेशनकार्ड, सातबारा आणि दाखल्यावर लिहिण्यासाठीच लक्षात ठेवली जातात.

वास्तविक तीच नाव सुनीता पण आमचं जुनं घर वाड्यासारखं ऐसपैस.. बाहेर कोण आलाय हे सहसा घरातून दिसत नसे .. तेव्हा बाहेर कोण बाई आलेली चाहूल लागली की घरातून आजी, आई काकू आतूनच विचारायच्या कोण गे ?? हे आम्ही दोघा भावांनी अगदी लहानपणी 'हिच्या बाबतीत पहिल्यांदा' ऐकलं आणि आम च्या बोबड्या बोलांनी हेच नाव पक्क केलं.. कोंऽऽगे

नंतर आम्ही शेतात घर बांधलं आणि पुढे कोंगे रोजचं भेटायला लागली.. आमचं घर वाडीपासून एका बाजूला असल्याने वाडीत संपर्क तसा कमीच पण ही कोंऽऽगे घरी आली की वाडीतील, आवाटातील बातम्या कळायच्या.. आली की आईला हाक मारत खळ्यात पेळेला टेकायची.. वायचं कढतवनी हाड म्हणून हक्काने



चहा मागून घ्यायची.. झिला काय करतस रे म्हणून आमची जाग घ्यायची.. आईशी तिच्या बऱ्याच गप्पा चालायच्या.. त्यातल्या बऱ्याचशा ह्या संसारातील संघर्ष, कटकटीवरून आणि त्रासिक सुरांच्याचं असायच्या!! तिलाही मन मोकळं वाटायचं..कोटा संपला की उठायची .. येतंय मगे सवडीनं अस म्हणून अर्ध्या तासाने निघायची..तीच्या डोळ्यात नेहमीच एक कारुण्याची झाक असायची..मूळचा सावळा वर्ण, संसाराच्या खस्ता खाऊन, उन्हतान्हात शेतात राबून अगदी रापलेला तरीही आश्वासक 'मायाळू' चेहरा.. कायमच जुनी पण खोचून नेसलेली हिरवी नऊवारी साडी, डोक्यात फुलं माळलेली, बघताक्षणी संसारातील लक्ष्मी वाटावी अशीच.

घरी जाताना परत येणार अगदीच नाहीतर वाटेने कोंऽऽगे भटणी, जातंय गे.., दोपार झाली, तांदूळ घालूचे हत अशी हाक मारत जाणार हे नक्की!! जाता जाता दुपारचं काही वेळा घरी येऊन पांढरवनी ढवळलंस काय गे..? अस अस्सल ठेवणीतला शब्द विचारून ताक घेऊन जाणार!! हंगाम चालू झाला की लाल माठ, अलकुल, मूळा, वाली अशा भाज्या आणून देणार.. ईनु...वायचं चार शेंगे दी मरे काढून अस मला आमच्या घरच्या शेवग्याच्या शेंगा काढून द्यायला लाडीगोडी लावणार.. कोणाच्या बारश्याला जायच असलं तर हक्काने येऊन अमक्याच्या झिलाचो बारसो हा आज, घोटीत घालुक कपडो दी, तुझा मगे कायता देतंय अस येऊन सांगणार, यातलं बऱ्याचवेळा तिला काही परत द्यायला जमायचं नाही पण आई नित्य नियमाने तिला तिने मागीतलेल नेहमी द्यायची.

डोक्यात पाती माळायची तिला भारी हौस, अगदी एकावर दोन दोनावर तीन सुद्धा, आयुष्याच्या अगदी उत्तरार्धात ती गावच्या देवळात सेवेला लागली आणि ही तिची एकच हौस तिला पुरवता आली.. गावातील जत्रेत तर तीच रूप या भरगच्च माळलेल्या पातींनीचं खुलूनं दिसायचं !

घरची गरिबी पाचवीला पूजलेली, अनेक खस्ता खात खात कष्टाच्या वाटेवरून नवऱ्याच्या खंबीर साथीने ती संसाराच्या गाडा ओढत होती. तिचा नवरा एकदम निर्व्यसनी साधा माणूस ...आयुष्य गडीपणात आणि गुरं राखण्यात गेलं.. दुसऱ्याची जमीन खंडाने घेऊन राब राब राबून भात पिकवणे एवढंच त्याला माहीत. ऊन पावसाची तमा न बाळगता तो शेतात काम करायचा. गुरांवर त्याच अतीव प्रेम. एकवेळ स्वतः उपाशी राहील पण वाड्यातील गुरांना चार कापून घालण्यात हयगय नाही.. आम्हाला बघून धडकी

भरेल एवढा चारीचं पेंढकं तो एकट्याने कापून स्वतः उचलून घेऊन यायचा. एका 'कढतवंणी' चहाच्या पेल्यावर तो ही सगळी काम करायचा. खेड्यातील गरिबीमुळे आणि पूर्वी सुविधा नसल्याने अंगी भिनलेल्या सवयीमुळे कोंगे अनेक आजार अंगावर काढायची. कालांतराने शेजारच्या गावात डॉक्टरची सोय झाली, पण तेव्हाही ती दुखणं सहन न होणार झालं तरच डॉक्टरकडे जायची. जा-ताना हातावर 'आज डाक्टराक किती रुपये घालुक व्हये' त्याचा हिशेंब हातावर मांडायची. 'पाठीन चढता, संबध इरइरता, पायात फुटाफुट होता, लकनी येना नाय, पोटात चावता असली लक्षण सांगून, या आजारावर हुकमी औषध देणारा डॉक्टर अजून तरी माझ्या बघण्यात नाही त्यामुळे दुसऱ्या दिवशी साहजिकच वशाड पडो, काल तीस रुपये घालून सुधा पाच पैशाचो गुण नाय! असे बडबडत ती आमच्या घरी यायची. अगदी पाच दहा वर्षांपूर्वीपर्यँत आपली सगळी सुख दुःख शेजारी वाटायची सवय होती.. जशी ती सांगितली जात तशीचं ती ऐकूनही घेतली जात, सल्ले दिले जात.. त्यामुळे रांधणाऱ्या चुली वेगळ्या असल्या तरी आवटातली सगळीच माणस आपली घरची होती. आपल्याला हवी असलेली एखादी वस्तू इतरांच्या घरी उपलब्ध असेल तर स्वतःला जायची गरज नव्हती, फक्त कोणाकडूनही निरोप पोचवायचा. वस्तू पोचवली जायची.. उन्हाळ्यात फक्त 'आपाक दारातल्या झाडाचे दोन फणस काढून ठेवक सांग' एवढाच निरोप पुरेसा असायचा.. सावंतीणीन चार शेगलाचे शेंगे मागलेल्यानं अस कळलं की आम्ही शेगलाच्या शेंगा घेऊन सरळ तिच्या घरी.. तिच्यादारी फुल भरपूर म्हणून रोजच्या पुजेसाठी लागणारी फुल काढायला आम्ही रोजच तिच्याकडे जायचो.

मधल्या काळात शिक्षणासाठी मी बाहेरगावी गेलो आणि या सर्वांशी संपर्क कमी झाला. कधीतरी भेट व्हायची पण तीही तशी धावती, पोटभर नाही.. काळ आपली करामत दाखवत होता, एकेकाळी ऊर दडपून ओझं उचलणारी गात्र आता थकत चालली होती. मुलं कर्ती सवरती, नांदती झाली तरी सुबत्ता अजूनही दूरच उभी होती, कोपऱ्यातल्या दारामागे केरसुणीसारखी अंधारात.

इतकी वर्ष खपूनही प्रपंचाचा गाडा कधी मनासारखा धावलाच नाही, रक्त आटवून शिंपलेल वंगणही कदाचित त्या चाकांना पुरलं नसावं. पण आयुष्याच्या संध्याकाळी ती सल कधी पोटातून ओठावर आली नाही, एका अनामिक धाकाने. संसाराची ठिगळ जोडत मनातून कुढत बसणं हा तर नियतीने तत्कालीन सर्वच कष्टकऱ्या स्त्रियांना दिलेला घाऊक शाप.. तेच एक काय ते पदरात भरभरून पडलं बाकी शून्यच..

कालांतराने मी गावी आलो, पण आता तसा लोकसंपर्क कमी झाला. शहराची ओढ खुणावू लागली..अधेमधे खुशाली कळत होतीच, एकेकाळची जोमाने सळसळणारी ही माणसं आता ख्याली खुशाली पुरती उरली होती. पूर्वीचा निवांतपणा आता फक्त बालपणीच्या आठवणीपुरता उरला होता. विस्तारलेल्या जगाच्या गतीचे वेध आता लागले होते.

आणि एके दिवशी बातमी आली...कोंगे गेली!!

अनेक दिवस ती आजारीच होती हेही आपल्याला कळू नये याचंच ओशाळवाणं आश्चर्य वाटत होत..तिच्या घरी भेटायला जायलाही तब्बल महिना लागावा इतके का आपण व्यस्त झालो..???

ती गेली.... आता डोळ्यासमोर फक्त 'तो' होता...

सगळंच बर चाललेलं असताना आपण अनेक गोष्टी गृहीत धरतो, बायको ही त्यातलीच एक.. ना तिच्या कष्टाची जाणीव करून घेत, ना तिच्या दुःखावर कधी फुंकर घालत.. ती फक्त जळत असते दिव्यातल्या वातीसारखी, वाऱ्याशी झगडत.!! जिवंत असताना म्हातारपणात फक्त दोन वेळच वेळेवर जेवण वाढण एवढीच तिची किंमत केलेली असली तरी, 'ती' तेवढीच नसते हे ती गेल्याशिवाय कळत नाही. दिवसभर काही काम नसतानाही त्याचे भिरभिरणारे डोळे जेव्हा तिला शोधत राहतात तेव्हा ते आवर्जून जाणवतं.... तीचं असणं, तीचं अस्तित्व, तिच्याचमुळे त्याला आलेलं पूर्णत्व.!!

आता फक्त तिची चुलीकडची जागा हाताने रापणं, आल्या गेलेल्याना भिंतीवर टांगलेला तिचा फोटो , खोल गेलेल्या डोळ्यांच्या कडा दाबत दाखवणं एवढंचं त्याच्या हाती उरलेलं !! सहजीवनाचा अध्याय असा कुठेतरी तुटल्यासारखा संपतो.. या गजबजलेल्या जगात भकास एकाकीपणा मागे ठेऊन..!!

म्हणूनच की काय मी आहे म्हणून .... या तिच्या वाक्याला फार फार महत्व आहे.!!

मनाचा दोरा आणि हाताची सुई करून संसाराची गोधडी शिवणाऱ्या समस्त स्त्रियांना समर्पित!


# निनावी सुखाची चौकट

**अनघा पंडित**
**देवगड**

ते त्यांचं त्रिकोणी कुटुंब. जयवंतराव त्यांची पत्नी प्रतिभा आणि मुलगा शशांक. हे कुटुंब चाळीत असूनदेखील सगळ्यांपासून अलिप्त. याचं मुख्य कारण म्हणजे जयवंतराव स्वतःच. एक अतिशय विचित्र मनुष्य, त्यांनी स्वतःसोबत स्वतःच्या कुटुंबालाही एका चौकटीतच बांधून ठेवलेलं. स्वतःची अशी एक नियमावलीच बनवलेली. जयवंतरावांच्या आदेशाशिवाय कसलंच पानदेखील हलत नसे. प्रतिभाताई आणि मुलावर तर प्रचंड बंधनं लादलेली. बाहेर फिरायला जायचं नाही, कोणाच्या घरी नाही इथपासून ते घरात खरेदी केल्या जाणाऱ्या सुईपर्यंत सगळ्या गोष्टीत जयवंतरावांची मक्तेदारीच जणू. त्यामुळे त्यांना ना मित्र परिवार ना शेजारी. यामुळे प्रतिभाताई मात्र लग्न झाल्यापासून दुःखी झाल्या त्या आजपर्यंत. दुःख हलकं करायला जिवाभावाचं असं कोणीच नव्हतं तिच्याजवळ. मुलगादेखील वडिलांच्या अशा वागण्यामुळे मनानं त्यांच्यापासून दुरावला जात होता. या सगळ्यामुळे मग जगायचं तरी कशाला? असा प्रश्न नेहमीच प्रतिभाताईना पडायचा; पण मुलाच्या तोंडाकडे बघून त्या हे सर्व सहन करत होत्या.

एक दिवस जयवंतरावांच्या गावी कोण्या एका कार्यक्रमाचं आयोजन केलं जातं आणि त्यात ऐन पावसाचे दिवस प्रतिभाताईने त्यांना हजार वेळा न जाण्याची विनंती केली... पण आजवर त्यांनी कधी ऐकलेलं जे ते आज ऐकतील... अखेर कोणालाही न जुमानता जयवंतराव गावी जायला निघाले. मात्र त्यामुळे निदान दोन दिवस तरी घरात जरा मोकळेपणानं वावरता येईल या आनंदात प्रतिभाताई आणि शशांक होते.

त्या दिवशी शशांकदेखील कामावरून लवकर घरी आला प्रतिभाताईनी देखील आज त्याच्या आवडीचं जेवण बनवलेलं. आज कित्येक दिवसांनी अगदी आनंदात समाधानानं त्यांनी जेवण केलेलं.



त्या दिवशी त्यांनी मनसोक्त गप्पा मारल्या. शशांकचा आईवर फार जीव होता. त्याला तिची खूप काळजी होती आणि अलीकडेच तिला हृदयविकाराचा झटका आला तेव्हापासून जरा तो जास्तच काळजी घेत होता. ती हृदयविकाराची रुग्ण आणि त्यात दररोज तिला होत असलेला मानसिक त्रास हा शशांकलाही सहन होत नव्हता; पण तरीही तो काहीच करू शकत नव्हता.

दुसऱ्या दिवशीही शशांक नेहमीप्रमाणे कामाला गेला आज त्याचे वडील जयवंतराव गावाहून परत येणार; पण ते येण्याआधीच जयवंतराव ज्या ट्रेनने येत होते त्या ट्रेनला रात्री अपघात झाला आणि त्यात जयवंतरावांचा मृत्यू झाला, ही दुःखद माहिती देणारा फोन रेल्वे खात्यातून आला. वडिलांवर शशांकचं एवढं प्रेम नसलं तरी ते ऐकून त्याच मन सुन्न झालं. त्याला काय करावं तेच सुचेनासं झालं आणि महत्त्वाचं म्हणजे ही बातमी आईला कशी सांगायची, ते शशांकला कळतच नव्हतं कारण ती आता एक हृदयविकाराची रुग्ण होती.

शशांक तसाच लगेच घरी आला आणि कसाबसा धीर करत काळजावर दगड ठेवत त्याने आईला ही बातमी सांगितली. आई त्यावर काहीच म्हणता काहीच बोलली नाही. फक्त खुर्चीत बसून एकटक खिडकीबाहेर बघत राहिली. असाच एक दीड तास लोटला आज प्रतिभाताई जयवंतरावांच्या जाचातून खऱ्या अर्थानं मुक्त झाल्या होत्या, सगळ्या बंधनाच्या चौकटीतून मोकळ्या झाल्या; पण तरीदेखील प्रतिभाताईंच्या चेहऱ्यावर मात्र कसल्याच भावना नव्हत्या त्या तशाच बसून राहिल्या आणि इतक्यात कोणीतरी दरवाजा ठोठावतं ते ऐकून शशांक उठला आणि दार उघडून बघतो तर दारात जयवंतराव उभे.

क्षणभर शशांक आवक झाला.

अपघात झालेल्या ठिकाणाहून जयवंतराव बरेच दूर फेकले गेल्याने ते फक्त जखमी आणि बेशुद्ध होऊन झाडीत पडले आणि शुद्ध आल्यावर ते घरी आलेले.

प्रतिभाताईंनी बसल्या जागेवरूनच दारात पाहिलं आणि खुर्चीतून धाडकन खाली कोसळल्या. लगेच धावाधाव सुरू झाली. डॉक्टरला फोन गेले दारात ॲम्ब्युलन्स आली शशांकने लगेच आईला हॉस्पिटलमध्ये नेलं पण.... पण तोवर प्रतिभाताई हे जग सोडून खूप दूर निघून गेलेल्या होत्या...

दुसऱ्या दिवशी जेव्हा पोस्टमार्टमचा रिपोर्ट शशांकाच्या हाती पडला त्यात लिहिलेले असते की, प्रतिभाताईंचा मृत्यू हर्षवायूच्या झटक्याने झाला; पण नेमका कसल्या आनंदानं प्रतिभाताईंचा मृत्यू झाला हे मात्र समजू शकले नाही... अजूनही...



# अभागिनी

**सौ. भारती दिलीप सावंत**
**खारघर, नवी मुंबई**

आज वासंतीचे मन सैरभैर झाले होते. दिनेशला जाऊन एक महिना उलटून गेला होता. पण महिन्यातला एकही दिवस दिनेशच्या आठवणीशिवाय गेला नव्हता. मुले अनेक वेळा त्यांच्यासोबत येण्यासाठी आग्रह करत होती; पण आत्तापासून मुलांच्या जीवनात ढवळाढवळ करायला ती राजी नव्हती. गेल्याच महिन्यात ती मुख्याध्यापिका पदावरून निवृत्त झाली होती. निवृत्तीनंतर काय करायचे हे ठरवलेले. कल्पनांचे मनोरे अचानक पूर्णपणे ढासळून गेले होते. छातीत दुखण्याचे निमित्त झाले अन् एका तासातच होत्याचे नव्हते झाले. डॉक्टरांना फोन करून बोलावण्याचीही संधी न देता दिनेशचे हृदय बंद पडले. वासंतीवर आभाळच कोसळले. अठ्ठावीस वर्षे शाळेत शिक्षिकेची नोकरी केली होती. पैशाची काही ददात नव्हती; पण वैवाहिक जोडीदाराची उणीव काट्याप्रमाणे टोचत होती. लहानपणापासून दोन्ही मुले शिक्षणाच्या निमित्ताने वसतिगृहात राहत होती. त्यामुळे दिनेश आणि वासंती-'मेड फॉर इच अदर' असे जोडपे होते. एकमेकांची सुखदुःखे, कामे, व्यवहार एकमेकांच्या सहमतीने वाटून घेतली जात. आपल्या नोकऱ्या सांभाळत त्यांनी नाती टिकवली नाहीतर रुजवली होती. गेल्याच वर्षी त्यांनी निवृत्तीनंतर युरोप टूरला जायचे निश्चित केले होते. गेल्याच महिन्यात वासंतीच्या निवृत्तीचा कार्यक्रम जोरात केला होता. मुलांनी मोठ्या हॉटेलमध्ये मेजवानी आणि सत्कार समारंभ आयोजित केला होता. किती आनंदात होते सगळे! सगळीकडून कौतुक आणि अभिनंदनाचे फोन येत होते. वासंती आनंद सागरात डुंबून गेली होती. मुलांनी फुगे, लाइटिंग नि फुलांनी सारा हॉल सजवला होता. वासंती आणि दिनेशने हॉलमध्ये प्रवेश करतात फोटोग्राफरच्या फ्लॅशने डोळे दीपवून टाकले होते. वासंतीला तरी स्वप्नात असल्याचा भास झाला होता.तिने हळूच चिमटा काढून पाहिले नातेवाईकांकडून फुलांचे गुच्छ आणि गिफ्ट स्वीकारताना अंगावर रोमांच उभे राहत होते. शाळेतील मुले नजर चुकवून डोळे



पुसत होती. सहकारी जडावलेल्या नेत्रांनी अभिवादन करत होते उद्यापासून वासंती त्यांच्या समूहात नसल्याने ते दुःखी झाले होते. सर्वांत जास्त खूष होते दिनेश...

दोघांच्या धावपळीच्या नोकरीमुळे एकमेकांना तितकासा वेळ देता आला नव्हता. आता त्याची भरपाई होणार होती दोघांनाही एकमेकांशी भरभरून बोलायचे होते. हातात हात घालून चांदण्यात चालायचे होते. रात्री आइस्क्रीम आणि भेळ खात चौपाटीवर बसायचे होते. अशा कल्पनाविश्वात दिनेश गुंग होता. सर्व निमंत्रित पाहुणे मंडळी निघून गेल्यावर मात्र दिनेशने वासंतीकडे मिश्कीलपणे पाहत डोळा मिचकावला. वासंतीदेखील गोड लाजली होती. मुलांनी पाहुण्यांना सोडायला जायच्या बहाण्याने आई-बाबांना मुद्दामच एकांत दिला. सुना पसारा आवरायला आत गेल्या. सगळ्यांची पांगापांग झाल्यावर दिनेशने वासंतीचा हात आपल्या हातात घेतला. त्यांना भरून आले होते. सजल नेत्रांनी त्यांनी वासंतीचा हात हलकेच दाबत बोलायला सुरुवात केली ,वासंती खूप केलेस माझ्यासाठी आणि माझ्या संसारासाठी. आता थोडा आराम कर आता तुला सुखात असलेले मला पाहायचे आहे. तिचा या शब्दांनी ऊर भरून आला होता. तीही उत्तरली, दिनेश तुम्ही आणि मुले माझ्या काळजाचे तुकडे आहात. तुम्ही सुखी असाल तरच मी खूष राहू शकते. समारंभादिवशी सर्व जण आनंद सागरात न्हाऊन गेले होते. सुनांनी आईंची फर्माईश पुरी करण्याचा जणू विडाच उचलला होता. त्यांनी वासंतीची खोली फुलांनी सजवून ठेवली होती. तिचे कपड्यांचे नि पुस्तकांचे कपाटही नीट लावून ठेवले होते. बस्स हुकूम सोडायचा अवकाश, हर चीज हातात मिळणार होती. तिला एकटेपणा जाणवू नये म्हणून मुलांनी टीव्ही आणि छोटी म्युझिक सिस्टीम फिट करून घेतली होती. आई निवृत्त झाल्यावर तिच्या आवडीची दिनचर्या सर्वांनी ठरवूनही टाकली होती. आता आईची नवीन इनिंग सुरू झाली होती. निवृत्तीनंतरचे जीवन आरामात व्यतीत करायचे ठरवून तीदेखील उत्साहात होती.

नवीन छंद जोपासायचे नि नातवंडांसोबत शांत आयुष्य जगायचे ठरवणाऱ्या वासंतीच्या जीवनात हे नवीनच संकट आले. होत्याचे नव्हते झाले. तिच्या सुखाला कुणाची नजर लागली कोण जाणे! बघता बघता दिनेशचे प्राणपाखरू उडून गेले. सर्व स्वप्नांचा चुराडा झाला. कुणाला दोष द्यायचा- दैवाला की स्वतःला? मुलांनी जडावल्या नेत्रांनी बाबांचे मृतक संस्कार केले. अस्थी रक्षाविसर्जन झाल्यावर मुले आईला स्वतःबरोबर येण्यासाठी आग्रह करू लागली. वासंती सैरभैर झाली होती. काल आणि आजमध्ये जमीन-अस्मानाचा फरक होता. काल आनंदाने ओथंबलेला नि आज क्लेशदायक. मुलेही कावरीबावरी झाली होती. अचानक पडलेल्या जबाबदारीने भांबावून गेली होती. बाबांच्या आकस्मिक मृत्यूने नि आईच्या काळजीने त्यांना काहीच सुचत नव्हते; पण आईला तसे न दाखवता दिलासा देत होती. बाबांची कमतरता पुरी करण्याचा आटोकाट प्रयत्न करत होती. वासंती थिजली होती. मूक झाली होती. मुले तिच्या काळजीने आतून पोखरली होती. आज दिनेशला जाऊन महिना उलटला होता.

अचानक तिने मनाशी एक निर्णय घेतला. अनाथालयाला फोन लावला. उद्यापासून ती अबला निराधार स्त्रियांचा आधार बनणार होती. तेही त्यांच्यासोबत राहून. दिनेशच्या अनुपस्थितीत आयुष्य पार पाडण्यासाठी आज तिला तोच निर्णय अचूक वाटला होता....

# Cinderella 2022

Nupur Jogelekar
Pune

We have all heard of Cinderella. Her miserable life with her stepmother and sisters . Her best friends in the mansion, the little mice…then suddenly there's a Royal Ball. Her fairy. Godmother transforms her into a lovely lady and off she goes to the palace. Here of course she meets her Prince Charming!! One waltz and they're in love. However in her run back home before midnight, she drops a slipper at the palace, which the prince uses later in the story to find her , marry her and live happily ever after!! Sweet fairy tales; adulthood however has its own way of unfolding this fairy tale to us!

Fast forward to 2022!! Today's Cinderella is not your favourite fairy tale princess!! You'll probably find her on a two-wheeler with a red skull helmet, faded jeans, elegant glasses and some blue colour in her hair!! She could also be spotted reading a book under a tree in some park with a cigarette between her fingers and classical music in her ears !

This month's story is about Ritika….Ritika is a engineer turned filmmaker. Born in a conservative Maharashtran family, she was conditioned to get a good education, get a high paying job and marry her Prince Charming!

Ritika did all this until her high paying job started feeling very suffocating. Her Prince Charming refused to 'let her' travel abroad for work after getting married. And what was worse , she felt no passion for engineering.

All throughout her school and college days she was admired for the creative plays, role plays and short films she made. Her best friend Aryan always encouraged her to pursue this passion of hers. She silently loved him but did not have the courage to tell him. By the time he shared his feelings with her , she was engaged to her Prince Charming!!

After returning her engagement ring , she called Aryan. "I don't know what I am doing. I am done with this get married and everything will be fine story! I have resigned from my job. And my parents have asked me to find my own path for myself. Just that they refuse to accommodate me after the embarrassment they feel I've put them through. I've packed my bags and I'm going to Siya's place. I miss you Aryan. I know you'll get me" she was howling over the phone while she drove to Siya's place. " Rits!! I can't hear the bad news in your tears. Why are you crying? I am surprised you didn't do this earlier. Get to Siya's safely. Make sure you enter her new address on Hoogle Maps. We'll talk once you're there."

Our dear Cinderella 2022 had moved out of the safe haven of her comfort zone and decided to ride her own carriage! Her fairy godmother here was her fierce inner self that refused to let her not value herself anymore. One decision changed her life. She did not need anybody to save her or rescue her. She was capable of doing it herself. She started working with Siya. Siya is Ritika's mentor from a direction course she had taken during college. She would assist her in whichever way she could for her film company ( just as a hobby). Now she started doing it for a living. Where did the money to support herself come from you ask? Thankfully she had invested enough money to bring her support for the first year of living without a high paying job through her 5 years at her job.

10 years later:

Ritika is on her way to owning her first production house. She has directed a few hits, many flops! She has won some great awards also lost some. She has also earned a lot of

criticism for her work!! She has to her credit not a fancy house or car, but a lovely apartment she can call home. She still enjoys riding her two-wheeler; this time with Aryan reading out directions from Google Maps to her!!

Yes they fell in love some time back. Yes they still are best friends. They are happy living their life together without a Royal Ball, glass slippers or any stereotype they don't relate to.

Was the journey as short, smooth and easy as it sounds here? Well, of course not. It took a lot of changes Ritika had to make to herself. Sleepless nights, lonely days, tear filled afternoons were apar and parcel of her journey. She learnt a lot and hopes to continue learning. She gave up the idea of a safe life for an inspiring life. She failed many times. Was laughed at multiple times. How did she get though? The relationships she had built through the years became her strongest support system.

What about her parents? They showed at her place one Diwali when they could no longer be angry with her. Did they bring her sweets, clothes and jewellery for Diwali? Of course yes! However the best gifts she could ever receive ; her father's Camera and mother's poetry book told her stories no words could've been enough to describe!

Do you know this Cinderella? Is she your daughter? Your wife? Your mother? Do you feel she is too much? Do you feel she needs to settle down? Do you feel she needs to plan her life? Well… talk to her !



# तिचा एक दिवस

**आराधना कुलकर्णी,**
**पुणे**



लेडीज जिममध्ये रेणू पोहचली तेव्हा सकाळचे साडेसात वाजत आले होते. समोरच सुधा दिसली.

''हाय रेणू! गुडमॉर्निंग! लूकिंग व्हेरी फ्रेश.'' सुधाने तिचे स्वागत केले. ''व्हेरी गुडमॉर्निंग, सुधा! आय एम ऑल्वेज फ्रेश!'' रेणूचा हसत प्रतिसाद. सुधा व रेणूची विशेष मैत्री होती. दोघी बुटिक पार्टनर्स होत्या.

तासाभराने जिममधून निघताना रेणू म्हणाली, ''सुधा, आज मिसेस बजाजना सकाळी दहाची अपॉइंटमेंट दिली आहे. त्यांना ड्रेस अगदी अर्जंटली हवाय.''

''अगं, एका दिवसात जमणार आहे का?'' सुधाची शंका.

''बघ ना! पण नाही तरी कसं म्हणणार? नेहमीच्या कस्टमर आहेत त्या. आता आपल्या कारागीर, टेलरना फोन करून लवकर या म्हणते. तू कधी येशील?'' -रेणू

''मी साडेदहापर्यंत येईनच. आज संध्याकाळी क्लबची मंथली मीटिंग आहे. आपल्या बुटिक एक्झिबिशनबद्दल बोलायचे आहे. लक्षात आहे ना?'' -सुधा

''ओ गॉड! विसरलेच होते मी अगदी. बरं, आपल्या मागच्या एक्झिबिशनला त्या सगळ्याच आल्या होत्या.'' - रेणू.

''चांगला रिस्पॉन्स मिळतोय आपल्याला. ऑर्डर्स पूर्ण करायची घाई करायला हवी.'' - सुधा

''हो ना! आता दिवाळीही जवळ आली आहे. दिवाळीच्या सगळ्या घरगुती कामातून स्वतःला एकदम फ्री ठेव!'' - रेणू.

''हो गं, तू सुद्धा फराळाचं करण्याचा घाट घालत बसू नकोस. सरळ बाईकडून करून घे.''- सुधा

''अच्छा ! आता तर निघू.''

---------------

''रेणू घरी पोहोचली. ऋषिकेश जॉगिंग करून नुकतेच परतले होते. रेणू त्यांच्याजवळ जात म्हणाली, चहा झाला ना?''

''नाही अजून. तुझ्यासाठीच थांबलो होतो.''

रेणूने चहा करून आणला.

''आज काय कार्यक्रम?'' तिने विचारले.

''आता दहाला मी निघेन. दुपारी क्लायंटबरोबर लंच आहे. महत्त्वाचं म्हणजे आज संध्याकाळी कलेक्टरांकडे पार्टी आहे. मी सातपर्यंत येतोच. तू तयार राहा.''

''अहो पण..आज तर मला क्लबमध्ये...''

रेणू! तुझ्या क्लबपेक्षा कलेक्टर जास्त महत्त्वाचे आहेत. आपल्या बिझनेसच्या दृष्टीने असे कॉन्टॅक्ट्स ठेवणं किती गरजेचं आहे हे कळत नाही का? त्यांच्या मुलीचा बर्थडे आहे आज. एक भारी गिफ्ट देऊ या निमित्ताने.

अहो पण मंथली मीटिंगला सगळ्या जणी जमतात. आमच्या एक्झिबिशनबद्दल बोलायचं आहे. तेही नाही का महत्त्वाचं? तुम्ही एकटे गेलात पार्टीला तर नाही का चालणार? रेणूचा स्वर दबका होता.

हे पहा रेणू, तुझं बुटिक, ड्रेस डिझायनिंग हे सगळं तुझा छंद म्हणून तू सुरू केलं आहेस. आपल्या बिझनेसमध्ये तूही एक पार्टनर आहेस हे विसरू नकोस.जिथं दोघांनी जाणं आवश्यक आहे तिथं जायलाच हवं. आफ्टरऑल इट इज अ पार्ट ऑफ अवर बिझनेस.

त्यांच्या आवाजात स्पष्ट रोष होता.

रेणूपुढे चांगलाच पेच पडला. खूपच धावपळ होणार म्हणायची आज! ती प्लॅनिंग करू लागली. 'ऋषी लंचला नाहीत. मलाही वेळ मिळणार नाही. सारंग आणि सुजाता असतील. आता ब्रेकफास्टला काय करावं?' अशा विचारात असतानाच सविता आली. तिला पाहून रेणूला हायसं वाटलं. तिला पटपट सूचना देऊन रेणू स्वतःच्या खोलीत गेली. तयार होत असताना बाहेरच्या हालचालींचाही ती वेध घेत होती. सुजाता व सारंग ब्रेकफास्टसाठी आले होते. दोन वर्षांचा आर्यन गमतीशीर बडबडत होता. त्याला जवळ घेऊन लाड करावेत अशी ऊर्मी तिच्या मनात दाटून आली. पण वेळ नव्हता. घड्याळाचा काटा नऊवर आला होता. तिला आता घाई

करावी लागणार होती. अचानकच ती एकदम थकली. पायातले त्राण गेले. नाइलाजाने आरामखुर्चीत विसावली. असं आताशा अधूनमधून का बरं होतं? मनाचा उत्साह शरीराला झेपेनासा झाला की काय? कल्पनेनेच ती चमकली. नाही म्हटले तरी चाळीशीचा उंबरठा कधीच पार केला होती. स्वतःला तिने छान मेंटेन ठेवले होते. पण निसर्गाचं काय? आतून होणारे बदल ती थोपवू शकत होती का? त्यातच शुगर आणि बी.पी. यांनीही तिला गाठले होते. घर आणि बुटिक सांभाळताना हल्ली ती थकायची. बऱ्याच वेळा बिझनेस मीटिंग्ज, सोशल कॉन्टॅक्ट्ससाठी पार्टीज हा ही तिच्या कामाचाच भाग होता. बसून चालणार नव्हतं. थकून तर अजिबात चालणार नव्हतं. 'उठ, उठ रेणू! आटप लवकर.' स्वतःला बजावत ती खूर्चीतून उठली. फुलसाईज आरशासमोर उभी राहून तिने बाहेर जायचा शर्ट- पॅन्ट असा सुटसुटीत ड्रेस घातला. बॉबवरून घाईने कंगवा फिरवला. 'बरं झालं मोठ्या वेणीला कायमची सुट्टी दिली ते!' तिच्या मनात आले.

ती डायनिंगरूम मध्ये आली. आता ब्रेकफास्ट करुन दहा मिनिटांतच तिला निघायचं होतं. टेबलापाशी उभी राहून सविता वाढत होती.

सुजाता म्हणाली, 'ममा, मीरा अजून आली नाही. आर्यनचं काय करायचं? आम्हाला आता ऑफिसला निघायचं आहे.'

रेणू काहीशी वैतागली, पण वरकरणी शांतपणे म्हणाली, सॉरी! मलाही दहापर्यंत बुटिकला पोहोचायचं आहे. दुपारी यायलाही उशीर होईल. संध्याकाळी पार्टीला जायचं आहे. आर्यनसाठी संध्याकाळी चार ते सहा एवढा वेळ थांबेन घरात. त्याप्रमाणे तुम्ही तुमचे प्रोग्राम्स एडजेस्ट करा.

केलॉग्ज व ज्यूसचा ब्रेकफास्ट करून ती घराबाहेर पडली. ऋषिकेशनी ब्रेकफास्ट केला की नाही हे सविताला विचारायला ती विसरली, याची तिला चुटपूट लागली. निघतांना आर्यन तिला 'कडेवर घे' म्हणत होता, तेही राहून गेले घाईत. तिला अधिकच वरमल्यासारखे झाले. गाडी चालवताना तिने मिसेस बजाजच्या ड्रेसचे डिझाईन ठरवले, बुटिकमध्ये मदतनीस ज्योतीला फोन केला. कारागीर व टेलर पोहोचल्याचे तिने सांगितले. तिला हायसे वाटले. 'चला, सुरुवात तर चांगली झाली कामाची!'

सकाळी एरोबिक्स व्हिडिओतले वाक्य तिला आठवले,

'The mind is telling the body to coordinate the movements.The body is telling the mind to balance.'

खरंच! शरीर आणि मनाचे कोऑर्डिनेशन व्हायलाच हवे. दोन्हींचा समतोल असेल तरच आपली गाडी सुरळीत चालणार. ओ गॉड! या गडबडीत बी.पी.ची गोळी घ्यायला विसरले. नेमकी आजच मीरा का बरं आली नाही? तिच्यामुळे सुजाता एकदम फ्री आहे. सारंगच्या बरोबरीने बिझनेस सांभाळते आहे.

रेणूला स्वतःचे आईपण आठवले. संसार सुखसमृद्धीचा व भरलेला होता. घरात तेव्हा दीर, नणंदा, सासू, सासरे होते. मोठी सून



म्हणून घरातले सणवार व कुळाचारांची जबाबदारी तिच्यावर होती. तिची हुशारी, हौशी स्वभाव, फॅशन डिझायनर म्हणून तिने कमावलेले कौशल्य हे सगळे बाजूलाच पडले.

यथावकाश सारंग व सोनिया यांचे तिच्या संसारात आगमन झाले. ते चांगले शिकले-सवरले. सोनिया सासरी गेली. सारंगची जोडीदार बनून सुजाता घरात आली.त्यांना आर्यन झाला.कालौघात सासू,सासरे गेले. नणंदा सासरी गेल्या.दीर व्यवसायानिमित्ताने वेगळे झाले. ऋषिकेशच्या पार्टनर मित्राने व्यवसाय सोडल्यानंतर रेणूला बिझनेसमध्ये घेतले. जात्याच स्मार्ट व बुद्धिमान असलेल्या रेणूने तेही शिकून घेतले. ऋषिकेशना तिची मदत होऊ लागली. घरात आधुनिक, मोकळे विचार सारंग व सुजातामुळे आले. सुजातावर सून म्हणून रेणूने कोणतीच बंधने टाकली नव्हती. या सगळ्यांमुळे घराचे 'घरपण' थोडे कमी झाल्यासारखे झाले. कामानिमित्त सतत घराबाहेर राहणे, बाहेरच जेवणे, रात्री उशिरा घरी येणे या सगळ्या गोष्टींमुळे घर कामवाल्यांवर सोपवले गेले. त्यात आता बुटिकची भर पडली होती.

---------------

रेणू वेळेवर बुटिकमध्ये पोहोचली. आधी तिने विसरलेली बी.पी. ची गोळी घेतली. तोच मिसेस बजाज आल्या. त्यांचे बोलून डिझाईन निश्चित केले. तोपर्यंत सुधाही आली. दोघींनी टेलर व कारागिरांना त्यांची कामे समजावून सांगितली. ड्रेससाठी लागणारे कुंदन, लेस, टिकल्या वगैरे आणायला ज्योतीला बरोबर घेऊन रेणू मार्केटला जाऊन आली.

मग आणखी दोघी, तिघी ग्राहक आल्या. थोडी उसंत मिळताच तिने घरी फोन लावला व चारपर्यंत घरी पोहोचण्याचे आश्वासन सुजाताला दिले. हे सगळे होईपर्यंत तीन वाजून गेले.

संध्याकाळी क्लबमध्ये सात पर्यंत येशील ना? रेणूला सुधाने विचारले.

आज कठीणच आहे गं! आजच्या दिवस घे सांभाळून तूच. संध्याकाळी कलेक्टरांकडे पार्टीला जायचं आहे. सगळं एकदमच आलं आहे बघ आज. मला तर आता गरगरायला लागलंय. रेणू म्हणाली.

थकल्यासारखी दिसते आहेस तू . कामांचा खूप ताण आलाय का तुला? काहीतरी एक कमी कर आणि आराम घे बरं जरा! - सुधा.

छे : गं ! मी यातलं काहीच सोडू शकत नाही आज आणि त्यात काय गं एवढं? सगळं माझ्याच आवडीनं सुरू केलं ना मीच? रात्री झोप झाली की सकाळी होईन एकदम फ्रेश. आणि आता घरी तरी काय काम आहे? आर्यनला सांभाळायचं आहे तेवढंच! तो काही त्रास देत नाही. माझाही आराम होईल.

रेणू घरी पोहोचली .सुजाता म्हणाली, आर्यन नीट जेवला नाही. तुमच्या बरोबर काही खातो का बघा. मी सात पर्यंत येते. तुम्हाला डॅडींबरोबर पार्टीला जायचं आहे ना? त्यांनी सांगितलं मला. सुजाता गोड बोलत निघून गेली.

रेणू स्वतःच्या खोलीत गेली. कपडे बदलून गार पाण्याने हात, पाय,तोंड धुऊन तिला हलके वाटले. तिने स्वतःला वाढून घेतले. आर्यनला चिऊकाऊचे घास भरवत तीही जेवली.

जेवणानंतर 'थोडंसं आडवं व्हायला मिळालं तर फार बरं होईल' असे तिच्या पाठीने तिला सुचवले. आर्यनला भरपूर खेळणी देऊन ती सोफ्यावर टेकली. तो खेळण्यात व ती स्वतःच्या विचारात रमली. तिला आठवलं, तिची मुलं लहान असताना, त्यांची जबाबदारी तिचीच होती. घरकामाला माणसे असूनही स्वयंपाकघर तिच्याच हाती होते. आता मात्र तिचं घर सविता आणि मीराच्या हातात होतं. त्या होत्या म्हणून या दोघींच्या कर्तबगारीला बहर आला होता. त्या दोघींबद्दल रेणूच्या मनात आपुलकी दाटून आली. 'खरंच काय महत्त्वाचं असतं? त्या दोघीही त्यांचे घर सोडून माझे घर सांभाळायला येतात. का? हौसेपोटी तर नक्कीच नाही. ती त्यांची गरज आहे. मी रोज कामासाठी घराबाहेर जाते, ते कशासाठी? ती माझी आर्थिक गरज तर नक्कीच नाही. मग काय सिद्ध करायचे आहे मला? माझी कर्तबगारी की माझा आत्मसन्मान? नेमका कशात असतो आत्मसन्मान? सोशल सर्कल वाढवण्यात की जास्त पैसा मिळवण्यात? घड्याळाच्या काट्यांवर चालण्याची ही कसरत का करतेय मी? तरीही माझ्या कामात मी समाधानी नक्कीच आहे. थोडेफार घराकडे नाइलाजाने दुर्लक्ष होतेय.'

रेणू स्वतःचे योग्य समर्थन शोधू लागली होती नकळत. तेवढ्यात पेंगुळलेला आर्यन तिच्याजवळ आला. तिने एक चादर जमिनीवर टाकली व त्याला कुशीत घेऊन ती आडवी झाली. त्याच्या रेशमी केसातून हळुवारपणे हात फिरवत गुणगुणू लागली. सारंग सुजाता यांना ती अशीच झोपवायची. त्या आठवणींनी तिच्या मनात वात्सल्यभावना दाटून आली. कामात कितीही गुंतलेली असली तरी एक नाजूक धागा आर्यनशी घट्ट जोडला गेला आहे हे तिला कसे नाकारत येईल? त्याचा चिमुकला तळवा तिच्या गालावर विसावला होता. तिने त्याला अधिकच कुशीत ओढले.

तिला जाग आली ती ऋषिकेशच्या फोनमुळे. सहा वाजले आले होते. लवकर निघायचे होते कारण अजून गिफ्टची खरेदी बाकी होती. रेणू धडपडत उठली. पाठ अजून थोडी कुरकुरतेच आहे का? मनात येऊ पाहणाऱ्या शंकेला दूर लोटत स्वतः तयार होऊ लागली. आपण काय काय विचार करीत होतो ते तिला आठवले. त्या विचारांना आता मनात थारा देता कामा नये. आताची गरज वेगळी आहे.'फक्त वर्तमानाचा विचार कर बाई रेणू!' स्वतःला तिने ठामपणे बजावले आणि ती पार्टीचा, गिफ्टचा, पोशाखाचा विचार करू लागली. आपण फॅशन डिझायनर आहोत हे त्या पार्टीत सगळ्यांना पटले पाहिजे. कुणा कुणाची भेट होईल, कुणाशी काय बोलावे, माझ्या दोन्ही बिझनेसमध्ये कुणाची मदत होईल. रेणू निग्रहाने वर्तमानात उतरून एका उद्योजिकेच्या भूमिकेत शिरली.

दिवसभराची दगदग,पाठीचे दुखणे, कसकस सगळे विसरली.

स्वतःलाच सांगू लागली, 'The mind is telling the body to coordinate the movements.The body is telling the mind to balance.'

●●




# एमिली इन पॅरिस

**मधुवंती गोडसे**
**सिल्वासा**

अशी कल्पना करा की तुम्ही एखाद्या ठिकाणी गेला आहात जिथली भाषा तुम्हाला अजिबात येत नाही..इतकच काय पण तिथली संस्कृती देखील वेगळी आहे...तिथल्या लोकांशी जुळवून घेताना तुमची काय त्रेधा तिरपिट उडेल?

काही महिन्यांपूर्वी केरळला गेले होते...पण केरळच्या थोड्या ग्रामीण भागात गेल्यामुळे तिथे स्थानिकांना इंग्लिश काय हिंदी सुद्धा समजत नव्हतं,त्यामुळे हातवारे करुन शक्य तिथे नकाशांचा वापर आणि मोडक्या तोडक्या काही मल्याळी शब्दांचा वापर करुन काम भागवलं.

पण समजा अशा एखाद्या देशात तुम्हाला जाऊन काम करण्याची वेळ आली जिथली भाषा आणि संस्कृती तुम्हाला अजिबात माहीत नाही...तर?

आपल्या सिरिज मधली आपली नायिका एमिली ला सॅव्होयर या मार्केटिंग फ़र्म मार्फ़त फ्रान्समध्ये पाठवलं जातं.

आणि ते पण अशा कामासाठी जिथे पब्लिक रिलेशन...कम्युनिकेशन हा तिच्या कामाचा महत्वाचा भाग आहे.

एमिली ही एक अमेरिकन मुलगी जेव्हा पॅरिसमध्ये येते तेव्हा नवीन भाषा तर असतेच त्याच बरोबर पूर्ण वेगळी संस्कृती तिच्या समोर असते.

एका मार्केटिंग फ़र्म बरोबर त्यांच्या क्लायंट्सना सांभाळणे आणि नवीन क्लायंट्स मिळवणे हे एक मोठं आव्हान तिच्यासमोर असतं...

एमिली हळूहळू ह्या नवीन शहरात रुळायला लागते,तिचा शेजारी असणारा आणि एका रेस्टॉरंटमध्ये शेफ़ असलेला गॅब्रिएल, मुळची चायनीज अति श्रीमंत मिंडी जी गाण्यात करीयर करण्यासाठी आली आहे त्याशिवाय ल्युक,ज्युलिअन आणि एमिली ची बॉस सिल्वी ह्यांच्यात मिळुन मिसळुन जगायला लागली आहे.

इंस्टाग्रामवर खुप ऍक्टिव्ह असलेली एमिली आपल्या प्रोफ़ेशनल आयुष्यात निरनिराळ्या चढ उतारांना सामोरी जाते आहे, आणि त्याच वेळी तिच्या वैयक्तिक आयुष्यात देखील विविध नाती बनत आहेत.

शेफ़ गॅब्रिएल ज्याच्या ती प्रेमात पडते त्याची प्रेयसी एमिली ची चांगली मैत्रीण कॅमिल असते ह्या त्रिकोणामुळे एमिली गोंधळात पडते. पण मग हा गुंता सोडवण्याचा तिचा प्रयत्न प्रत्यक्ष पडद्यावर बघताना एकीकडे एमिली बद्दल हळहळ सुद्धा वाटते आणि एकीकडे गंमत सुद्धा!

विविध क्लायंट्स ना सांभाळताना त्यांच्या चित्रविचित्र मागण्या सांभाळून आपल्याला जे म्हणायचं आहे ते त्यांच्या गळी उतरवणे, प्रसंगी वेळ मारुन नेण्याकरता काही आश्वासनं देऊन मग ती पूर्ण करण्यासाठी धडपडणे आदी गोष्टी सिरियल बघताना मजा आणतात.

दोन वर्ष जगाने पॅंडेमिकमध्ये घालवली असल्यामुळे एमिली इन पॅरिस सारख्या लाईट कॉमेडी ड्रामाची गरज होतीच.

ही सिरिज हलकंफुलकं मनोरंजन करतेच त्याशिवाय एका नवीन देशाची वर्चुअल का होईना सफ़र घडवून आणते.

तुम्ही कधी पॅरिसला गेला असाल किंवा नसाल तरीही एमिलीच्या बरोबर फ्रान्सची झकास सफ़र घडेल.

डैरेन स्टार या प्रसिद्ध लेखक दिग्दर्शकाची ही आणखी एक कलाकृती, नेटफ्लिक्स वर ह्या सिरीजचे दोन्ही सीझन उपलब्ध आहेत.

# कविता

## तीन रुपं पावसाची...

किती सहज पांगले ढग
आता तर बरसत होते ना
नभाला आता एक निरभ्रतेचा रंग
फिकट निळासा थोडा उदाससा
आणि  उरात एक ओलेती रेघ
मनात एक गर्द सावळासा मेघ
अन् मन पुन्हा ओथंबून आलेले . .

आभाळ रितं रितं होताना
नंतर बरसतो मौनाचा पाऊस
आणि वाऱ्याचं बोट धरुन
मेघ दूरदूर निघून गेल्यावर
कितीतरी निळेसावळे संकेत
ओघळत रहातात मनावर , मनभर
ह्या सगळ्याची एक रुजवण
म्हणजे परत आपल्या नात्याची
नव्याने रुजवात तर नव्हे ना ? . . .

कशी झिम्माड आली
आज पावसाची सर
माझ्या मनाच्या वेशीवर
किती नाचणारे मोर

त्यांना कोठुनशी लागे
ही पाऊस चाहूल
त्यांच्या येण्याने जडते
जीवाला मोरपिशी भूल

कसे वेड हे अनोखे
मना सावर सावर
होई निजेला पारखे
माझ्या पापणीचे पर. .

– सौ. हर्षल राजेशिर्के सातारा



## बिइंग वुमन

चूल आणि मूल सांभाळणारी
स्वतःच अस्तित्व विसरून
दुसऱ्यांसाठी दिवसरात्र राबणारी...

सर्वच क्षेत्रात गगनभरारी घेणारी
स्वतःचे पंख आभाळाला टेकवणारी
निर्भयपणे स्वतःला सिद्ध करणारी...

नोकरी व्यवसाय अशा अनेक
पातळ्यांवर जिद्दीने लढणारी
महत्त्वकांक्षी ध्येयपूर्तीने जगणारी ....

काळानुरूप ती बदलली तिची रूप बदलली
ती शिकली ती घडली
ती लढली ती जगली
ती अनेक नवनव्या अस्तित्वात भेटू लागली
Being Woman म्हणत ती परिपूर्ण झाली

– चित्राली कौस्तुभ कुलकर्णी

## जागर

गर्भातच अंत कधी ना
कुठल्याही कळीचा व्हावा
स्त्रीशक्तीचा अर्थ नवीन
मनामनात रुजवावा

नित्य राहो सरस्वतीला
शिक्षणाचे खुलेच दार
हुंडा देण्या-घेण्या न व्हावी
कुणी लक्ष्मी कधी तयार

तिला छेडताच कुणी
दुर्गा बनून प्रगटावी
तिने होऊन महाकाली
त्यास कठोर शिक्षा द्यावी

हरेक गृहिणीस द्यावा
नित्य अन्नपुर्णेचा मान
मग्न कामात अविरत
तीही अष्टभुजे समान

हाच सन्मान स्त्रीतत्वाचा
असा करावा निरंतर
तोच असेल खराखुरा
त्या आदिशक्तीचा जागर

– तनुजा नितीन चव्हाण



## मन

मन दाटुन आले
भावना ओथंबल्या ।
अस्वस्थ वेदनांनी
दिशा झाकोळल्या ।
स्वैर वाऱ्याचे
झाले वादळ।
जणू भावनांचे
फाटले आभाळ॥
थेंब टपोरे
डोळ्यातून आले।
निःशब्द भावना अन्
हृदय ही ओले॥
॥ अनादी अनंत ॥



## आयुष्य

पोळलेलं मन सैरभैर फिरत राहतं
काहीतरी शोधत राहतं
हाती काहीच लागत नाही म्हणून मग खिन्न होतं

बँकेत जमा खर्च करत राहिले
स्वतःचे खाते रिकामेच राहिले
आयुष्याचा ताळेबंद नाही हाती हे आत्ता मला उमगले

सावलीत हिरवळीवर होते मस्त मी निवांत
अन एक दिवस नशिबाने मला उभे केले रखरखीत उन्हात

देवाकडे एकच मागणे आहे
समोर वाढून ठेवलेले ताट पचवण्याचे बळ दे
पुढील आयुष्याची वाटचाल करायला भक्कम ध्येय दे.

– सौ. वर्षा

## निरागसता

नाही घातला हिशेब मुलांचा
नाही घातला ही पैशांचा
मन हे झाले व्यस्त जरी
शिकवी मुले ही मज खरी
निरागसता ही मनामनातून
आनंदही वाहे भरभरुनी
चिऊ काऊच्या घासामधुनी
प्रेम मिळे हे पोट भरूनी
जवळ येऊनी प्रेमे बिलगता
धन्य होई ती शिक्षक माता
असे वाटते जमेल का हे
मुलांप्रमाणे प्रेम करावे ...

– सौ. चित्रा कशाळकर



## रुपेरी



आयुष्याच्या वळणावरचा
रुपेरी हा प्रवास सुंदर,
मनामधल्या आनंदाला
रुपेरी हि सुंदर झालर
ही तर किमया निसर्गाची
स्विकार हिचा आनंदाने,
वरवरच्या रंग रूपात
नको आता अडकणे
रुपेरीपण लेवूनी मी
रुपेरीच होऊन गेले,
माझ्या रुपेरी दिसण्यावर
मीच की हो फिदा झाले.

– सौ. ऋता

# शब्दकोडे ५ / विजय तरवडे

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३ | | ४ | | ५ | | ६ |
| ७ | | | ८ | | ९ | | १० | | ११ | |
| | | १२ | | | | | | | | |
| १३ | १४ | | १५ | | | १६ | | १७ | | |
| | १८ | १९ | | | २० | | २१ | | | |
| २२ | | | | २३ | | २४ | | | | २५ |
| | | | | २६ | | | | | २७ | |
| २८ | | | | | | २९ | | | | |
| | | | ३० | | ३१ | | | | | |
| ३२ | | ३३ | | | ३४ | | ३५ | ३६ | | ३७ |
| | | ३८ | | | | ३९ | | | | |

**आडवे शब्द :** १. संन्यासी ७. पाणी
८. पावनखिंडीत स्वराज्यासाठी हुतात्मा झालेला वीर
१२. आरूढ १३. गावाची वेस १५. अर्क १७. मेंढीचे पिल्लू
१८. नाराजी २०. झाशीच्या राणीचे नाव २२. ओंकार
२४. चांदणी २६. पंधरवडा २७. झोपमोड २८. रास, ढीग
२९. दोलायमानता ३०. कोणाला कळू न देता ३२. कामकाज
३४. क्लृप्ती, हुनर ३८. कपर्दिक ३९ क्रूरकर्मा, कोणाला दया न दाखवणारा

**उभे शब्द :** १. 'आनंदी गोपाळ' या कादंबरीचे लेखक
२. सरपटणारा किळसवाणा प्राणी ३. बेसनाचा तळलेला लोकप्रिय पदार्थ
४. भगवान शंकराचे संबोधन ५. हडकुळा
६. स्वयपाकातील एक तेल ८. सूक्ष्म तपशील ९. परंपरा
१०. राष्ट्र ११. फिकुटलेला श्वेत रंग १४. पावसाचा देव
१६. स्त्री १७. हाताचे मधले बोट; कमळाची कळी
१९. किमतीतील सूट २१. खड्ग २२. कीर्तनकार
२३. विपर्यास, गैर अर्थ २५. पवित्र २७. त्रासदायक
२९. तळहाताने केलेला प्रहार ३०. शंकराचे पुजारी
३१. प्रमाद ३३. शपथ ३५. पुरुष ३६. शरीर ३७. क्रीडा

## शब्दकोडे ५ चे उत्तर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री | पा | द | | भ | | शं | | कृ | | गो |
| ज | ल | | बा | जी | प्र | भू | दे | श | पां | डे |
| जो | | स्वा | र | | था | | श | | ढु | |
| शी | व | | का | ढा | | व | | क | र | डू |
| | रु | स | वा | | म | नि | क | र्णि | का | |
| प्र | ण | व | | अ | | ता | र | का | | मं |
| व | | ल | | प | क्ष | | वा | | जा | ग |
| च | ळ | त | | ला | | च | ल | बि | च | ल |
| न | | | गु | प | चू | प | | | क | |
| का | र | भा | र | | क | रा | म | त | | खे |
| र | | क | व | डी | | क | र्द | न | का | ळ |




## Festive Offer On Ayurvedic Cosmetics

# BUY 1 GET 1 FREE

**Revitalizing Hair Oil** | **Strengthening Shampoo** | **Smoothening Conditioner**

**Radiance Face Cream** | **Purifying Face Scrub** | **Rejuvenating Face Pack**

**Nourishing Body Wash** | **Clarifying Body Wash** | **Moisturizing Body Lotion**

**Nourishing Face Wash** | **Intense Clean Face Wash**

## Ayurvedic Products

**A2 Geer Cow Ghee** | **Shatavari Kalpa** | **Gulkand** | **Awala & Aloevera Juices**

**Organic Honey** | **Abhyanga Taila** | **Pain relief Oil** | **Chavyanprash**

Ganga Vishnu heights, Near Devesh Chitale Bandhu Mithaivale & Ruchi Hotel,
Karve Nagar - Pune | Contact: 9075094040 / 9075904040

Hair Care | Skin Care | Body Care | Wellness | Giftings

RNI No. MAHMAR/2019/78753
संपर्क कार्यालय : 'बिइंग वूमन' ६०३, फिफ्थ, अव्हेन्यू, सिटीप्राईड थिएटरजवळ, पुणे ४११०३८ Mo. 9822862255, 8552857779

